१९३७-२०२६ वर्ष ९० रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

कृषीवल

रायगड | शुक्रवार । दि. ३० ऑक्टोबर २०२६ । अंक १४४ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

कायद्याला हरताळ फासण्याचे काम : सपकाळ

नेरळ : राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी कर्जत येथे येऊन जंगलतोड आणि टोरंट प्रकल्पाविरोधात रणशिंग फुंकले आहे. राज्याचे मुख्यमंत्री यांच्यावर जोरदार टीका करताना सपकाळ यांनी आपल्या उद्योगपती मित्रासाठी सर्व काही बाजूला ठेवून काम करीत असल्याचा आरोप देखील केला आहे. कर्जत येथे टोरंट प्रकल्पाला होणारा विरोध लक्षात घेता स्थानिकांच्या पाठीशी उभे राहण्यासाठी राष्ट्रीय काँग्रेस



•➤पान २ वर

बंद फ्लॅटमध्ये आढळले भावंडांचे मृतदेह

विरार : विरार पश्चिमेतील ग्लोबल सिटी परिसरातील एका बंद फ्लॅटमध्ये दोन भाऊ आणि त्यांच्या बहिणीचे मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. कुमार मनसुखलाल मेहता (५०), दिपेश मनसुखलाल मेहता (५२) आणि खेवणा मनसुखलाल मेहता (४८) अशी मृतांची नावे आहेत. तिघांनी विषप्राशन करून आत्महत्या केली असावी, असा प्राथमिक संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. मात्र, त्यांच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. ही घटना विरार पश्चिमेतील ग्लोबल सिटी येथील के-३-डी, गार्डन ॲव्हेन्यू या इमारतीच्या 'डी' विंगमध्ये बुधवारी रात्रीच्या सुमारास घडली.

•➤पान २ वर

वे|ध|क

१३ वर्षीय मुलीचा विनयभंग

पनवेल : कळंबोली येथील ट्युशनला जाणाऱ्या १३ वर्षीय मुलीशी अयोग्य वर्तन केल्याप्रकरणी शिक्षिकेच्या ६१ वर्षीय पतीविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी गेल्या चार वर्षांपासून कळंबोली येथील ट्युशनला जात आहे. तक्रारीनुसार, मागील वर्षभरापासून ट्युशन चालवणाऱ्या शिक्षिकेचा पती इतर मुले घरी गेल्यानंतर त्या मुलीसोबत असभ्य वर्तन आणि तिला अयोग्य ठिकाणी स्पर्श करणे, असे प्रकार करत होता. या प्रकारामुळे त्रस्त झालेल्या मुलीने

•➤पान २ वर

दिवा-मुंब्र्यात ड्रग्ज तस्करीचे मोठे जाळे



कळंबोली: अमली पदार्थांच्या तस्करीविरोधात नवी मुंबई पोलिसांच्या अमली पदार्थविरोधी पथकान मोठी कारवाई करत दिवा-मुंब्रा परिसरातील कथित ड्रग्ज तस्करीचे जाळे उघडकीस आणले आहे. मुंब्रा पोलिसांच्या सहकार्याने करण्यात आलेल्या या कारवाईत तब्बल २ कोटी २० लाख रुपये किमतीचे अमली पदार्थ जप्त करण्यात

•➤पान २ वर

धान्यात किडे, मुंग्या

रोह्यात रेशनिंग दुकानातील धक्कादायक प्रकार



। रोहा । प्रतिनिधी ।

शासनाकडून गरीब कुटुंबातील सदस्यांना कमी दरात वितरीत करण्यात येत असलेल्या रेशनिंग दुकानातील गहू व तांदळाच्या गोणीत चक्क कीटक, किडे आणि मुंग्या सपाडल्या आहेत. आणि तेच गहू, तांदुळ संबंधित दुकानदार ग्राहकांना विक्री करत असल्याचा धक्कादायक प्रकार सामाजिक कार्यकर्ते मंगेश रावकर यांनी उघडकीस आणला आहे. तसेच, या दुकानदारांवर कडक कारवाई करून त्याचा परवाना रद्द करण्याची मागणी देखील त्यांनी तहसील कार्यालयात लेखीपत्राद्वारे केली आहे.

रोहे शहाराला लागून असलेल्या वरसे-भुवनेश्वर येथील रेशनिंग दुकानात गुरुवारी (दि.२९) हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. मंगेश रावकर यांनी दिलेल्या लेखीपत्रात, हे दुकान संजय शर्मा यांच्या एजन्सी मार्फत चालविले जात असल्याची माहिती नमूद केली आहे. तसेच, या दुकानात गहू आणि तांदळाच्या गोणीत आणि भिंतीवर हजारो जिवंत किडे, कीटक फिरत असल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस करून सामान्य लोकांच्या जीवाशी खेळणाऱ्या एजन्सी विरोधात कारवाईची मागणी करत परवाना रद्द करण्याची मागणी त्यांनी तहसील कार्यालयातील पुरवठा अधिकारी वर्गाकडे केली आहे. परंतु, संबंधित दुकानदारावर तहसील कार्यालयातील पुरवठा अधिकारी वर्गाकडून कारवाई होण्याची शक्यता नसल्याने या प्रकरणी अन्न व औषध विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्याकडे तक्रार करणार असल्याची माहिती मंगेश रावकर यांनी दिली.

गरिबांच्या आरोग्याशी खेळ; परवाना रद्द करण्याची मंगेश रावकर यांची मागणी

"या घटनेची माहिती समजताच घटनास्थळी जाऊन पाहणी केली. घटनेचा पंचनामा करून संबंधित दुकानदाराला दुकान स्वच्छ करण्याची व खराब धान्य लाभार्थी व्यक्तींना वाटप न करण्याची ताकीद देण्यात आली आहे. तसेच, गाळा स्वच्छ केल्यानंतर आम्ही परत एकदा दुकानाची पाहणी करणार आहोत, त्याशिवाय धान्य वितरित न करण्याची समज दुकानदाराला देण्यात आली आहे.
– हेमलता करसुंगे, पुरवठा अधिकारी"

अखेर मीनाक्षी शिंदेंचा राजीनामा



। मुंबई । प्रतिनिधी ।

शिवसेना ठाकरे गटाचे ठाणे विभागप्रमुख प्रदीप पूर्णेकर यांच्या हत्येप्रकरणी सातत्याने पूर्णेकर कुटुंबीय आणि ठाकरे गटाच्या निशाण्यावर असणाऱ्या शिवसेना ठाणे जिल्हा महिला आघाडी प्रमुख मीनाक्षी शिंदे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. नेतृत्वाची बदनामी टाळण्यासाठी आपण राजीनाम्याचा निर्णय घेतल्याचे स्पष्टीकरण मीनाक्षी शिंदे यांनी दिले आहे. दरम्यान, शिवसेना नेते आदित्य ठाकरे व खा. संजय राऊत यांनी ठाणे पोलीस आयुक्तांची भेट घेऊन आरोपीना अटक करण्याची मागणी केली.

ठाणे विभागप्रमुख प्रदीप पूर्णेकर यांच्या हत्येला एक महिना उलटून गेला तरी या प्रकरणातील मास्टरमाईंडला अद्याप अटक का करण्यात आली नाही? एकनाथ शिंदे यांनी मीनाक्षी शिंदे यांना वाचवण्यासाठी सगळी यंत्रणा का कामाला लावली आहे? असा सवाल शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी विचारला. पोलिसांसमोर सगळे पुरावे असतानाही ते काहीच करत नाहीत, असा आरोपही त्यांनी केला. प्रदीप पूर्णेकर प्रकरणात तातडीने कारवाई व्हावी यासाठी आदित्य ठाकरे यांनी पोलीस आयुक्तांची भेट घेतली. तसेच, प्रदीप पूर्णेकर हत्या प्रकरणात मीनाक्षी शिंदे यांना वाचवण्यासाठी एकनाथ शिंदे यांनी सगळी सरकारी यंत्रणा कामाला

•➤पान २ वर

गोकुळच्या अध्यक्षपदी शशिकांत चुयेकर



। कोल्हापूर । प्रतिनिधी ।

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या (गोकुळ) अध्यक्षपदाच्या निवडणुकीत गुरुवारी (दि.२९) महायुतीची नाटकं पाहायला मिळाली. महायुतीचे संचालक अनुपस्थित राहिल्यामुळे समविचारी आघाडीच्या १३ संचालकांनी समांतर सभा घेत शशिकांत पाटील – चुयेकर यांची अध्यक्षपदी निवड केली. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी गणपूर्तीअभावी निवड प्रक्रिया पुढे नेण्यास असमर्थता दर्शविल्यानंतर समविचारी आघाडीच्या संचालकांनी स्वतंत्रपणे ही प्रक्रिया पार पाडली. शशिकांत पाटील-चुयेकर यांची निवड झाल्यानंतर महाविकास आघाडीच्या संचालकांनी तसेच विविध पक्षाच्या संचालकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

आमदार सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखालील समविचारी आघाडीकडे १३ संचालकांचे संख्याबळ असल्याने ही निवड करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या भूमिकेला विरोध करून बहुमताच्या जोरावर समांतर सभा घेण्यात आली. या सभेत शशिकांत पाटील-चुयेकर यांची अध्यक्षपदी निवड झाल्याचे जाहीर करत, आजपासून गोकुळचा अध्यक्ष म्हणून तेच कामकाज पाहणार असल्याची घोषणा सतेज पाटील यांनी केली.

दरम्यान, अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर शशिकांत पाटील-चुयेकर म्हणाले की, ''गोकुळ दूध संघाची निवडणूक झाल्यानंतर कायदेशीर प्रक्रियेनुसार अध्यक्षपदाची निवडणूक घेणे आवश्यक असते. त्यानुसार दि.२९ ऑक्टोबरला निवड होणार होती. निवडणूक अधिकाऱ्यांनी प्रक्रिया सुरू केल्यानंतर आम्ही त्यांना आमच्याकडे स्पष्ट बहुमत असल्याचे सांगितले आणि आमच्या उमेदवाराची निवड करण्याची विनंती केली. मात्र, त्यांनी ती मान्य केली नाही. त्यामुळे त्यांच्या निर्णयाला विरोध करत आम्ही स्वतंत्र सभा घेतली. या सभेत १३ संचालकांच्या उपस्थितीत माझी अध्यक्षपदी निवड करण्यात आली,'' असे ते म्हणाले.

MGM
Institute of Health Sciences
(Deemed to be University u/s 3 of UGC Act, 1956)
Grade "A++" Accredited by NAAC
Constituent College of MGM Institute of Health Sciences
MGM SCHOOL OF NURSING, VASHI
Admissions Open For
BSc Nursing
Eligibility: PCB 45%, 40% PCB for eligible reserved-category candidates with caste certificate, as per norms
Nurse Practitioner in Critical Care (NPCC)
Nurse Practitioner in Emergency and Trauma Care (NPETC)
Enrol Before 31st October 2026
9321635842 Main Boardline | 9769803341 Human Resources (HR) | 9004052249 Principal
mgmsonvashi@gmail.com
Plot No. 35, Sector 3, Vashi, Navi Mumbai 400703
Affiliated Hospital
MGM NEW BOMBAY HOSPITAL, VASHI
JCI & NABH ACCREDITED
A Multi-Speciality, Tertiary Care Hospital with a Legacy of Over 3 Decades



मास्टर मरीन मेहर यार्ड कंपनीविरोधात आंदोलन

■ स्थानिकांना, प्रकल्पग्रस्तांना रोजगार देण्याची मागणी ■ प्रकल्पग्रस्त शेतकरी आक्रमक



। उरण । प्रतिनिधी ।

उरण तालुक्यातील खोपटे येथील मास्टर मरीन मेहर यार्ड कंपनीत स्थानिकांना आणि शेतकऱ्यांना रोजगारासह व्यवसायाच्या संधींमध्ये सामावून घ्यावे, या प्रमुख मागण्यांसाठी गुरुवारी (दि.२९) प्रकल्पग्रस्त आणि कंपनी प्रशासन यांच्यात महत्वाची बैठक संपन्न झाली. या बैठकीत उपस्थित पदाधिकाऱ्यांनी बेरोजगार व प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची बाजू आक्रमकपणे मांडण्यात आली. परंतु, कंपनी प्रशासनाने दिलेले आश्वासन मान्य नसल्याने कंपनीसमोरच गेट बंद आंदोलन सुरू करण्यात आले आहे.

प्रकल्पग्रस्त आणि कंपनी प्रशासन यांच्यात गुरूवारी सकाळी झालेल्या बैठकीत अनेक विषयांवर सविस्तर चर्चा झाली. त्यात स्थानिक बेरोजगार शेतकऱ्यांना न्याय मिळाले पाहिजे. १९ बेरोजगार प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना कामावर त्वरित रुजू करून घ्यावे, अशी मागणी केली. यावेळी मास्टर मरीन मेहर यार्ड कंपनीचे अधिकारी तसेच ठेकेदार उपस्थित होते. कंपनी प्रशासनाने सध्या १० माणसे कामावर घेऊ व नंतर ३ महिन्यांनी ९ माणसे कामावर घेऊ असे वचन दिले. मात्र, हा निर्णय बेरोजगार प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना मान्य नसल्याने त्यांच्यातर्फे उपस्थित शिष्टमंडळाने सर्वच्या सर्व १९ जणांना एकदाच एकाच वेळी कामावर घ्या, अशी आक्रमक भूमिका घेतली. मात्र, कंपनी प्रशासनाने ही बेरोजगार प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची मागणी अमान्य केली. त्यामुळे ही चर्चा निष्फळ झाल्याचे समजताच बेरोजगार प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी व सर्वच राजकीय पक्षाच्या नेते, पदाधिकाऱ्यांनी आक्रमक भूमिका घेत कंपनीच्या गेट समोरच बेमुदत आंदोलन करण्याचा निर्णय घेतला. मोठेखार (वरचा भाग) प्रकल्पग्रस्त शेतकरी संघटना, खोपटे-बांधपाडा यांच्या माध्यमातून सामाजिक कार्यकर्ते अजित कृष्णा म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू करण्यात आले आहे.

शिवप्रतिष्ठानतर्फे कर्जतमध्ये निदर्शने

। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील सह्याद्रीच्या खोऱ्यात सुरू असलेली जंगलतोड याविरुद्ध शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान आक्रमक झाले आहेत. या प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांच्या मावळे बनून कर्जत तहसील कार्यालयाबाहेर जोरदार निदर्शने केली. कर्जत शहरात शेकडो कार्यकर्त्यांनी रॅली काढली आणि या जंगलतोडचा निषेध केला. भिमाशंकर जंगलतोड प्रकरणात शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानकडून सह्याद्री वाचवा आणि भीमाशंकर अभयारण्य वाचवा' असा नारा देण्यात आला. या प्रतिष्ठानकडून कर्जत शहरात भगवे ध्वज घेऊन रॅली काढून सुरू असलेल्या जंगलतोड याचा निषेध करण्यात आला. त्यानंतर कर्जत तहसील कार्यालयात जाऊन आक्रमक भूमिका घेत जंगल वाचले पाहिजे, अशी एकमुखी मागणी केली.

आजपासून अलिबागमध्ये दिवाळी महोत्सवाला सुरूवात

■ सुप्रिया पाटील यांच्या हस्ते उद्घाटन

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

अलिबाग नगरपरिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाच्यावतीने दिवाळी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. अलिबाग अर्बन बँकेच्या अध्यक्षा तथा रायगड जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील यांच्या हस्ते या महोत्सवाचा उद्घाटन सोहळा शुक्रवारी (दि.३०) सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास पार पडणार आहे. हा कार्यक्रम अलिबाग नगरपरिषदेच्या पटांगणात होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

दिवाळीनिमित्त अलिबागकरांना एका छताखाली सर्व खरेदी करण्यासाठी अलिबाग नगरपरिषदेच्यावतीने दिवाळी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवामध्ये खाद्य पदार्थ, दिवाळीचे साहित्य, कपडे, दागीने, अलंकार, घरगूती उत्पादने आणि विविध वस्तूंचे स्टॉल असणार आहेत. हा महोत्सव दि.१ नोव्हेंबरपर्यंत असणार आहे. त्यामुळे या दोन दिवसांच्या कालावधीत ग्राहकांना व नागरिकांना दिवाळीची खरेदी महोत्सवाच्या माध्यमातून करण्याची संधी नगरपरिषदेने प्राप्त करून दिली आहे. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी अलिबागच्या नगराध्यक्षा अक्षया नाईक, उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, वीज व बांधकाम सभापती प्रशांत नाईक, महिला व बालकल्याण विभागाच्या सभापती डॉ.साक्षी पाटील, उपसभापती ॲड. अश्वीनी ठोसर, मुख्याधिकारी सागर साळुंखे तसेच नगरपरिषदेच्या विविध विभागातील सभापती, नगरसेवक, नगरसेविका व कर्मचारी उपस्थित राहणार आहेत.

कर्तव्यावरील पोलिसांना कारने उडवले

दोघे आरोपी पोलिसांच्या ताब्यात

। म्हसळा । प्रतिनिधी ।

म्हसळा शहरातील पाभरे फाटा येथील नदी पुलाजवळ शासकीय कर्तव्य बजावणाऱ्या पोलिसांच्या दुचाकीला कारने जोरदार धडक देऊन त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची गंभीर घटना दि.२६ ऑक्टोबर रोजी घडली. या प्रकरणी म्हसळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, दि.२६ ऑक्टोबर रोजी दुपारच्या सुमारास पाभरे फाटा येथील नदी पुलावर पोलीस अधिकारी व अंमलदार शासकीय कर्तव्य बजावत होते.त्यावेळी पांढऱ्या रंगाच्या कारचा चालक मंगेश गोरे याने आपल्या एका साथीदारासह पोलिसांच्या कामात अडथळा आणण्याच्या उद्देशाने पोलीस कर्मचारी शौकत फरीद मुल्ला यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या घटनेत पोलीस कर्मचारी मुल्ला जखमी झाले असून, त्यांच्या दुचाकीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शासकीय कर्तव्य बजावणाऱ्या पोलिसांनाच लक्ष्य केल्याने या घटनेचे गांभीर्य वाढले आहे. या प्रकरणी म्हसळा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. दरम्यान, उपविभागीय पोलीस अधिकारी राजू सोनवणे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. तसेच, तपासादरम्यान दोन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, पुढील तपास सुरू आहे.

पोलादपूरमध्ये संयुक्त बैठकीचे आयोजन

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

पोलादपूर तालुक्यातील अनेक गावांमध्ये पाणीटंचाई गंभीर होत असून, काही गावांमध्ये नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी दिवसभर वणवण करावी लागत आहे. ही परिस्थिती भविष्यात अधिक गंभीर होऊ नये, यासाठी पोलादपूर तहसील कार्यालयात तहसीलदार कपिल घोरपडे आणि पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी दिप्ती गाट यांच्या संयुक्त बैठकीचे आयोजन शुक्रवारी (दि.३०) सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे. या बैठकीस आपली माती आपली माणसं संघटनेचे संस्थापक राज पार्टे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व तालुक्यातील सर्वपक्षीय नेते उपस्थित राहणार आहेत. आपली माती आपली माणसं संघटनेने काही दिवसांपूर्वी सर्वात आधी दिलेल्या एका निवेदनाद्वारे तहसील कार्यालयाकडे पोलादपूर तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करण्यासंदर्भात मागणी केली होती. मात्र, राज्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या दुसऱ्या यादीमध्ये पुणे, नाशिक आणि कोकण विभागातील ६ जिल्ह्यांमधील १० तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. यात कोकण विभागातील रायगड जिल्ह्यामध्ये कर्जत, पेण, तळा आणि महाड या ४ तालुक्यांचा समावेश झाला आहे. त्यामुळे या संयुक्त बैठकीमध्ये घमासान चर्चा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

आंध्र किनारपट्टीवर चक्रीवादळाचे थैमान

■ ९ जणांचा मृत्यू
■ अनेक राज्यांना तडाखा

। अमरावती । वृत्तसंस्था ।

बंगालच्या उपसागरातून उगम पावलेल्या 'अर्णब' या अति तीव्र चक्रीवादळाने बुधवारी (दि.२८) पहाटे ताशी १२५ ते १५० किलोमीटर वेगाच्या वाऱ्यासह आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीला धडक दिली. त्यानंतर ते कमकुवत होऊन तीव्र चक्रीवादळात रूपांतरित झाले. या चक्रीवादळामुळे हजारो झाडे आणि विजेचे खांब उन्मळून पडले असून, रस्त्यांचे नुकसान झाले आहे.

तसेच, विजेचा धक्का लागण्यासह चक्रीवादळाशी संबंधित विविध घटनांमध्ये नऊ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. आंध्र प्रदेश आणि यानम (पुदुचेरी) दरम्यानच्या किनारपट्टीवर सहा तासांच्या कालावधीत 'अर्णब' चक्रीवादळ धडकले. त्यामुळे अनेक भागांमध्ये, विशेषतः किनारपट्टीच्या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस पडला. अधिकाऱ्यांच्या मते, एलुरु, पश्चिम गोदावरी आणि विजयनगरमसह १० हून अधिक जिल्ह्यांमधील शेकडो गावांना याचा फटका बसला. अनेक भागांमध्ये २०० मिमी पेक्षा जास्त पाऊस झाल्याने सखल भागांमध्ये पाणी साचले आहे. मुख्यमंत्री एन. चंद्रबाबू नायडू यांनी सांगितले की, चक्रीवादळामुळे राज्यातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. नुकसानीचा तपशील देताना ते म्हणाले की, विजेचा धक्का लागून आणि भिंती कोसळून नऊ जणांचा मृत्यू झाला आहे. तसेच, सोसाट्याचा वारा आणि मुसळधार पावसामुळे १४ जिल्ह्यांमधील २.२४ लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रातील भातासह उभ्या पिकांचे नुकसान झाले आहे. तर, राज्यात १५,००० विजेचे खांब उन्मळून पडले आहेत.



तालुक्यात भात कापणीची लगबग

। पाताळगंगा । प्रतिनिधी ।

खालापूर तालुक्यात भात कापणीची लगबग सुरु असून, अल्प भुधारकांची कामे अंतिम टप्प्यात आली आहेत. यंदा उत्तम पाऊस पडला, परंतु शेवटच्या क्षणाला पाण्याची आवश्यकता असताना पाऊस पडला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान झाले असले तरी मागील आठवड्यापासून शेतकऱ्यांनी भात कापणी सुरु केली आहे. परंतु, चार महिने अथांग परिश्रम करूनही हवे तेवढे धान्य मिळत नसल्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. यंदा शेतीला पाण्याच्या आवश्यकता असताना पाऊस न पडल्याने पीकाला पाहिजे तसे पाणी उपलब्ध झाले नाही. त्यामुळे जे काही पिक शेतात उभं आहे ते पिक शेतकऱ्यांनी कापायला सुरूवात केली असून, काही शेतकऱ्यांनी शेतामध्ये भात झोडणीही चालू केली आहे. मात्र, काही ठिकाणी शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले दिसत आहे. प्रचंड मेहन घेऊनही पाहिजे तसं पिक हाती न लागल्याने शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. काही शेतकऱ्यांकडे जेमतेम घरापुरते पिक निघाले असून त्यांच्याकडे असणाऱ्या गुरांच्या चाऱ्याचा प्रश्नदेखील ऐरणीवर आला आहे.

प्रकल्पग्रस्त पोहचले शिवसेना भवनात



। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यात राज्य सरकारकडून प्रस्तावित असलेल्या पोशीर धरण प्रकल्पाला स्थानिक पातळीवर विरोध होत आहे. या प्रकल्पाला स्थानिकांचा भूमिकेशी सहमती दर्शवावी यासाठी पोशीर धरणाच्या बोरगाव शेतकरी मंडळाने शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) भवन गाठले. यावेळी ठाकरे गटाकडून सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. तसेच, हा प्रकल्प येथून हटवण्यासाठी शिवसेना तुमच्या पाठीशी असेल, असे शिवसेना नेते भास्कर जाधव यांनी सांगितले. पोशीर गावातील धरण प्रकल्पाच्या विरोधात गुरूवारी (दि.२९) मुंबईतील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) भवन येथे महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या प्रकल्पाला विरोध दर्शवत ग्रामस्थांच्या बोरगाव शेतकरी मंडळाने शिवसेना नेते आमदार भास्कर जाधव यांची भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी ग्रामस्थांच्या मागण्या आणि प्रकल्पाबाबतचा विरोध मांडण्यात आला. या भेटीवेळी उपजिल्हा प्रमुख नितीन सावंत, तालुका प्रमुख बाजीराव दळवी, तालुका सचिव रामदास घरत, विभाग प्रमुख लक्ष्मण पोसाटे, कर्जत बचाव समितीचे अध्यक्ष ॲड. कैलास मोरे, बोरगाव शेतकरी मंडळाचे अध्यक्ष तानाजी चौधरी, दिनेश पाटील, सुधीर शेळवळे, ललित धस, समीर खडेकर,नितीन पाटील, जनार्दन पाटील, रवींद्र चौरे, हरिश्चंद्र शेळवळे आदी उपस्थित होते. दरम्यान, आम्ही शिवसेना पक्ष स्थानिकांच्या बरोबर असून, कोणत्याही स्थितीत धरण रद्द झाले पाहिजे अशी आरपारची लढाई काढण्यासाठी सर्वांनी सज्ज व्हावे, असे आश्वासन शिवसेना नेते भास्कर जाधव यांनी दिले.

सार्वजनिक सूचना

सूचना सर्वसामान्य जनतेला कळविण्यात येते की आमच्या ग्राहकांनी, शेतजमीन/बिन-शेतजमीन मिळकतीचे खालील रकान्यामध्ये नमूद मालक यांच्याकडून शेतजमीन मिळकती खरेदी करण्यास सहमती दर्शविली आहे.

मालमत्तेचे वर्णन
मौजे तुपगाव ता खालापूर. जि.रायगड

सर्व्हे/हिस्सा क्रमांक	मालक	क्षेत्र (हे.आर.चौ.मी.)	प्रकार	आकार (रु.पै.)
१५०/१	क्लॅरिजेस सेझ प्रायव्हेट लि.	०१-४३-४०	बिन-शेतजमीन	१४३४
१५०/२/ब	कॅप्टन अवतेजिंदर सिंग मान	००-८०-००	बिन-शेतजमीन	८००
१५०/३/ब	कॅप्टन अवतेजिंदर सिंग मान	००-३०-००	बिन-शेतजमीन	३००
१५१	कॅप्टन अवतेजिंदर सिंग मान	००-६९-००	बिन-शेतजमीन	६९०
१५२/१	पूजा नंदा प्रिया नंदा मोना नंदा पायल सखूजा	००-०८-१०	शेतजमीन	०.०८
१५२/२/अ	अवतेजिंदर सिंग मान	००-२०-१०	शेतजमीन	०.४१
१७९/२	कॅप्टन अवतेजिंदर सिंग मान	००-४६-५०	शेतजमीन	०.५५
	एकूण बिन - शेतजमीन -०३-२२-४० (हे आर चौ.मी.) (i.e ३२२.४० गुंठा) एकूण शेतजमीन - ००-७४-७० (हे आर-चौ.मी.) (i.e ७४.७० गुंठा)			

कोणत्याही व्यक्तीस वरील नमूद केलेल्या शेतजमीन विक्री, विनिमय, तारण, भार, भेट, देखभाल, वारसा, ताबा, भाडेपट्टा, उपभाडेपट्टा, हक्क, परवाना, हायपोथिकेशन, मालकी हक्काचा हस्तांतरण, कोणत्याही ट्रस्टखालील लाभदायी हक्क, प्रिएप्शन हक्क, प्रथम खरेदी हक्क, करार, डिक्री, आदेश, निर्णय किंवा इतर कोणत्याही प्रकारे दावा, आक्षेप, स्वास्थ्य किंवा वाद असल्यास त्यांनी त्यांचे दावे/आक्षेप/वाद याबाबतची कागदपत्रे सादर करून या सूचनेच्या प्रकाशनापासून एकवीस (२१) दिवसांच्या आत खाली सही करणाऱ्याशी संपर्क साधावा. अन्यथा आमचे क्लायंट वरील मालकाशी विक्री व्यवहार पूर्ण करतील आणि नंतर कोणताही तृतीय पक्षाचा दावा/आक्षेप/वाद विचारात घेतला जाणार नाही.

श्री. विशाल सिंह
M/S VR LEGAL & Co.
कार्यालय क्र.२२५. थापर कॉम्प्लेक्स, प्लॉट क्र.५१. सेक्टर १५ सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.
संपर्क: +९१-९९२०३९०९५९
ईमेल आयडी : adv.vrlegal@gmail.com

पान १ वरुन

बंद फ्लॅटमध्ये आढळले भावंडांचे मृतदेह

संबंधित फ्लॅटमधून तीव्र दुर्गंधी येऊ लागल्याने इमारतीतील रहिवाशांनी सचिवांना याबाबत माहिती दिली. त्यानंतर बोळींज पोलिसांना कळविण्यात आले. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत फ्लॅटची पाहणी केली असता तिघांचे मृतदेह आढळून आले.

कायद्याला हरताळ फासण्याचे कामः सपकाळ

प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह प्रदेश सरचिटणीस नंदा म्हात्रे, मिलिंद पाडगावकर, श्रद्धा ठाकूर, जिल्हाध्यक्ष डॉ.मनिष पाटील, राजाभाऊ ठाकूर, महिला जिल्हाध्यक्ष ॲड. श्रुती म्हात्रे, रेखा घरत, निखिल ढवळे, दिनानाथ देशमुख, संजय गवळी, सुरज पंडित, ऋषीकेश पवार आदी मान्यवर प्रदेश अध्यक्ष उपस्थित होते.

यावेळी बोलतांना सपकाळ यांनी, संरक्षित वन असताना देखील बुलडोझर फिरवण्याचे काम मुख्यमंत्री करीत असून, टोरंट कंपनीला लाभ देण्यासाठी सरकारी यंत्रणा कामाला लागली आहे. निवडक उद्योगपती यांना खुश करण्यासाठी जंगल नष्ट करण्याचे काम केले असून, देशात आदिवासी लोकांना वन हक्क कायद्याने त्यांच्या वहिवाटीची जमीन मिळाली. मात्र, तीच जमीन हेच मुख्यमंत्री टोरंटसाठी द्यायला निघाले असून, देशाचे माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी आणलेला कायद्याला हरताळ फासण्याचे काम सरकार ठरवून करीत असल्याचा आरोप यावेळी केली. तर, वन हक्क कायद्याने जमिनी द्यायच्या आणि त्या जमिनी आपल्या उद्योगपती मित्रासाठी आंदण देऊन टाकायच्या, असा घणाघात सपकाळ यांनी केला. तसेच, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ''एक पेड माँ के नाम'' ही संकल्पना या ठिकाणी माझ्याकडून राबवली गेली. मी या ठिकाणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आईंच्या नावाने झाड लावले असून, ते झाड जगवण्याची जबाबदारी येथील ग्रामपंचायत प्रशासन आणि वन हक्क समिती यांनी घेतली असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, जंगलतोड झालेल्या भाग सेन्सिटिव्ह झोन असताना आम्ही स्वस्थ बसणार नाही, मुख्यमंत्र्यांनी शहाणपण दाखवण्याची गरज आहे; परंतु, त्यांचा अहंकार अडवा येत असून, त्यांना भ्रष्टाचाराच्या पलीकडे काहीही दिसत नाही. देशाचे सत्ताधारी नेते महाराष्ट्र लुटण्याचे काम करीत असून, स्थानिकांच्या पाठीशी आम्ही कायम असून, आम्ही काँग्रेस पक्षाच्यावतीने न्यायालयात याचिका दाखल करणार आहोत, अशी माहिती हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली.

१३ वर्षीय मुलीचा विनयभंग

याबाबत आपल्या नातेवाइकांना माहिती दिली. त्यानंतर नातेवाइकांनी पोलिसांकडे तक्रार केली. या तक्रारीच्या आधारे कळंबोली पोलिसांनी ६१ वर्षीय आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला असून, या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

दिवा-मुंब्र्यात ड्रग्ज तस्करीचे मोठे जाळे

आले असून, दोन नायजेरियन नागरिकांना अटक करण्यात आली आहे. या कारवाईमुळे अमली पदार्थांच्या अवैध व्यापाराविरोधात पोलिसांनी महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा पोलिस ठाण्यात नोंद असलेल्या गुन्ह्यांच्या तपासादरम्यान पोलिसांना अमली पदार्थांच्या तस्करीसंदर्भात महत्त्वाचे धागेदोरे मिळाले. त्यानंतर पोलिसांनी सापळा रचून दोन संशयितांना ताब्यात घेतले आहे. अकुबा केनेथ (४५) आणि संडे इझिनिक (४७) असे अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. या कारवाईत पोलिसांनी २ किलो १८ ग्रॅम एमडी, ३१६.५ ग्रॅम कोकेन आणि सहा मोबाईल फोन जप्त केले आहेत. जप्त करण्यात आलेल्या अमली पदार्थांची एकूण किंमत सुमारे २ कोटी २० लाख रुपये असल्याची माहिती समोर आली आहे.

अखेर मीनाक्षी शिंदेंचा राजीनामा

का लावली आहे? असा सवाल आदित्य ठाकरे यांनी केला. तसेच, आम्ही न्याय मागत असताना ठाण्याच्या खासदारांची भाषा बघा, असे सांगत नरेश म्हस्के यांच्यावरही टीका केली. ठाणेकरांच्या दबावानंतर मीनाक्षी शिंदेंचा राजीनामा झाला आहे. मग आता त्यांना अटक कधी करणार? असा सवालही आदित्य ठाकरे यांनी केला.

पनवेल महानगरपालिका, पनवेल
ई-निविदा सूचना
विद्युत विभाग

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने ई - निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ब-१ नमुन्यातील खालील नमूद कामांची निविदा महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील विद्युत विभागाकडील नोंदणीकृत ठेकेदाराकडुन मागविण्यात येत आहे.

अ क्र	निविदा क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम (GST सोडुन)	निविदा अनामत रक्कम (रु)	कोरी ई निविदा किंमत (रु)
१.	पमपा/विद्युत /०७/ २०२६	पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील खारघर शहर व अंतर्गत गावे तसेच बीड, अडवली व रोहिंजण हद्दीमधील पथदिप व्यवस्थेचे तीन वर्ष कालावधीकरिता दैनंदिन परिचालन देखभाल दुरुस्ती. सुधारणा व नूतनीकरण करणे.	७,८२,१४,६१६/-	३,९१,०७३/-	३,५४०/-
२.	पम्पा/विद्युत /०८/२०२६	पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील पनवेल शहर व अंतर्गत गावे तसेच काळुंद्रे हद्दीमधील पथदिप व्यवस्थेचे तीन वर्ष कालावधीकरिता दैनंदिन परिचालन, देखभाल, दुरुस्ती, सुधारणा व नुतनीकरण करणे.	४,४८,४५,५८६/-	२,२४,२२८/-	३,५४०/-
३.	पपा/विद्युत/ ०९/२०२६	पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील तळोजा फेज १, २ व अंतर्गत गावे तसेच , कोयनावेळे धानसर, पिसावें, तुर्भे, करवले बु, तळोजा मजकूर हद्दीमधील पथदिप व्यवस्थेचे तीन वर्ष कालावधीकरिता दैनंदिन परिचालन, देखभाल, दुरुस्ती सुधारणा व नुतनीकरण करणे	४,५८,३६,१९२/-	२,२९,१८०/-	३,५४०/-
४.	पपा/विद्युत /१०/२०२६	पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सायन-पनवेल महामार्ग व जुने मुंबई-पुणे महामार्गावरील पथदिप व्यवस्थेचे तीन वर्ष कालावधीकरिता दैनंदिन परिचालन, देखभाल, दुरुस्ती, सुधारणा व नुतनीकरण करणे.	३,२६,०७,८८९/-	१,६३,०३९/-	२,३६० /-
५.	पपा/विद्युत /१४/२०२६	पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील कामोठे शहर व अंतर्गत गावे पथदिप व्यवस्थेची तीन वर्ष कालावधीकरिता दैनंदिन परिचालन, देखभाल, दुरुस्ती, सुधारणा व नुतनीकरण करणे	३,८९,२०,८०५/-	१,९४,६०४/-	३,५४०/-
६.	पपा/विद्युत /१२/२०२६	पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील कळंबोली शहर व अंतर्गत गावे तसेच रोडपाली, खिडुकपाडा हद्दीमधील पथदिप व्यवस्थेची तीन वर्ष कालावधीकरिता दैनंदिन परिचालन, देखभाल, दुरूस्ती, सुधारणा व नूतनीकरण करणे.	४,०५,३८,७९१/-	२,०२,६९४/-	३,५४०/-
७.	पपा/विद्युत /१३/ २०२६	पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नवीन पनवेल व अंतर्गत गावे तसेच आसूडगाव, टेंभोडे हद्दीमधील पथदिप व्यवस्थेची तीन वर्ष कालावधीकरिता दैनंदिन परिचालन, देखभाल, दुरुस्ती, सुधारणा व नुतनीकरण करणे	५,५२,६९,२४०/-	२,७६,३४६/-	३,५४०/-
८.	पपा/विद्युत /११/२०२६	पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नावडे फेज २ व अंतर्गत गावे तसेच नावडे, पेंधर, पडघे, तोंढरे, घोट, घोटचाळ, देवीचापाडा, पालेखुर्द हद्दीमधील पथदिप व्यवस्थेचे तीन वर्ष कालावधीकरिता दैनंदिन परिचालन, देखभाल, दुरूस्ती, सुधारणा व नुतनीकरण करणे.	३,३८,३७,८७३/-	१,६९,१८९/-	२,३६०/-

या निविदेबाबतची विस्तृत माहिती पनवेल महानगरपालिका संकेत स्थळ https://mahatenders.gov.in या साईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. याची सर्व संबंधित निविदा धारकांनी नोंद घ्यावी.

जा. क्र/पमपा/विद्युत/१९२६/प्र.क्र.१०२/१२७६/२०२६
दिनांक- २९/१०/२०२६

(राजेश कडिंले)
शहर अभियंता
पनवेल महानगरपालिका

चौल नाका ते खारगल्लीपर्यंत धुळीचे साम्राज्य

■ पर्यटकांच्या गर्दीने वाहतूक कोंडीचा धोका ■ ग्रामस्थांच्या आरोग्याशी खेळ सुरूच

। रेवदंडा । प्रतिनिधी ।

रेवदंडा ते अलिबाग या मुख्य मार्गावरील चौल नाका ते खारगल्लीदरम्यान सुरू असलेल्या सिमेंट काँक्रीटच्या रस्त्याच्या कामामुळे वाहनचालक आणि स्थानिक ग्रामस्थ अक्षरशः हैराण झाले आहेत. अनेक ठिकाणी काँक्रीटचे काम सुरू असताना काही ठिकाणी रस्ता खोदून ठेवण्यात आल्याने संपूर्ण परिसरात धुळीचे साम्राज्य पसरले आहे. वाहनांची ये-जा सुरू असताना उडणारी धुळ नागरिकांच्या नाकातोंडात जात असून, श्वसनाचा त्रास, डोळ्यांची जळजळ यांसारख्या तक्रारींची भीती वाढली आहे.

विकासाच्या नावाखाली सुरू असलेल्या कामाचा त्रास नागरिकांनीच सहन करायचा



● (छायाचित्र : निलेश फुंडे)

का, असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे. रेवदंडा-अलिबाग हा परिसरातील दळणवळणाच्या दृष्टीने महत्त्वाचा मार्ग आहे. या रस्त्यावरून दररोज स्थानिक नागरिक, कामगार, विद्यार्थी, व्यावसायिक तसेच अवजड आणि हलक्या वाहनांची मोठ्या प्रमाणावर वाहतूक होते. त्यातच रस्त्याच्या कामासाठी काही ठिकाणी खोदकाम करण्यात आले असून, वाहनांच्या वर्दळीमुळे धुळीचे लोट हवेत पसरत आहेत. धुळ उडू नये म्हणून काही ठिकाणी पाण्याची फवारणी केली जात असली, तरी ती पुरेशी आणि नियमित आहे का, हा प्रश्न कायम आहे.

रस्त्याचे काम सुरू असताना परिसरातील घरे, दुकाने आणि रस्त्यालगतच्या व्यवसायांमध्ये धुळ शिरत आहे. दुचाकीस्वारांना समोरचे वाहन स्पष्टपणे दिसण्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता असून, धुळीमुळे अपघाताचा धोकाही वाढू शकतो.

लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि श्वसनासंबंधी त्रास असलेल्या व्यक्तीना अशा वातावरणाचा अधिक त्रास होऊ शकतो. त्यामुळे कामाच्या ठिकाणी नियमित पाण्याची फवारणी, खोदलेल्या भागाची सुरक्षित व्यवस्था, माती व बांधकाम साहित्याची योग्य हाताळणी आणि वाहनचालकांना स्पष्ट सूचना देणे आवश्यक आहे. मात्र, या मूलभूत बाबींची प्रभावी अंमलबजावणी होत आहे का, याकडे संबंधित विभागाने लक्ष देणे गरजेचे आहे.

शनिवार-रविवार या सुट्टीच्या दिवशी अलिबाग, चौल, रेवदंडा परिसरात पर्यटकांच्या वाहनांची मोठी गर्दी होते. अशा वेळी रस्त्याचे सुरू असलेले काम, खोदलेले भाग आणि अपुरी दिशादर्शक व्यवस्थामुळे वाहतुकीचा वेग मंदावून कोंडी निर्माण होण्याची शक्यता आहे. अरुंद झालेल्या रस्त्यावर एकाच वेळी दोन्ही बाजूंनी वाहनांची गर्दी झाल्यास परिस्थिती अधिक गंभीर होऊ शकते.

रस्त्याचे काँक्रीटीकरण ही विकासाच्या दृष्टीने आवश्यक बाब असली, तरी काम सुरू असताना नागरिकांना धुळ, वाहतूक कोंडी आणि अपघाताच्या धोक्याला सामोरे जावे लागणे योग्य नाही. संबंधित विभागाने कामाचा वेग, गुणवत्ता आणि सुरक्षितता या तिन्ही बाबींवर लक्ष केंद्रित करावे. धुळ नियंत्रणासाठी नियमित पाणी फवारणी, रस्त्याच्या कामाच्या ठिकाणी पुरेसे सुरक्षा फलक, शनिवार-रविवार विशेष वाहतूक नियोजन आणि कर्मचाऱ्यांच्या कामकाजावर देखरेख या उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अशी मागणी वाहनचालक आणि ग्रामस्थांकडून होत आहे.

दिशादर्शक फलकांचा अभाव

रस्त्याचे काम सुरू असलेल्या ठिकाणी पुढे खोदकाम आहे, रस्ता अरुंद झाला आहे. वाहतुकीचा मार्ग बदलला आहे किंवा वेग कमी करणे आवश्यक आहे, याची माहिती वाहनचालकांना पुरेशा अंतरावरून मिळणे अत्यावश्यक आहे. यासाठी ठळक अक्षरांतील दिशादर्शक फलक, धोक्याचे इशारे, रात्री स्पष्ट दिसणारे परावर्तित फलक, सुरक्षित अडथळे आणि आवश्यक ठिकाणी दिव्यांची व्यवस्था करावी. अचानक समोर येणाऱ्या खोदलेल्या रस्त्यामुळे वाहनचालक गोंधळल्यास अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अपघात घडल्यानंतर उपाययोजना करण्याऐवजी संभाव्य धोका ओळखून आधीच खबरदारी घेणे ही संबंधित यंत्रणेची जबाबदारी आहे.

सुरक्षा रक्षकांच्या कामकाजाव प्रश्न चिन्ह

वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आणि नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी तैनात असलेल्या होमगार्ड व सुरक्षा रक्षकांच्या कामकाजाबाबतही स्थानिक नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे. काही कर्मचारी वाहतूक नियंत्रणाऐवजी मोबाईल फोनमध्ये व्यस्त असल्याचे नागरिकांकडून बोलले जात आहे. या तक्रारींची संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून शहानिशा करावी.

ग्रामविकास अधिकाऱ्याला मारहाण

पनवेलः कोळखे ग्रामपंचायतच्या ग्रामविकास अधिकाऱ्याला मारहाण करून त्यांच्या हाताच्या करंगळीच्या बाजूचे बोट फ्रॅक्चर झाल्या प्रकरणी ठेकेदार निलेश म्हात्रे आणि संदेश कदम यांच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात (दि.२८) ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. रेवननाथ ढेरे हे कोळखे येथील ग्राम विकास अधिकारी असून २८ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ च्या सुमारास ते पंचायत समिती पनवेल येथे गेले होते. यावेळी ते कामकाज संपवून बाहेर येत असताना निलेश आणि संदेश हे त्यांना भेटले आणि अतुल मालकर यांनी कोळखे पेठ गावातील अंतर्गत गटारे आणि मुख्य गटार आरसीसी पाईपलाईन बांधकाम यांचे बिल तुम्ही का काढले नाही याबाबत विचारणा केली. तसेच माझा फोन का घेत नाहीस असे बोलून ढेरे त्यांना शिवीगाळ केली तसेच दोघांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

निवडक

विनयभंगाचा गुन्हा दाखल

नवीन पनवेल : बसचालकाने महिलेला शब्दउच्चार करून हावभाव केले आणि त्याखाली उतरत असताना त्यांची वाट अडवण्यासाठी दोन्ही हात वर केल्याप्रकरणी सागर हिराजी कोळभु (रा.दिवाळेगाव) यांच्या विरोधात २६ ऑक्टोबर रोजी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यातील पीडित महिला या २६ ऑक्टोबर रोजी तळोजा फेस वन बस स्टॉप जवळ एन एम एम टी बस ने प्रवास करत होत्या. यावेळी बस चालक सागर कोळभू यांनी पीडित फिर्यादी यांना शब्दोचार करून हावभाव केले आणि त्या बसमधून पाठीमागून खाली उतरत असताना त्यांची वाट अडवण्यासाठी दोन्ही हात वर केले.

मरीआई हॉटेलच्या किचनला आग

पनवेल : सुकापूर येथील पेट्रोल पंपाशेजारी असलेल्या मरीआई हॉटेलच्या किचनमध्ये आग लागल्याची घटना घडली. माहिती मिळताच पनवेल महानगरपालिकेच्या नवीन पनवेल अग्निशमन केंद्रातील जवानांनी घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणली. अग्निशमन दलाच्या तत्पर कारवाईमुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळली. हॉटेलच्या किचनमध्ये आग लागल्याची आणि एक्झॉस्ट लाईन टेरेसपर्यंत पोहोचल्याची माहिती नवीन पनवेल अग्निशमन केंद्राला दूरध्वनीद्वारे देण्यात आली. त्यानंतर अग्निशमन वाहन क्रमांक एमएच ४६ सीयू ०१५० सह जवान तातडीने घटनास्थळी दाखल झाले. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी सुरुवातीला एबीसी अग्निशामक यंत्राचा वापर करण्यात आला. त्यानंतर होज रीलच्या साहाय्याने टेरेसपर्यंत पाण्याची लाईन नेऊन एक्झॉस्ट लाईनचे कुलिंग करण्यात आले. जवानांच्या प्रयत्नांमुळे आग पूर्णपणे आटोक्यात आली. या घटनेत जीवितहानी किंवा नुकसानीबाबतची माहिती उपलब्ध झालेली नाही.



म्हसळ्यात 'मत वाचवा, देश वाचवा' अभियानाला प्रतिसाद

म्हसळा : मतचोरी आणि चुकीच्या एसआयआर प्रक्रियेच्या विरोधात काँग्रेसच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'मत वाचवा, देश वाचवा' अभियानाला म्हसळा तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रायगड जिल्हा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजा ठाकूर यांच्या तीन दिवसीय तालुका दौऱ्यात त्यांनी कथित मतचोरीविरोधात आवाज उठविणे आणि एसआयआर प्रक्रियेतील त्रुटींबाबत जनजागृती करणे हा अभियानाचा प्रमुख उद्देश होता. मतदार यादीतील नोंदींची अचूकता, पात्र मतदारांचे मतदानाचे अधिकार आणि निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता या मुद्द्यांवर अभियानाच्या माध्यमातून लक्ष केंद्रित करण्यात आले. तीन दिवसांच्या दौऱ्यात ठाकूर यांनी तालुक्यातील विविध ठिकाणी भेटी देत नागरिकांपर्यंत अभियानाचा संदेश पोहोचविला. या दौऱ्याला मिळालेल्या प्रतिसादामुळे काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. मतदारांचे अधिकार अबाधित राहावेत आणि निवडणूक प्रक्रिया पारदर्शक व्हावी, या मागण्यांसाठी 'मत वाचवा, देश वाचवा' अभियानाच्या माध्यमातून काँग्रेसने म्हसळा तालुक्यात जनजागृतीवर भर दिला.

क्रांतिकारी कट्ट्याचे नदीत उतरून आंदोलन

। नेरळ । प्रतिनिधी

कर्जत तालुक्यातील पाली सायडोंगर येथील जंगलातील झालेल्या बेसुमार जंगलतोड विरुद्ध राज्यभर रान पेटले आहे. राज्याच्या अनेक भागातून पर्यावरणप्रेमी येत असून मुंबईतून आलेले छत्रपतींचे मावळे आणि क्रांतिकारी कट्ट्याचे प्रमुख शाहीर बादल यांनी येथे अनोखे आंदोलन सुरू केले आहे.

क्रांतिकारी कट्टाकडून टोरंट विरोधात जोरदार आंदोलन चोहोबाजूंनी सुरू आहे. त्यात अनेकांनी वेगवगेळी आंदोलने केली आहेत. मुंबईतून येथे आलेले क्रांतिकारी कट्टा यांनी गेली दिवस जंगलात राहून जंगलतोड विरुद्ध जनजागृती मोहीम हाती घेतली आहे. सरकारकडून धरण रद्द होण्याची



घोषणा होत नसल्याने क्रांतिकारी कट्टा यांनी थेट पेज नदीच्या पाण्यात उतरून आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाला मोठा पाठिंबा मिळत असून तेथे त्यांच्यासोबत अनेक तरुण पाण्यात उतरून आंदोलनात सहभागी होत आहे.

माथेरान प्लास्टिकच्या विळख्यात

। माथेरान । प्रतिनिधी ।

माथेरानच्या संपूर्ण परिसराला प्लास्टिक कचऱ्याने वेढल्यामुळे याच प्लास्टिकमुळे हवेतील गारवा हळूहळू संपुष्टात येऊन उष्मां जाणवत आहे. माथेरान हे प्लास्टिकमय बनल्याने असंख्य झाडे सुकून चालली असून अतिवृष्टीत आपोआपच उन्मळून पडताना दिसतात. त्यामुळे विविध ठिकाणी जंगल उजाड होताना दिसून येते. हीच परिस्थिती कायम राहिली तर भविष्यात इथल्या पर्यावरणाचा ऱ्हास होऊन पर्यटन लोप पावण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. याचा इथल्या पर्यटनावर विपरीत परिणाम होऊ शकतो.

नगरपरिषदेच्या माध्यमातून घनकचरा व्यवस्थापन ठेक्यासाठी लाखो रुपयांची उधळण केली जाते परंतु सद्यस्थितीत तेवढा कचरा गोळा केला जात नसल्याचे बोलले जात आहे. गावातील होतकरू युवक नेहमीच या प्लास्टिक कचऱ्याचे संकलन



करण्यासाठी पुढाकार घेत आहेत. त्यामुळे काहीअंशी का होईना प्लास्टिक गोळा केले जात आहे. नगरपरिषद दरवर्षी घनकचरा व्यवस्थापन ठेकेदाराला लाखो रुपये देते तेच काम गावातील स्वच्छता दूतांना दिल्यास गाव निश्चितपणे चकाचक होईल यात शंकाच नाही असे ज्येष्ठ नागरिक बोलत आहेत.

काही वर्षांपासून धनगर समाजाचे अध्यक्ष स्वच्छता दूत राकेश कोकळे हे आपल्या मित्र परिवारासोबत वेळ काढून गावातील विविध ठिकाणी जाऊन डोंगर दर्यात उतरून जीवाची पर्वा न करता प्लास्टिक कचऱ्याचे संकलन एक सेवाभावी उपक्रम म्हणून राबवित असतात. वनखाते, नगरपरिषद यांनी यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे. वनसमितीने मागील वर्षांपासून काही महिला कामगार कचरा गोळा करण्यासाठी नियुक्त केलेल्या आहेत. वनसमिती आणि नगरपरिषद यांनी संयुक्तपणे स्वच्छता मोहीम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केल्यास माथेरान प्लास्टिक मुक्त होऊ शकते. वनसमितीकडे वाहन पार्किंगच्या माध्यमातून लाखो रुपयांची जमा आहे ही रक्कम स्वच्छतेच्या कामी उपयोगात आणल्यास प्लास्टिकचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

> वारंवार सांगून सुद्धा अधिकाऱ्यांच्या आणि प्रशासनाच्या ही बाब लक्षात का येत नाही. नगराध्यक्षांना विनंती करतो. एकदा माथेरानच्या पर्यावरणावर लक्ष देऊन माथेरानची वनराई प्लास्टिक मुक्त करण्याचा प्रयत्न करावा.
> -राकेश कोकळे
> स्वच्छतादूत माथेरान

जंगल वाचविण्यासाठी बादल यांची जनजागृती

। रायगड । प्रतिनिधी ।

टोरंट प्रकल्पाच्या नावाखाली कर्जत आणि भीमाशंकर परिसरातील हजारो झाडांची कत्तल करण्यात आली आहे. वृक्ष तोडीविरोधात वेगवेगळ्या सामाजिक, राजकीय संस्था, संघटनांसह स्थानिकांनी आवाज उठविला आहे. मुंबईतील लोककलाकार शाहीर बादल यांनी डफलीवर थाप मारून जंगल वाचविण्याची साद घातली आहे. शाहिरी परंपरेचा वारसा जपत त्यांनी निसर्गाचा आणि जंगलांचा नायनाट करणाऱ्या विकासाला लोककलेच्या माध्यमातून



विरोध केला आहे. तिसरी पिढी रस्त्यावर उतरली असून गावोगावी जाऊन जंगल वाचवा जनजागृती करण्याचे काम ते करीत आहेत.

बादल गेल्या चार दिवसांपासून ते भीमाशंकर आणि कर्जत परिसरातील जंगल भागात वास्तव्याला आहेत. जंगल वाचविण्यासाठी त्यांनी पोवाड्यांसह डफलीचा आधार घेतला आहे. यातून जनजागृती करून पर्यावरणाच्या रक्षणाचा संदेश जनतेपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न करीत आहेत. शाहीर बादल यांची मुलेही या उपक्रमात सहभागी होऊन जंगल वाचविण्याची साद घालत आहेत.

शाहिर बादल हे मुंबईतील भांडूप येथील रहिवासी आहेत. गेल्या २९ वर्षापासून निसर्गाच्या आणि जंगलाच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी काम करीत आहेत. त्यांचे आजोबा आणि त्यानंतर वडील यांनी देखील वन संरक्षणासाठी जनजागृती केली आहे.

पनवेलमध्ये पर्यावरणप्रेमींचे मूक निदर्शन

। पनवेल ग्रामीण । प्रतिनिधी ।

विकासासाठी जंगल आणि जैवविविधतेचा बळी जाऊ नये, या मागणीसाठी पनवेलमध्ये पर्यावरणप्रेमींनी मूक निदर्शने केली. कर्जत तालुक्यातील येथील प्रस्तावित ३,००० मेगावॉट क्षमतेच्या जलविद्युत प्रकल्पासाठी ३२ हजारांहून अधिक झाडे तोडण्याच्या मुद्द्यावरून पर्यावरणप्रेमींनी चिंता व्यक्त केली.

पनवेल वकील संघटना,



पनवेल ट्रेकर्स, नेचर फ्रेंड सोसायटी, सर्प विज्ञान संघटना आणि निसर्गमित्र संस्थेसह ठाणे, कुर्ला, मुलुंड, कर्जत व कामोठे येथील पर्यावरणप्रेमींनी वनसंपदेच्या संरक्षणासाठी एकजूट दाखवली. टोरंट कंपनीमुळे जंगल, वन्यजीवांचा अधिवास धोक्यात येण्याची भीती पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केली.

या निदर्शनांत उल्हास ठाकूर, संतोष उदरे, आर्यन उदरे, विघ्नेश पाटील, म्हस्कर भगिनी, नागेश हिरवे, प्रगती ठाकूर, सुरेश रिसबूड, धनंजय मदन, शेखर तारे, अक्षय गायकर, सेजल पाटील, वासंती थिटे, निनाद पाटील, प्रल्हाद बोडके आदी सहभागी झाले होते.

अनोळखी व्यक्तीचा मृत्यू

पनवेल : जेएनपीटीकडे जाणाऱ्या महामार्गालगत उरण वाहतूक शाखेच्या चौकीजवळ एक अनोळखी व्यक्ती बेशुद्ध अवस्थेत आढळून आली होती. त्याला इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. व्यक्तीची ओळख पटलेली नसून, पोलीसांनी त्याच्या नातेवाइकांचा शोध घेण्यासाठी नागरिकांना पुढे येण्याचे आवाहन केले आहे.



पालीत संकष्टी चतुर्थीला भक्तांची मांदियाळी

। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।

अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीत गुरुवारी संकष्टी चतुर्थीला भाविकांनी गर्दी केली होती. बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच लांब रांगा लागल्या होत्या. संकष्टी चतुर्थीनिमित्त हाजारो भाविक दाखल झाले होते.

बल्लाळेश्वर मंदिर व गाभाऱ्यात फुलांची सजावट करण्यात आली होती. बल्लाळेश्वरला देखील आभूषण व वस्त्र परिधान करण्यात आले होते. बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रभरातून भाविक दाखल झाले होते. यामुळे येथे चांगली आर्थिक उलाढाल झाली असून येथील स्थानिक व्यावसायिक सुखावले आहेत.

भाविकांमुळे येथील हॉटेल व्यावसायिक, लॉजिंग बोर्डिंग वाले, पापड, लोणचे मिरगुंड विक्रेते, पेढेवाले, रानभाज्या, छोटे मोठे दुकानदार व इतर व्यावसायिकांचा धंदा तेजीत होता. मंदिर परिसरातील दुकाने व हॉटेल ग्राहकांनी गजबजले होते. भाविकांच्या सोयीसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती. विविध वस्तूंनी भरलेली दुकाने व गर्दी यामुळे मंदिर परिसर गजबजलेला दिसत होता. मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप आले होते. अनेक भाविक स्वतःची वाहने घेवून आले होते. तर काही लक्झरी किंवा खाजगी बसेसने आले. यामुळे पालीतील रस्त्यावर वाहतूक कोंडी झाली होती.

। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।

कुंभारवाड्यात महाराजांचे पुतळे, मावळे तयार | लहान मुलांपासून तरुणाईपर्यंत सर्वांना आकर्षण

किल्ल्यांच्या प्रतिकृतींतून शिवशौर्याचा जागर

पनवेल दिवाळीचा सण म्हणजे दिव्यांचा प्रकाश, फराळाचा गोडवा आणि बालपणीच्या आठवणींचा खजिना! या सणाला छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याची आणि स्वराज्याच्या गौरवशाली इतिहासाची जोड मिळाली की, दिवाळीचा आनंद आणखी द्विगुणित होतो. दिवाळीत घरासमोर किंवा अंगणात साकारले जाणारे शिवकालीन किल्ले ही केवळ मातीची प्रतिकृती नसून, नव्या पिढीला स्वराज्याचा इतिहास सांगणारी जिवंत परंपरा आहे.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर विविध ठिकाणी किल्ल्यांच्या प्रतिकृती उभारण्याची लगबग सुरू झाली आहे. लहान मुलांपासून तरुणाईपर्यंत आणि ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनाच या किल्ल्यांचे आकर्षण असते. विशेषतः पनवेलच्या कुंभारवाड्यात दिवाळीनिमित्ताने छत्रपती



शिवाजी महाराजांचे पुतळे, त्यांचे मावळे, गड-किल्ले आणि शिवकालीन आरमार साकारण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे.

कुंभारवाड्यात तयार होणाऱ्या या प्रतिकृतींमधून शिवकालीन इतिहासाचे विविध पैलू उलगडतात. गडांचे बुरूज, तटबंदी, प्रवेशद्वारे, लढाईसाठी सज्ज असलेले मावळे आणि समुद्रावर स्वराज्याचे रक्षण करणारे आरमार अशा स्वरूपातील कलाकृतींना दिवाळीत विशेष मागणी असते. प्रत्येक मूर्ती आणि प्रत्येक किल्ला घडवताना कारागिरांचे कौशल्य, मेहनत आणि कल्पकता पणाला लागते. दिवाळीच्या सुट्टीत मातीचे किल्ले तयार करणे, त्यांची सजावट करणे आणि त्यावर शिवरायांचा पुतळा विराजमान करणे, हा अनेक कुटुंबांसाठी आनंदाचा सोहळा असतो. काही ठिकाणी तरुण मंडळी एकत्र येऊन मोठ्या किल्ल्यांचीनिर्मिती करतात. या उपक्रमातून एकी, सहकार्य आणि इतिहासाविषयीची आस्था यांचीही शिकवण मिळते.

कुंभारवाड्यातील कारागिरांच्या हातून आकार घेणारे हे पुतळे, मावळे, किल्ले आणि आरमार दिवाळीच्या बाजारात शिवप्रेमींचे लक्ष वेधून घेतात. या कलाकृतींमागे केवळ व्यवसाय नसून, महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वारशाशी जोडलेली सांस्कृतिक परंपराही जपली जात आहे.

मातीच्या किल्ल्यांतून इतिहासाशी नाळ

आजच्या डिजिटल युगात मोबाईल आणि संगणकाच्या विश्वात रमणाऱ्या मुलांना शिवकालीन इतिहासाची ओळख करून देण्यासाठी दिवाळीतील किल्ल्यांची परंपरा महत्त्वाची ठरते. किल्ला उभारताना मुलांना महाराजांचे पराक्रम, मावळ्यांचे शौर्य, स्वराज्याची संकल्पना आणि गड-किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व जाणून घेण्याची संधी मिळते. घरातील ज्येष्ठ मंडळीही मुलांना शिवरायांच्या पराक्रमाच्या गोष्टी सांगत या परंपरेत सहभागी होतात.

महागणपतीला भक्तांचा सागर

। चिरनेर । प्रतिनिधी ।

उरण तालुक्यातील चिरनेर महागणपती क्षेत्रात संकष्टी चतुर्थीच्या निमित्ताने गुरुवारी (दि.२९) पहाटेपासूनच भाविकांनी प्राचीन जागृत महागणपतीच्या दर्शनाचा लाभ घेतला. पहाटे चार वाजल्यापासून भक्तांच्या दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले होते. संकष्टीच्या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिकांसह आदिवासी महिलांना रोजगाराची चांगली संधी उपलब्ध झाली होती. संकष्टीनिमित्ताने पारंपारिक व स्थानिक उत्पादनांना बाजारपेठेत मोठी मागणी असल्यामुळे दर महिन्याच्या चतुर्थीच्यानिमित्ताने रोजगार मिळत आहे.

भाजपला स्पष्ट दणके

विधानपरिषदेच्या निवडणुकांचे निकाल हे देशातील वातावरण बदलत आहे याची चुणूक दाखवणारे आहेत. देशभरातील निकालांमध्ये काँग्रेसला नागपूर वगळता यश मिळालेले नाही. त्याचा उल्लेख करून नरेंद्र मोदी यांनी काल काँग्रेसला डिवचले. मतपेटीच्या आधारे घेतलेल्या या निवडणुकीत काँग्रेसला किती जागा मिळाल्या असा सवाल त्यांनी केला. पण काँग्रेसचे अपयश म्हणजे भाजपचा जय ठरत नाही. किंबहुना, खुद्द पंतप्रधानांच्या वाराणसी मतदारसंघातील दोन्ही जागांवर समाजवादी पक्षाने मुसंडी मारली. उत्तर प्रदेशातील ११ पैकी सहा जागा भाजपने तर पाच जागा समाजवादी पक्षाने जिंकल्या. उत्तर प्रदेशात पुढील वर्षी विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. ते पाहता वाराणसीसह सर्वत्र भाजपच्या विरोधातील नाराजी स्पष्टपणे दिसत आहे. पण ती दडवून ठेवून मोदी गवगवा कसला करताहेत तर काँग्रेसच्या पराजया. समाजवादी पक्षाने गेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपहून अधिक जागा मिळवल्या होत्या. किंबहुना २०२४ मध्ये मोदींची सर्वाधिक पीछेहाट उत्तर प्रदेशातच झाली होती. विधानसभेलाही समाजवादी पक्षाने योगी आदित्यनाथ यांच्या नाकी नऊ आणले होते. आताच्या निकालावरून समाजवादी पक्षाने जनतेतील आपले स्थान बळकट कायम राखले आहे हे स्पष्ट दिसते. राहुल गांधी यांच्या सध्याच्या निवडणूक आयोगाविरुध्दच्या आंदोलनांमध्ये अखिलेश यांचा समाजवादी हाच सर्वात महत्वाचा साथीदार होता. याचाच अर्थ त्यांच्या भाजपविरोधी भूमिकेला देशातील सर्वात मोठ्या राज्यातून मोठा पाठिंबा मिळतो आहे. काँग्रेसला कर्नाटक व इतरत्र फटका नक्कीच बसला आहे. कर्नाटकात स्वतःचे राज्य असून तिथे चारपैकी एकही जागा काँग्रेसला जिंकता आलेली नाही. जनता दल आणि भाजप यांच्या युतीने मोठा विजय मिळवला. काँग्रेसने नक्कीच याचे आत्मपरीक्षण करायला हवे. पण कर्नाटकातील या सर्व जागा पूर्वी भाजपकडेच होत्या व त्या त्याने राखल्या आहेत. काँग्रेसच्या विरोधात नव्याने विजय मिळवलेला नाही हाही एक बारकावा लक्षात ठेवण्यासारखा आहे. बिहारमध्ये जनसुराज्य पक्षाने एक जागा जिंकून आपले महत्व वाढवले आहे.

महाराष्ट्रातील दारुण हार

इकडे महाराष्ट्रात पदवीधरांच्या पुणे, औरंगाबाद व नागपूर या तीनही मतदारसंघांमध्ये भाजप आणि महायुतीला दणका बसला. या सर्व जागा खुद्द देवेंद्र फडणवीसांनी प्रतिष्ठेच्या केल्या होत्या. पुण्यात गेल्या वेळी पदवीधर मतदारसंघातून निवडून आलेले राष्ट्रवादीचे अरुण लाड यांचे चिरंजीव शरद लाड यांनी मध्यंतरी भाजपमध्ये प्रवेश केला. त्यामुळे त्यांनाच उमेदवारी मिळेल अशी अपेक्षा होती. पण मुख्यमंत्र्यांच्या जवळच्यांनी चाव्या फिरवल्या आणि फडणवीसांनी स्मिता जाधव यांना उमेदवारी दिली. त्यांच्या विरोधात शरद पवार यांच्या पक्षाने उभ्या केलेल्या हर्षदा देशमुख यांनी बाजी मारून थेट फडणवीसांचाच पराभव केला आहे असे म्हणावे लागेल. कारण, केवळ उमेदवारी देऊन मुख्यमंत्री थांबले नव्हते. त्यांनी नगरसेवकांच्या जातीने बैठका घेऊन मतांची जबाबदारी त्यांच्यावर टाकली होती. पण यातल्या अनेक नगरसेवक किंवा त्यांच्या जवळचे लोक यांचीच नावे मतदारयादीत नसल्याचे उघड झाले. एकेकाळी प्रकाश जावडेकर, चंद्रकांत पाटील वगैरे मंडळी या मतदारसंघात जिंकत असत. पण आता तो मतदार भाजपपासून दूर गेला आहे. हीच स्थिती नागपुरातही झाली. तिथे फडणवीसांनी अनिल सोले या संघ व भाजपच्या जुन्या नेत्याला डावलले. सुधाकर कोहळे यांना उमेदवारी देऊन नंतर त्यांच्या विजयासाठी स्वतः दोन दिवस थांबून बैठका घेतल्या. हा पूर्वीचा नितीन गडकरी यांचा मतदारसंघ. त्यामुळे त्यांनाही बोलावण्यात आले. पण या कशाचाही उपयोग झाला नाही. गेल्या वेळीच काँग्रेसचे अभिजित वंजारी यांनी ही जागा खेचून आणली होती. यंदा शरद पवार राष्ट्रवादीचे नितेश कराळे गुरुजी यांच्या बंडखोरीमुळे गोष्टी अवघड झाल्या. कराळे यांनी मोठी मते घेऊन ताकद दाखवली. अखेर त्यांच्याच दुसऱ्या पसंतीच्या मतांवर वंजारी विजयी झाले. एरवी हे सगळे डावपेच लढवण्यात भाजपचे लोक महाहुशार झाले आहेत. पण नागपूरमध्ये ते चारीमुंड्या चीत झाले. औरंगाबादमध्ये अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे सतीश चव्हाण यांचा पराभव झाला. तीन वेळा त्यांनी ही जागा जिंकली होती. पण शरद पवार राष्ट्रवादीचे प्रतापसिंह जाधव यांनी त्यांना हरवले. प्रतापसिंह हे अत्यंत नेक कार्यकर्ते मानले जातात. सतीश चव्हाण यांच्या हातात अनेक शिक्षणसंस्था व दांडगाई करण्याची शक्ती असल्याने त्यांचे वर्चस्व मोठे होते. त्यांना भाजपची साथ होती. पण ते पराभूत झाले.

मध्यमवर्गीयही भाजपच्या विरोधात

अमरावतीत किरण सरनाईक हे पूर्वाश्रमीचे काँग्रेसचे नेते व गेल्या वेळी अपक्ष म्हणून निवडून आलेले उमेदवार पुन्हा जिंकले. त्या अर्थाने हा भाजप किंवा महायुतीचा विजय कमी व स्थानिक शिक्षक संघटनांचा अधिक असेच म्हणावे लागेल. त्यातल्या त्यात पुणे शिक्षक मतदारसंघात कौस्तुभ गावडे यांचा विजय हेच भाजपचे एकमेव यश होय. पण तिथेही महायुतीमध्ये मैत्रीपूर्ण लढत झाली व शिंदे गटाच्या उमेदवाराने दुसऱ्या क्रमांकाची मते घेतली. म्हणजे तिथेही भाजपला निर्भेळ विजय मिळालेला नाहीच. पदवीधर आणि शिक्षक हे सुशिक्षित मध्यमवर्गीय मतदार असतात. बहुतांश ठिकाणी हे मतदार एखाद्या पक्षाला बांधलेले असतात. त्यामुळेच जो अधिक नोंदणी करतो तो जिंकतो असा सर्वसाधारण नियम असतो. तरीही त्यात लोकमताचे प्रतिबिंब पडत असते. मराठवाड्यातील विजयामध्ये मनोज जरांगे यांच्या आंदोलनाचा व पाठिंब्याचा फायदा झाला असे शरद पवार गटाच्या स्थानिक नेत्यांनी म्हटले आहे. सर्वत्र मतपेट्यांमध्ये मतांसोबतच अनेक चिठ्ठ्या टाकलेल्या आढळल्या. त्यात आता बास झाले, इट्स डन ब्रो वगैरे जेन झीची भाषा दिसून आली. हा थेट कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनांचा परिणाम आहे. पूर्वापार शिक्षक व मध्यमवर्गीय हा भाजपचा हुकुमी मतदार होता. पूर्वी विधानसभेत जिंकून येण्याची मारामारी होती तेव्हा देवेंद्रांचे वडील असलेले गंगाधर फडणवीस, नितीन गडकरी, ना.स. फरांदे, राम कापसे इत्यादी मंडळी याच मार्गाने विधिमंडळात जात असत. आता विधानसभेत वाट्टेल त्या मार्गाने निवडून येऊ शकतो हे भाजपला कळले आहे. मतदारयादीतील गडबडींपासून मतदारांना पैशांची आश्वासने देण्यापर्यंत अनेकविध मार्ग त्यासाठी वापरले जात असतात असा विरोधकांचा आरोप आहे. निवडणूक आयोगाच्या अब्रूचा सध्या सर्वोच्च न्यायालयात जो पंचनामा चालू आहे त्यावरून हे आरोप खरे आहेत असे दिसू लागले आहे. मात्र काहीही केले तरी यश आपलेच गुर्मीमुळे भाजपवाले खऱ्या मतदारांपासून दुरावत चालले आहेत. ते संधी मिळताच आपले मत व्यक्त करतात व यापुढेही करतील. कोल्हापुरात गोकुळच्या निवडणुकीतही देवेंद्रांनी फार लक्ष घातले होते. तिथे काँग्रेसच्या बंटी पाटलांनी बाजी मारली. त्यापाठोपाठ या निवडणुकांचे निकाल भाजपच्या विरोधातच गेले आहेत. देशातही वातावरण फिरू शकते हे उत्तर प्रदेशात दिसले आहे. काँग्रेस व विरोधी पक्षांसाठी ही आशेची चाहूल आहे. जनतेच्या खऱ्या प्रश्नांवर लढा दिला, एकजूट कायम ठेवली व चुका केल्या नाहीत तर विजय त्यांचाच असेल.

विचार

टेलिफोनीवर भरवसा, कॅन्सरग्रस्तांना दिलासा

सरत्या आठवड्यामध्ये इतर क्षेत्रांप्रमाणेच टेलिफोनी क्षेत्रामध्ये जोरदार घडामोडी पहायला मिळाल्या. पहिले महत्वाचे वृत्त म्हणजे पुढील चार वर्षांमध्ये भारतात 'फाईव्ह जी'चे शंभर कोटी ग्राहक उभे राहणार आहेत तर 'रिलायन्स'ने 'सिक्स जी' सेवा पुरवण्याची तयारी सुरु केली आहे. दरम्यान, कॅन्सरवरील महागड्या औषधांमध्ये कपात होणार असल्याने सामान्यजनांना दिलासा मिळणार आहे.

महेश देशपांडे

सरत्या आठवड्यामध्ये इतर क्षेत्रांप्रमाणेच टेलिफोनी क्षेत्रामध्ये जोरदार घडामोडी पहायला मिळाल्या. या घडामोडी भविष्यवेधी आहेत. पहिले महत्वाचे वृत्त म्हणजे पुढील चार वर्षांमध्ये भारतात 'फाईव्ह जी'चे शंभर कोटी ग्राहक उभे राहणार आहेत तर 'रिलायन्स'ने 'सिक्स जी' सेवा पुरवण्याची तयारी सुरु केली आहे. दरम्यान, कॅन्सरवरील महागड्या औषधांमध्ये कपात होणार असल्याने सामान्यजनांना दिलासा मिळणार आहे. याच सुमारास गृहकर्ज घेताना घ्यावयाच्या दक्षतेबद्दलही काही महत्वाचे मुद्दे समोर आले आहेत.

भारतातील 'फाईव्ह जी' वापरकर्त्यांची संख्या सध्याच्या सुमारे ५५ कोटींवरून दुप्पट करून २०३० पर्यंत एक अब्ज अर्थात शंभर कोटी करण्याचे लक्ष्य असल्याचे समोर आले आहे. भारत 'फोर जी'च्या बाबतीत जगाच्या तुलनेत मागे होता; मात्र आता 'सिक्स जी'च्या क्षेत्रात जगाचे नेतृत्व करण्याचा देशाचा संकल्प आहे. आज देशात 'फाईव्ह जी'चे ५५ कोटी वापरकर्ते आहेत; २०३० पर्यंत 'फाईव्ह जी' वापरकर्त्यांची संख्या ५५ कोटींवरून एक अब्ज करण्याचे लक्ष्य आहे. भारताच्या 'सिक्स जी अलायन्स'मध्ये ९० संस्थांचा समावेश आहे. या क्षेत्रात भारताने आतापर्यंत सात हजार सातशे पेटंट मिळवले असून त्यापैकी ४,४०० आंतरराष्ट्रीय पेटंट आहेत. आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघटनेच्या (आयटीयू) परिषदेने २०३० मध्ये पूर्णाधिकार परिषदेचे आयोजन करण्यासाठी भारताच्या प्रस्तावाला मान्यता दिली. आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघटनेच्या 'वर्ल्ड टेलिकम्युनिकेशन स्टँडर्डायझेशन असेंब्ली' (डबल्यूटीएसए)चे आयोजन २०२४ मध्ये प्रथमच भारतात करण्यात आले होते. जीनिव्हाबाहेर आयोजित करण्यात आलेली ही 'आयटीयू'च्या इतिहासातील सर्वात मोठी 'डबल्यूटीएसए' बैठक होती.

देशातील ब्रॉडबँड वापरकर्त्यांची संख्या सहा कोटींवरून वाढून १.१ अब्ज झाली आहे. डेटाच्या किमतीतही मोठी घट झाली आहे. २०१४ मध्ये एक जीबी डेटासाठी सुमारे २६८ रुपये खर्च येत होता. आता हाच खर्च कमी होऊन सुमारे आठ रुपये झाला आहे. ही किंमत जगातील सर्वात स्वस्त डेटा दरांपैकी एक आहे. २०१४ मध्ये भारतातील मोबाइल फोन उद्योगाचा आकार सुमारे दोन ते तीन अब्ज डॉलर होता. आता तो वाढून ६३ अब्ज डॉलरचा उद्योग झाला आहे. भारत सध्या जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा मोबाइल फोन उत्पादक देश आहे. देशातून होणाऱ्या मोबाइल फोनच्या निर्यातीचे मूल्यही वाढले असून सध्या मोबाइल फोनची निर्यात सुमारे २९ अब्ज डॉलरवर पोहोचली आहे.

दरम्यान, 'रिलायन्स जिओ' आता केवळ 'फाईव्ह जी' नेटवर्कपुरते मर्यादित राहू इच्छित नाही. कंपनी आतापासूनच दूरसंचार क्षेत्रातील पुढील पिढीतील तंत्रज्ञान अर्थात 'सिक्स जी'च्या तयारीला लागली आहे. 'रिलायन्स जिओ इन्फोकॉम लिमिटेड'चे अध्यक्ष आकाश अंबानी यांनी सांगितले, की कंपनी स्वदेशी सॅटेलाइट तंत्रज्ञानाचा स्टॅक विकसित करण्यावर काम करत असून, 'प्री-सिक्स जी' तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात पेटंटसाठी अर्जही दाखल केले आहेत. कंपनीचा भर 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' अर्थात 'एआय'वर आधारित व्हॉइस आणि डेटा सेवा, 'सॅटेलाइट कनेक्टिव्हिटी' आणि 'सिक्स जी' यांसारख्या नव्या तंत्रज्ञानावर आहे. आकाश यांनी सांगितले, की 'जिओ सॅटेलाइट' तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही वेगाने पुढे जात आहे. कंपनी अशा स्वदेशी सॅटेलाइट तंत्रज्ञानाच्या विकासावर काम करत आहे, ज्याचा वापर भारताबाहेरही करता येऊ शकेल.

जिओ आगामी काळात आपले तंत्रज्ञान केवळ मोबाइल नेटवर्क आणि इंटरनेट सेवांपुरते मर्यादित ठेवू इच्छित नाही. कंपनी 'सॅटेलाइट कनेक्टिव्हिटी'सारख्या वेगाने विकसित होत असलेल्या क्षेत्रातही स्वतःचे तंत्रज्ञान विकसित करण्याच्या तयारीत आहे. आकाश यांनी सांगितले, की भारताने 'सिक्स जी' तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात जागतिक नेतृत्व करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. जिओ संशोधन, पेटंट आणि आंतरराष्ट्रीय मानकांच्या विकासाच्या माध्यमातून या दिशेने योगदान देणार आहे. पंतप्रधानांनी 'सिक्स जी'च्या क्षेत्रात भारताने जगाचे नेतृत्व करावे, असे लक्ष्य मांडले आहे. भारतातून दाखल होणाऱ्या 'सिक्स जी' पेटंटमध्ये दहा टक्के वाटा मिळवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी 'जिओ' मोठे योगदान देण्याच्या तयारीत असल्याचे अंबानी यांनी सांगितले. 'जिओ'ने 'सिक्स जी'चा व्यावसायिक वापर सुरू होण्यापूर्वीच त्याच्याशी संबंधित तंत्रज्ञानावर काम सुरू केले आहे. आज जिओ व्हॉइस आणि डेटा सेवांमध्ये एआयचा वापर करण्यावर काम करत आहे. त्यांच्या मते, 'एआय'च्या मदतीने व्हॉइस आणि डेटा सेवांमध्ये नव्या प्रकारचे प्रयोग आणि नवोन्मेष करता येऊ शकतात. याचा फायदा भारतातील कोट्यवधी मोबाइल वापरकर्त्यांना होऊ शकतो.

कॅन्सर रुग्णांना महागड्या औषधांच्या वाढत्या खर्चातून दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. सरकारने सर्व अनुसूचित नसलेल्या (नॉन-शेड्यूल्ड) कॅन्सरविरोधी औषधांवरील ट्रेड मार्जिन कमाल तीस टक्क्यांपर्यंत मर्यादित करण्याचा निर्णय घेतला आहे. हा नियम ब्रँडेड आणि जेनेरिक, देशात उत्पादित आणि आयात केलेली तसेच पेटंट असलेली आणि पेटंट नसलेली औषधे या सर्वांना लागू होणार आहे. या निर्णयाचा उद्देश औषधांच्या किमतीमध्ये समाविष्ट असलेले अत्यधिक ट्रेड मार्जिन कमी करणे हा आहे. त्यामुळे कॅन्सरच्या उपचारासाठी वापरली जाणारी जीवनरक्षक औषधे रुग्णांना तुलनेने कमी किमतीत उपलब्ध होण्यास मदत होईल. या निर्णयामुळे काही कॅन्सरविरोधी औषधांच्या कमाल किरकोळ किमतीत (एमआरपी) तब्बल ७० टक्क्यांपर्यंत घट होऊ शकते. यामुळे कॅन्सरच्या उपचारासाठी रुग्णांना स्वतःच्या खिशातून करावा लागणारा खर्च अर्थात 'आउट-ऑफ-पॉकेट एक्स्पेंडिचर' कमी होण्याची अपेक्षा आहे. सरकारच्या अंदाजानुसार, या निर्णयामुळे कॅन्सर रुग्णांची दरवर्षी सुमारे अडीच हजार कोटी रुपयांची बचत होऊ शकते. या निर्णयाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे नॉन-शेड्यूल्ड श्रेणीतील कॅन्सरविरोधी औषधांचा व्यापकपणे समावेश करण्यात आला आहे. म्हणजेच ब्रँडेड तसेच जेनेरिक, देशांतर्गत उत्पादित तसेच आयात केलेली आणि पेटंट असलेली तसेच पेटंट नसलेली औषधे या सर्वांवर ट्रेड मार्जिनची मर्यादा लागू होणार आहे. औषधाची मूळ किंमत आणि रुग्णाला प्रत्यक्षात मोजावी लागणारी रक्कम यामधील मोठी तफावत कमी करणे हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश आहे.

आता एक मार्गदर्शनपर माहिती. घर खरेदी करताना अनेकजण गृहकर्जाचा आधार घेतात. गृहकर्जाचा कालावधी २० ते ३० वर्षांचा असतो. कर्जाची रक्कमदेखील मोठी असते. त्यामुळे 'ईएमआय' चालू असेपर्यंत अनेक गोष्टींची दक्षता घेणे आवश्यक असते. बँका गृहकर्जाचे वाटप करताना कर्जदाराच्या उत्पन्नाच्या आधारे जितके अधिक कर्ज देता येईल तितकी रक्कम मंजूर करतात; मात्र त्या कर्जाचा 'ईएमआय' आपण खरेच भरू शकतो का, याचा विचार कर्जदाराने करणे आवश्यक आहे. कारण गृहकर्जाशिवाय काहीजणांची वैयक्तिक कर्ज, वाहन कर्ज यासारखी इतर कर्जेदेखील सुरू असतात. त्यामुळे घर खरेदी करताना 'इन हँड' पगाराच्या रकमेच्या ३० ते ४० टक्के रक्कम 'ईएमआय'मध्ये जावी, त्यापेक्षा अधिक रक्कम 'ईएमआय'मध्ये जाणे अडचणीचे ठरू शकते. गृहकर्ज हे दीर्घ कालावधीचे असते. त्यामुळे आर्थिक स्थितीमध्ये चढ उतार येऊ शकतात. काही वेळा नोकरी सुटते किंवा पगारात कपात होते. त्यामुळे गृहकर्जाचा 'ईएमआय' भरणे अवघड होते. यातून वाचण्यासाठी किमान सहा महिन्यांच्या 'ईएमआय'ची रक्कम आपत्कालीन निधी म्हणून तयार ठेवावी. गृहकर्ज काढताना फ्लोटिंग व्याजदर किंवा निश्चित व्याजदर याचा विचार करावा. 'फ्लोटिंग'व्याजदर 'रेपो रेट'मधील बदलांवर अवलंबून असतो. 'रेपो रेट' वाढल्यास 'ईएमआय'वाढतो.

गृहकर्ज घेताना फक्त व्याजदर पाहू नये, तर कर्जाशी संबंधित इतर गोष्टी म्हणजेच 'प्रोसेसिंग फी', लीगल तसेच 'टेक्निकल चार्जेस'याचा देखील विचार करावा. क्रेडिट स्कोअर ७५० पेक्षा अधिक असल्यास कमी व्याजदरावर गृहकर्ज मिळण्याची शक्यता असते. गृहकर्ज घेताना कर्जाचा कालावधीत जितका अधिक असतो, त्यानुसार गृहकर्जाचा 'ईएमआय' कमी रकमेचा असतो. म्हणजेच अधिक व्याज भरावे लागते; मात्र कमी कालावधी निवडल्यास व्याजाची रक्कम कमी असते. करिअर सुरू होत असताना तरुणांसाठी गृहकर्जाचा कालावधी दीर्घकाळाचा असणे फायदेशीर ठरते. गृहकर्जाच्या परतफेडीदरम्यान सुरुवातीच्या काळात 'ईएमआय'चा मोठा भाग व्याजाच्या परतफेडीत जातो. मुद्दल हळूहळू कमी होते. 'प्री-पेमेंट', 'पेनल्टी', 'फोरक्लोजर चार्जेस', 'लेट पेमेंटस फी'च्या सारख्या गोष्टींची माहिती असते, त्याची माहिती घेणे आवश्यक आहे.

चर्चा आजची

राष्ट्र उभारणीत नव्या पिढीची भूमिका महत्वाची

सुयोग आंग्रे

जनरल जी आणि जनरल अल्फा पिढ्या समजून घेताना सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे विद्यार्थी काय शिकत आहेत हा नसून ते कुठे शिकत आहेत? हा प्रश्न देखील महत्त्वाचा आहे कारण विद्यार्थी केवळ पाठ्यपुस्तकातून शिकत नाही. तो त्याच्या आजूबाजूच्या वागण्यातूनही शिकतो, कुटुंबाकडून शिकतो, मित्रांकडून शिकतो, शिक्षकांकडून शिकतो आणि आज पूर्वीपेक्षा जास्त, डिजिटल जगातून शिकतो. तो जे पाहतो, ऐकतो आणि अनुभवतो तो हळूहळू त्याच्या विचारांचा आणि वागण्याचा भाग बनतो. अशा परिस्थितीत शिक्षणाची जबाबदारी पूर्वीपेक्षा अधिक गंभीर आणि मोठी होते. अलिकडच्या काळात आजची पिढी हक्कांबद्दल खूप बोलते, असे दिसून आले आहे, लोकांना अधिकारांबाबत जागरूक करणेही गरजेचे आहे. त्यांना शिक्षणाचा अधिकार आहे, सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे, त्यांचे विचार मांडण्याचा अधिकार आहे आणि समान संधी मिळण्याचा अधिकार आहे हे त्यांना कळायला हवे. पण आपण त्यांना त्यांच्या कर्तव्याबाबत तितक्याच गांभीर्याने घेत आहोत का? की आताच्या पिढीला त्यांच्या कर्तव्याची जाणीव आहे? अधिकार महत्त्वाचे आहेत, परंतु कर्तव्येही तितकीच महत्त्वाची आहेत. लोकशाही म्हणजे केवळ अधिकारांची व्यवस्था नाही. तो अधिकार आणि कर्तव्यांच्या समतोलावर कार्य करतो. जर एखादी व्यक्ती आपल्या हक्कांबाबत जागरूक असेल पण कर्तव्याबाबत उदासीन असेल तर लोकशाही व्यवस्था मजबूत होऊ शकत नाही. त्यामुळे आजच्या पिढीला काय मिळाले पाहिजे हे शिकवणे आवश्यक आहे, यासोबतच समाज आणि राष्ट्राप्रती आपली जबाबदारी काय आहे, हेही समजून घेतले पाहिजे. विद्यार्थ्यांना फक्त त्यांचे हक्क काय आहेत हे सांगितले, पण इतरांनाही अधिकार आहेत आणि त्या अधिकारांचा आदर करणे हे त्यांचे कर्तव्य आहे हे सांगितले नाही तर हक्कांची जाणीव अपूर्णच राहील. तुम्हाला तुमची मते मांडण्याचा अधिकार असला तरी इतरांची मते ऐकण्याचीही जबाबदारी तुमच्यावर आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य असेल तर ते जबाबदारीने वापरणेही कर्तव्य आहे. इंटरनेटची सुविधा असेल तर डिजिटल माध्यमाचा जबाबदारीने वापर करण्याचीही जबाबदारी आहे. आज इंटरनेट माध्यमांनी हा समतोल आणखी महत्त्वाचा बनवला आहे. कोणतीही माहिती एका क्लिकवर हजारो लोकांपर्यंत पोहोचू शकते. अशा परिस्थितीत, आजच्या विद्यार्थ्याला हे देखील शिकवावे लागेल की प्रत्येक माहिती खरी नसते, प्रत्येक व्हायरल सामग्री शेअर करणे योग्य नसते आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य जबाबदारीपासून वेगळे केले जाऊ शकत नाही. ही अशी जागा आहे जिथे संस्कार आणि मूल्ये शिक्षणाचा अविभाज्य भाग बनतात. संस्कार म्हणजे केवळ परंपरांचे पालन करणे नव्हे. संस्कार म्हणजे योग्य आणि अयोग्य यातील फरक समजून घेण्याची क्षमता, इतरांचा आदर, शिस्त, संवेदनशीलता, सहानुभूती, सत्याचा आग्रह आणि कर्तव्याची जाणीव. मूल्ये एखाद्या व्यक्तीला दिलेल्या परिस्थितीत त्याच्यासाठी योग्य आचरण काय असावे हे ठरवण्यास मदत करतात. जेव्हा मूल्ये आणि कर्तव्ये अधिकारांशी निगडीत असतात, तेव्हा अधिकार हे केवळ वैयक्तिक लाभाचे साधन नसून समाज आणि राष्ट्र निर्माण करण्याची शक्ती बनतात. कोणत्याही अधिकाराची खरी शक्ती ती ज्या उद्देशासाठी वापरली जात आहे त्यात असते. हक्काचा वापर केवळ स्वत:च्या फायद्यासाठी केला आणि समाजाच्या हिताकडे दुर्लक्ष केले, तर तोच अधिकार संघर्षाचे कारण बनू शकतो. परंतु जेव्हा कर्तव्ये आणि मूल्ये अधिकारांशी निगडीत असतात, तेव्हा तेच हक्क राष्ट्र उभारणीचे माध्यम बनतात. जागरूक तरुण त्यांच्या हक्कांसाठी आवाज उठवेल, पण सार्वजनिक मालमत्तेचे रक्षणही करेल. तो त्याच्या स्वातंत्र्याचा वापर करेल, परंतु इतरांच्या स्वातंत्र्याचा आदर करेल. तो प्रश्न विचारेल, पण वस्तुस्थिती समजून घेण्याचा प्रयत्न करेल. त्यामुळे बालकांना हक्कांची माहिती देणे जितके म हत्त्वाचे आहे, तितकेच त्यांना हक्क आणि कर्तव्ये एकमेकांच्या विरोधात नसून परस्परपूरक आहेत, याची जाणीव करून देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. जनरल जी आणि जनरल अल्फा यांच्यासमोरील सर्वात मोठे आव्हान कदाचित माहितीची कमतरता नाही तर माहितीचा अतिरेक आहे. पूर्वी मुलांच्या शिक्षणाची प्रमुख केंद्रे घर, शाळा आणि समाज होती. आज या तिघांच्या बरोबरीने डिजिटल जगतही एक शक्तिशाली शिक्षक बनले आहे. हे 'डिजिटल शिक्षक' नेहमी योग्य माहिती देईलच असे नाही. व्हिडिओची लोकप्रियता ही त्याच्या सत्यतेची हमी नाही. प्रभावशाली व्यक्तीचे शब्द हे अंतिम सत्य असू शकत नाही. कडून मिळालेले उत्तर देखील विवेकाच्या निकषावर तपासले गेले पाहिजे. त्यामुळे आजचे शिक्षण हे केवळ माहिती देणारे शिक्षण नसून शहाणपण विकसित करणारे शिक्षण असावे लागेल. मुलाला योग्य प्रश्न विचारण्यास शिकवणे त्याला उत्तरे सांगण्यापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे. कोणत्याही माहितीवर विश्वास ठेवण्यापूर्वी त्याला स्त्रोत पाहणे, तथ्ये तपासणे आणि भिन्न दृष्टिकोन समजून घेणे शिकवणे महत्वाचे आहे. ही गंभीर विचारसरणी त्याला नंतर कठीण परिस्थितीत योग्य निर्णय घेण्यास सक्षम करेल. शिक्षणाची खरी परीक्षा तेव्हा येते जेव्हा जीवन आपल्यासमोर अशी परिस्थिती मांडते ज्याचे उत्तर थेट कोणत्याही पुस्तकाच्या अध्यायात सापडत नाही. संकटाच्या वेळी माणसाला निर्णय घ्यावा लागतो. अपयशाच्या वेळी स्वतःवर नियंत्रण ठेवावे लागते. गोंधळाच्या परिस्थितीत योग्य आणि अयोग्य यातील निवड करावी लागते. दबावातही मूल्यांवर टिकून राहावे लागते. अशा वेळी नुसती पदवी लाभत नाही. ज्ञान, संयम, शिस्त आणि समस्या सोडवण्याची क्षमता ही शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये विकसित झालेली असते. त्यामुळे शिक्षणाचे उद्दिष्ट केवळ परीक्षेत यश असू शकत नाही. जीवनाच्या परीक्षांची तयारी करणे हा देखील त्याचा उद्देश आहे.

लोकसंसद

बेघर पक्ष्यांचा आक्रोश आपल्याला अंतर्मुख करेल का?

दरवर्षी हिवाळ्याची चाहूल लागताच मुंबईच्या पाणथळ जागांवर आणि खाडीकिनारी देश-विदेशातून येणाऱ्या स्थलांतरित पक्षांचे आगमन सुरू होते आणि मुंबई आणि आजूबाजूचा परिसर जणू काही एका जिवंत कॅनव्हासमध्ये बदलून जातो. हजारो किलोमीटरचा खडतर प्रवास करून येणारे हे पाहुणे मुंबईच्या सिमेंटच्या जंगलात निसर्गाचा एक सुंदर आणि विलोभनीय रंग भरतात. नुकतेच मुंबईतील भांडुप पूर्वेच्या पाणथळ परिसरात चित्रबलाक पक्षाचे (पेंटेड स्टॉर्क) झालेले आगमन मन सुखावणारे आहे. खरे तर हे स्थलांतरित पक्षी केवळ या परिसराचे सौंदर्यच वाढवत नाहीत तर तेथील समृद्ध जैवविविधता आणि निकोप पर्यावरण परिसंस्था अजूनही छानपैकी टिकून असल्याचे आणि उत्तम प्रकारे कार्य करत असल्याचे स्पष्ट संकेत देतात. मात्र एकीकडे चित्रबलाकच्या आगमनाने चित्त बहरले असतानाच, भीमाशंकर आणि कर्जत परिसरातील घनदाट जंगलांमध्ये एका जलविद्युत प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या वृक्षतोडीमुळे, घरटी गमावलेले असंख्य पक्षी आपल्या घरट्याच्या शोधात व्याकुळ होऊन आकाशात घिरट्या घालत असतानाचे व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाले आणि या सुखदायक बातमीवर लगेचच विरजण पडले. अशावेळी येथील वृक्षतोडीमुळे घरटी आणि अंडी व पिल्ले गमावलेल्या बेघर पक्ष्यांचा आकाशात घुमणारा, जैवविविधता धोक्यात आणणारा हृदयद्रावक आक्रोश आपल्याला सर्वांगाने अंतर्मुख करेल का हाच खरा प्रश्न आहे.

– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी

दिनविशेष

डॉ. होमी जहांगीर भाभा

भारताच्या आण्विक शक्तीचे जनक असे ज्यांना म्हटले जाते त्या डॉ होमी जहांगीर भाभा यांचा आज जन्मदिन. स्वतंत्र भारताला समर्थ आणि बलवान बनवण्यासाठी ज्या महान व्यक्तींनी जीवाचे रान केले त्यात डॉ होमी जहांगीर भाभा याचे नाव आवर्जून घेतले जाते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणू आणि अवकाश क्षेत्रात जे कार्य केले त्यामुळे जगभर भारताचे नाव झाले. डॉ होमी जहांगीर भाभा यांचा जन्म सदन पारशी कुटुंबात ३० ऑक्टोबर १९०९ रोजी झाला. त्यांचे वडील डॉ जहांगीर भाभा हे बॅरिस्टर होते. त्यांच्या वडिलांना वाचनाची खूप आवड होती त्यामुळे त्यांनी खूप पुस्तके गोळा केली होती त्यात विज्ञान या विषयाचीही पुस्तके होती. डॉ होमी यांना लहानपणापासून विज्ञानाची आवड होती. त्यामुळे त्यांनी विज्ञानाची अनेक पुस्तके वाचून काढली. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर होमी यांनी इंजिनिअर व्हावे असे त्यांचा वडिलांना वाटत होते पण होमी यांनी आपल्याला गणित आणि पदार्थ विज्ञान हे विषय आवडतात आणि त्यातच आपण करियर करणार असे वडिलांना ठामपणे सांगीतले. वडिलांनी त्यांना या विषयात करियर करण्यास परवानगी दिली पण आधी इंजिनिअरिंग पूर्ण करण्याची अट घातली. त्यामुळे होमी यांनी १९३० साली केम्ब्रिज विद्यापीठातून पहिल्या श्रेणीत इंजिनिअरिंग पूर्ण केले. तसेच पॉल डिरेक यांच्या मार्गदर्शनाखाली गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयांचा अभ्यासही केला. गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयात त्यांना खूप गती होती त्यामुळे या विषयात त्यांनी अनेक बक्षिसे आणि शिष्यवृत्त्या मिळवल्या. १९४० साली ते भारतात परत आले. भारतात आल्यावर त्यांनी बंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्थेत प्राध्यापक म्हणून काम केले. १९४५ साली टाटा मूलभूत संशोधन संस्थेची स्थापना करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. पुढे याच संस्थेचे ते संचालक बनले. संचालक असतानाही त्यांनी आपले संशोधन कार्य सोडले नाही. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर १९४८ साली त्यांच्या पुढाकाराने भारत सरकारने अणू ऊर्जा आयोगाची स्थापना केली. या संस्थेचेही ते संचालक होते. या संस्थेत त्यांनी आपल्या संशोधनाला सुरुवात केली, तेंव्हा मुल कण, नवे सिद्धांत, नवे तंत्रे उदयास आली होती. त्यात डॉ होमी भाभा यांनी मोलाची भर टाकली. १९५४ च्या ऑगस्ट महिन्यात भारत सरकारने अणुऊर्जा विकासासाठी स्वतंत्र खातं निर्माण केले त्यावेळी या खात्याचे पहिले सचिव म्हणून डॉ होमी भाभा यांचीच निवड करण्यात आली. या अणुऊर्जा विकास संशोधन खात्याने मुंबईत तुर्भे येथे देशातील पहिले अणू विषयक संशोधन करणारं केंद्र डॉ भाभा यांच्याच नेतृत्वाखाली उभे केले. त्यानंतर १९५६ साली देशातीलच नव्हे तर आशिया खंडातील पहिली अणुभट्टी सुरु करण्यात आली. अणुविषयक व आंतरीक्ष विषयक अशा दोन्हीही क्षेत्रात महत्वपूर्ण आणि भक्कम पाया घालण्याचं श्रेय हे डॉ होमी जहांगीर भाभा यानांच जाते. अणुशक्तीचा वापर विघातक कामासाठी नव्हे विधायक काम ासाठी झाला पाहिजे असे त्यांचे मत होते. १९५५ मध्ये जिनिव्हा येथे भरलेल्या आणि संयुक्त राष्ट्र संघामार्फत आयोजित अणुऊर्जेचा वापर शांततामय विकासकार्यासाठी वापर या विषयाच्या परिसंवादाचे डॉ भाभा हे अध्यक्ष होते. या परिसंवादात त्यांनी अणुऊर्जेचा वापर अणुबॉम्ब तयार करण्यासाठी न करण्याचे आव्हान सर्व देशांना केले होते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणुऊर्जा आणि आंतरीक्ष क्षेत्रात जे महान कार्य केले त्यामुळे त्यांना अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरवले. २४ जानेवारी १९६६ रोजी स्वित्झर्लंड मधल्या माँ ब्लँ या उंच शिखरावर झालेल्या भीषण अपघातात या महान शास्त्रज्ञाचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या निधनानंतर तुर्भे येथील अणू संशोधन केंद्राचे नाव बदलून भाभा अणुसंशोधन केंद्र असे करण्यात आले. आज त्यांच्या जन्मदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

श्याम बसप्पा ठाणेदार

कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

पुनाडे शासकीय जमिनीचा प्रश्न गंभीर

| चिरनेर | प्रतिनिधी |

उरण तालुक्यातील पुनाडे येथील ३७.५१५ हेक्टर (९२.७० एकर) सरकारी जमीन बोचासनवासी अक्षर पुरुषोत्तम स्वामीनारायण ट्रस्टला विश्वविद्यापीठ उभारणी करता देण्याबाबत राज्य सरकारने हालचाली सुरु केल्या आहेत. याविरोधात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उरण पंचायत समिती सदस्या कविता पाटील यांनी जिल्हाधिकारी किसन जावळे यांची मंगळवारी (दि.२७) भेट घेऊन निवेदन दिले. ही जमीन स्थानिकांच्या वापरासाठी कायम रहावी, अशी विनंती निवेदनातून केली आहे. कविता पाटील यांनी निवेदनात तालुक्यातील गावखेड्यातील शासकीय जमिनीचा वापर स्थानिक करत आहेत. अशा जमिनी कोणत्याही संस्थांना देण्याचा निर्णय घेताना स्थानिक स्वराज्य संस्थांना विश्वासात



- **जमीन स्थानिकांच्या वापरांसाठी कायम ठेवावी**
- **कविता पाटील यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन**

घेणे गरजेचे आहे. पुनाडे येथील जमिनीत स्थानिक आदिवासी समाज वर्षानुवर्षे भाजीपाला लागवड, शेती करून उदरनिर्वाह करत आहेत. या शासकीय जमिनी स्थानिक आदिवासींना शेती व शेतीपूरक व्यवसायासाठी देता येतील. पुनाडे गावाच्या विस्तारीत गावठाणासाठी पुनाडे ग्रामस्थांसाठी ही जमीन आवश्यक आहे. याशिवाय आसपास धरण असल्याने इथे क्रीडांगण, बोटॅनिकल गार्डन उभे करता येईल. पूर्व विभागातील कचऱ्याची समस्या पाहता याठिकाणी क्षेपणभूमी उभी करता येईल, अशा सूचनाही कविता पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या निवेदनात केल्या आहेत.

स्थानिकांच्या वापरातील जमिनी सरकारच्या आदेशाने स्वामीनारायण संस्थेला देण्याला स्थानिक ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शवला असल्याचे कविता पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणले. या जमिनीची स्थानिकांच्या वापरासाठी असलेली गरज ओळखून, स्वामीनारायण संस्थेला जमीन देण्याच्या शासनाच्या धोरणाविरोधात उरण पंचायत समितीच्या मासिक सभेत आपण विरोधाचा ठराव घेतला असल्याचे कविता पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले. तसेच, वरील बाबींचा विचार करून स्वामिनारायण संस्थेला ही शासकीय जमीन न देण्याबाबत शासनाला अहवाल देण्याचीही विनंती कविता पाटील यांनी या निवेदनातून केली आहे. यावेळी शिवसेनेचे दक्षिण रायगड जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे, शिवसेना तालुका उपसंघटक रूपेश पाटील यांच्यासह काही कार्यकर्ते उपस्थित होते.

> **पुनाडे येथील शासकीय जमीन कोणत्याही संस्थेला न देता ती स्थानिकांच्या वापरांसाठी कायम ठेवावी. ही जमीन पुनाडे ग्रामस्थांना वाढीव गावठाणासाठी राखण्यात यावी. तसेच या क्षेत्रात बॉटॅनिकल गार्डन (बाग), क्रीडांगणे उभी करता येतील. इथल्या आदिवासींना उपजीविकेसाठी या जमिनीचा वापर करता येईल. ही जमीन स्वामीनारायण संस्थेला देण्याबाबत शासनाने फेरविचार करावा. अन्यथा लोकशाही मार्गाने या जमिनीसाठी आंदोलन करावे लागेल.**
>
> **– कविता पाटील,**
> **उरण पंचायत समिती सदस्या**

पनवेलमध्ये निसर्गप्रेमींचे मूक आंदोलन



| खांदेश्वर | प्रतिनिधी |

भीमाशंकरच्या जंगलात होत असलेल्या वृक्षतोडीमुळे निसर्गाचा होणारा विनाश सर्वसामान्य नागरिकांच्या लक्षात यावा, तसेच पर्यावरणाच्या रक्षणासाठी समाजाने निष्क्रिय न राहता आपली संवेदनशीलता व्यक्त करावी, या उद्देशाने पनवेल येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात निसर्गप्रेमींनी मूक आंदोलन केले. बुधवारी (दि.२८) सायंकाळी ५.३० ते ६.३० या वेळेत झालेल्या या आंदोलनात विविध संस्थांशी संबंधित सुमारे ३० पर्यावरणप्रेमी सहभागी झाले होते.

भीमाशंकरच्या जंगलातील वृक्षतोडीमुळे निसर्गाची होणारी हानी हा चिंतेचा विषय बनला आहे. झाडांची निर्घृणपणे तोड होत असताना ती स्वतःचा आक्रोश व्यक्त करू शकत नाहीत. त्यांच्या या मूक वेदना समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी आंदोलनकर्त्यांनीही मौन धारण करून निषेध व्यक्त केला.

'झाडं निर्घृणपणे तोडली जातात, तरीही ती आक्रोश करत नाहीत, किंचाळत नाहीत, ओरडत नाहीत किंवा रडत नाहीत. ती मूक राहतात. आम्हीही मूक राहून त्यांचा हा आक्रोश लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला,' अशी भावना निसर्गप्रेमींनी व्यक्त केली.

पर्यावरणाचा ऱ्हास होत असताना केवळ प्रेक्षक बनून राहण्यापेक्षा शांततेच्या मार्गाने निषेध नोंदवणे आवश्यक आहे, अशी भूमिका या आंदोलनातून मांडण्यात आली.



अक्कादेवी वनपरिसरात बंधाऱ्यांची उभारणी

| चिरनेर | प्रतिनिधी |

उरण तालुक्यातील चिरनेर अक्कादेवी धरण वन परिसरात फ्रेंड्स ऑफ नेचर संस्थेच्या श्रमदानातून आणि आदिवासी बांधवांच्या सहभागातून येथील वन परिसरात दोन वन बंधाऱ्याची उभारणी करण्यात आली आहे. या उपक्रमाला वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी यांचेही सहकार्य लाभले. वन्यजीवांसाठी पाण्याची क्षमता वाढविण्यासाठी पावसाचे पाणी अडवून ते जमिनीत जिरवून भूजल पातळी वाढविणे तसेच उपलब्ध जलस्तोत्रांचे संवर्धन करणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. पाणी आडवा पाणी जिरवा हा संदेश फ्रेंड्स ऑफ नेचरने केवळ घोषणेपुरता मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष कृतीतून राबविण्याचा प्रयत्न केला. यावेळी फॉनचे संस्थापक अध्यक्ष जयवंत ठाकूर यांनी असे उपक्रम गावोगावी राबविले जावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली.

उपाध्यक्षपदी संदेश लोखंडे यांची निवड

कोलाड : रोहा तालुका कुणबी समाजाच्या उपाध्यक्षपदी संदेश लोखंडे यांची निवड करण्यात आली आहे.



यापूर्वी त्यांनी कोलाड विभाग प्रमुख म्हणून कुणबी समाजासाठी कार्य केले आहे. त्यांच्या या निवडीमुळे समाजाच्या संघटनात्मक कार्याला अधिक बळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. संदेश लोखंडे यांनी कोलाड विभाग प्रमुख म्हणून काम करताना समाजाच्या विविध उपक्रमांमध्ये सहभाग घेतला. समाजातील बांधवांना एकत्र आणणे, समाजाच्या संघटनात्मक कार्यात योगदान देणे आणि सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय भूमिका बजावणे, या माध्यमातून त्यांनी आपली ओळख निर्माण केली. त्यांच्या कार्याचा अनुभव लक्षात घेऊन त्यांच्यावर रोहा तालुका कुणबी समाजाच्या उपाध्यक्षपदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे. संदेश लोखंडे यांच्या निवडीबद्दल कुणबी समाजातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाजबांधवांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

गावठी दारूची भट्टी उद्ध्वस्त

मोखाडा : तालुक्यातील कडूची वाडी येथील जंगल भागात गावठी दारू तयार करण्याची भट्टी आढळून आली असून पोलिसांनी ती उद्ध्वस्त केली आहे. यात अडीच हजार लिटर रसायन तयार करून त्यापासून गावठी दारू बनविण्यात येणार होती. ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक प्रतीक पोकळे, पोलीस शिपाई शरद नवाळे व पोलीस शिपाई पंकज गुजर यांनी केली. या ठिकाणी गुळ व नवसागर मिश्रित एकूण २५०० लिटर रसायन तसेच ३० लिटर तयार गावठी दारू आढळून आली.

पोलिसांनी गुळ व नवसागर मिश्रित रसायन जागीच नष्ट केले. तसेच गावठी दारू तयार करण्यासाठी लागणारे इतर साहित्य जागीच तोडून-फोडून नष्ट करण्यात आले. ग्रामीण भागातील पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे अवैध गावठी हातभट्ट्यांना मोठ्या प्रमाणावर अंकुश बसणार आहे. या कारवाईबाबत स्थळ पंचनामा करून तयार गावठी दारू व नवसागर जप्त केला आहे. याबाबत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे, अशी माहिती स.पो.नि. अजित साबळे यांनी दिली आहे.

निडी फाटा-अष्टमी नाका रस्ता खड्ड्यांच्या विळख्यात



- **प्रशासनाचे दुर्लक्ष**
- **अज्ञात नागरिकाने बुजवले खड्डे**

| चणेरा | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यातील निडी फाटा ते अष्टमी नाका या प्रमुख रस्त्याची खड्ड्यांमुळे अक्षरशः दुरवस्था झाली आहे. अलिबाग सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या या रस्त्याच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

रोहा शहरातून मुंबईच्या दिशेने जाण्यासाठी हा रस्ता महत्त्वाचा दळणवळणाचा मार्ग आहे. मात्र, पावसाळ्यापासून रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमुळे प्रवास धोकादायक बनला आहे.

रस्त्याची दुरवस्था कायम असतानाही संबंधित यंत्रणेकडून दुरुस्ती होत नसल्याचे पाहून एका अज्ञात नागरिकाने सामाजिक बांधिलकी जपत पुढाकार घेतला. अष्टमी नाका परिसरातील खड्डे या नागरिकाने स्वतःच्या खर्चाने आणि श्रमदानातून खडी व सिमेंटच्या साहाय्याने बुजवले. या कृतीचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

'दुष्काळसदृश परिस्थितीत उपाययोजनांची गरज'

| कोर्लई | प्रतिनिधी |

यावर्षी कमी प्रमाणात पडलेला पाऊस आणि अल निनोच्या प्रभावामुळे दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी शासनाने तसेच लोकांच्या सहभागातून योग्य ती उपाययोजना करण्याची गरज असल्याची प्रतिक्रिया रायगड जिल्हा परिषदेच्या सदस्या ज्योती नागावकर यांनी व्यक्त केली आहे. तसेच, आतापासूनच सर्वांनी पाण्याचा जपून वापर करावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

अल निनोच्या प्रभावामुळे व महिनाभरापासून पाऊस न पडल्याने यंदा मुरुड तालुक्यातील विहिरी व धरणातील पाण्याची पातळी आतापासून कमी होऊ लागली आहे. तालुक्यातील बोर्ली-मांडला, कोर्लई, बारशीव तसेच आजूबाजूच्या गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या फणसाड धरणातील पाणी पातळी कमी व्हायला सुरुवात झाली आहे. यासाठी संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन आतापासूनच तालुक्यातील पंचक्रोशीतील सर्वांनीच पाण्याचा जपून वापर करावा, पाणी वाचवा, पाणी वाया जाऊ देउ नका, पाणी जीवन आहे. पाणी अडवा पाणी जिरवा मोहिमेंतर्गत तालुक्यातील चोवीस ग्रामपंचायतीमध्ये वनराई बंधारे बांधण्यात येऊन अभियान राबविण्यात येत आहे. दुष्काळसदृष्य परिस्थितीत शासनाने तसेच लोकसहभागातून योग्य ती उपाययोजना करण्याची गरज असल्याची प्रतिक्रिया रायगड जिल्हा परिषदेच्या सदस्या ज्योती नागावकर यांनी व्यक्त केली आहे.



नारायण जवरत यांचे निधन



सुकेळी : रोहा तालुक्यातील देवकान्हे येथील रहिवासी परंतु अनेक वर्षांपासून रोहा शहरामध्ये स्थायिक झालेले नारायण हरी जवरत यांचे मंगळवारी (दि.२७) निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी गुरुवार दि.५ रोजी, तर उत्तरकार्य शनिवार दि.७ नोव्हेंबर रोजी होणार आहे.

आकाशकंदील कार्यशाळेचे आयोजन

| खांदेश्वर | प्रतिनिधी |

दिवाळी हा फटाक्यांचा नव्हे, तर दिव्यांचा सण आहे, हा संदेश युवा पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी पनवेल कल्चरल सेंटरतर्फे पणती सजावट आणि आकाशकंदील बनविण्याच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, १ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत पनवेल कल्चरल सेंटरच्या सभागृहात ही कार्यशाळा पार पडणार आहे.

या कार्यशाळेत सहभागी होणाऱ्यांना पणत्यांची आकर्षक सजावट करण्याबरोबरच स्वतःच्या हाताने आकाशकंदील बनविण्याचे कौशल्य शिकता येणार आहे. पणती सजावटीबाबत पद्मजा कुलकर्णी, तर आकाशकंदील बनविण्याबाबत मिलिंद देशमुख मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेसाठी आवश्यक असलेली सर्व सामग्री संस्थेतर्फे उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी ३० ऑक्टोबरपूर्वी नावनोंदणी करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी पद्मजा कुलकर्णी-८३६९१८५११५, मिलिंद देशमुख- ९००४९०१८०४ यांच्याशी संपर्क साधावा.

'आयएनएस गुलदार' प्रकल्पाचा राष्ट्रीय स्तरावर गौरव | महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब

सिंधुदुर्गच्या सागरी पर्यटनाला 'गोल्डन बॅनियन अॅवॉर्ड'

| मुंबई | प्रतिनिधी |

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सागरी पर्यटनाला राष्ट्रीय स्तरावर नवी ओळख मिळवून देणाऱ्या पर्यटन विभागांतर्गत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या महत्वाकांक्षी 'आयएनएस गुलदार' या प्रकल्पाला 'द वीक हेरिटेज अॅवॉर्ड-गोल्डन बॅनियन अॅवॉर्ड २०२६' प्रदान करण्यात आला आहे. भारतातील पहिले पाण्याखालील संग्रहालय, कृत्रिम प्रवाळ, पाणबुडी पर्यटन प्रकल्प म्हणून विकसित होत असलेल्या या उपक्रमाची राष्ट्रीय स्तरावर दखल घेतली आहे. महाराष्ट्रासाठी ही अभिमानाची बाब असल्याचे पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी म्हटले आहे.



द वीक मॅगेझीन तर्फे 'द वीक हेरिटेज अॅवॉर्ड गोल्डन बॅनियन अॅवॉर्ड २०२६' या पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम प्रधानमंत्री संग्रहालय व ग्रंथालय नवी दिल्ली येथे मंगळवारी (दि.२७) आयोजित करण्यात आला होता. या समारंभात केंद्रीय संस्कृती व पर्यटनमंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक निलेश गटणे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

पर्यटनमंत्री शंभूराज देसाई म्हणाले, 'द वीक हेरिटेज अॅवॉर्ड' अंतर्गत मिळालेला 'गोल्डन बॅनियन अॅवॉर्ड २०२६' हा सन्मान महाराष्ट्राच्या पर्यटन विकासातील महत्वाचा टप्पा आहे. सिंधुदुर्गच्या सागरी पर्यटनाला राष्ट्रीयस्तरावर गौरव मिळणे ही महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद बाब आहे. 'आयएनएस गुलदार' हा प्रकल्प पर्यटनाच्या पारंपरिक संकल्पनेपलीकडे जाऊन आधुनिक पर्यटन अनुभव यांची सांगड घालणारा महत्वपूर्ण उपक्रम आहे.

स्थानिक व्यवसायांना चालना मिळणार

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक निलेश गटणे म्हणाले की, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सागरी पर्यटनाला चालना देण्यासाठी 'आयएनएस गुलदार' या नौकेचे पर्यटनाच्या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण प्रकल्प आहे. या उपक्रमामुळे सिंधुदुर्गच्या पर्यटन क्षेत्राला नवी ओळख मिळण्यासोबतच स्थानिक पर्यटन व्यवसाय, निवास व्यवस्था, वाहतूक, मार्गदर्शक सेवा आणि इतर पूरक व्यवसायांना चालना मिळणार आहे.

पाणबुडी पर्यटन प्रकल्प

पर्यटन विभागातंर्गत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (एमटीडीसी) मार्फत मे. माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड यांच्या समन्वयाने, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील निवती रॉक परिसरात भारतीय नौदलाची सेवानिवृत्त युद्धनौका 'एक्स-आयएनएस गुलदार' हा देशातील अत्यंत महत्वाकांक्षी आणि वैशिष्ट्यपूर्ण पाणबुडी पर्यटन प्रकल्प उभारण्यात आला आहे. हा प्रकल्प भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयातंर्गत, 'स्पेशल असिस्टंस टू स्टेटस फॉर कॅपीटल इन्हव्हेस्टमेंट डेव्हलपमेंट ऑफ आयकॉनिक टुरिस्ट सेंटर्स टू ग्लोबल स्केल' या योजनेअंतर्गत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, पर्यटन विभाग, महाराष्ट्र शासनाव्दारे विकसित करण्यात आला आहे.

निवडक



सिद्धिविनायक मंदिरात भाविकांची गर्दी

खांदेश्वर : संकष्टी चतुर्थीनिमित्त पनवेलमधील जय भारत नाका येथील ज्येष्ठराज सिद्धिविनायक श्री गणेश मंदिरात गुरुवारी सकाळपासून भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. श्री गणेशाच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांमुळे मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. संकष्टी चतुर्थीला श्री गणेशाची पूजा आणि दर्शनाला विशेष महत्त्व असल्याने अनेक भाविकांनी सकाळपासूनच मंदिरात हजेरी लावली. श्री गणेशाचे दर्शन घेऊन भाविकांनी सुख, समृद्धी आणि कुटुंबाच्या कल्याणासाठी प्रार्थना केली. दिवसभर मंदिरात दर्शनासाठी भाविकांची वर्दळ कायम होती. गणरायाच्या जयघोषाने मंदिर परिसरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.



आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण

उरण : कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी आपत्ती व्यवस्थापनाचे एक दिवशीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वाल्मीक गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या प्रशिक्षण कार्यक्रमात मा.शशिकांत शिरसाठ (सहाय्यक उपनियंत्रक, नागरी संरक्षण दल ऑफिस, मोरा रोड, उरण) यांनी नैसर्गिक आपत्तीचे प्रकार व मानवनिर्मित आपत्तीचे प्रकार विद्यार्थ्यांना सांगितले. आपत्ती व्यवस्थापनात आपली भूमिका कशी असावी व आपण आपत्ती व्यवस्थापनातून हानी कशी टाळावी, याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी मा.नितेश घरत, मा. सुयोग पाटील, मा.निशांत पाटील व अलंकार पाटील हे आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षक उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने या प्रशिक्षणासाठी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ. दत्ता हिंगमिरे (राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी) यांनी केले. हा कार्यक्रम मोरा रोड उरण येथील नागरी संरक्षण दल ऑफिसच्या प्रशिक्षण केंद्रात पार पडला.



उमेश जाधवांना कोकणरत्न पुरस्कार

पाली : कोकणासह संपूर्ण महाराष्ट्रात आपल्या संवेदनशील कवितेने सामाजिक ठसा उमटवणारे सुधागड पाली येथील कवी उमेश वामन जाधव यांना नुकताच कोकण युवा प्रतिष्ठानचा कोकणरत्न पुरस्कार मिळाला. कोकण युवा प्रतिष्ठान डोंबिवली यांच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त संस्थेचे संस्थापक धनंजय चाळके, सचिव विराज चव्हाण व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी डोंबिवलीतील आनंद बालभवन येथे दि.२४ व २५ ऑक्टोबर रोजी संगीत भजनोत्सव स्पर्धा तसेच कोकणरत्न पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. हा पुरस्कार सोहळा रविवारी (दि.२५) पार पडला. या सोहळ्यात कोकणातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ११ मान्यवरांचा कोकण गौरव पुरस्काराने सन्मान करण्यात आला. कविता व गीत लेखनाच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्ष सामाजिक कार्य करणाऱ्या उमेश जाधव यांना कोकण साहित्यरत्न या पुरस्काराचे सन्मानचिन्ह मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. तसेच पद्मश्री भिकल्या धिंडा, अभिनेते वैभव मांगले इत्यादी मान्यवरांनाही यावेळी पुरस्काराने गौरविण्यात आले.



शाळेला स्मार्ट टीव्ही भेट

कर्जत : फातिमा ८६ नोबेल ट्रस्ट, ठाणे यांच्या वतीने आणि माजी नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांच्या विशेष प्रयत्नाने जिल्हा परिषदेच्या सागाची वाडी आणि चोचीची वाडी शाळेमध्ये ई-लर्निंगसाठी ४२ इंची स्मार्ट टीव्ही सेट भेट देण्यात आला. अतिदुर्गम भागातील विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी फातिमा ८६ नोबेल ट्रस्ट, ठाणे यांनी जिल्हा परिषद शाळा सागाची वाडी आणि चोचीची वाडी येथे जाउन ४२ इंची स्मार्ट टीव्ही सेट दिला. कर्जतच्या माजी नगराध्यक्ष आणि नगरसेविका सुवर्णा जोशी यांच्या हस्ते हा टीव्ही सेट शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात आला. त्यानंतर विद्यार्थ्यांना पौष्टिक खाऊ वाटप करण्यात आले. याप्रसंगी मुलांनी गाणी, कविता, गोष्टी सादर करून आनंद व्यक्त केला आणि ट्रस्टचे आभार मानले. एकाच बॅचच्या सर्व विद्यार्थ्यांनी मिळून स्थापन केलेली ही ट्रस्ट आणि त्यांचे हे समाजकारण खूपच कौतुकास्पद आहे.

गांजाविक्रीप्रकरणी तरुण ताब्यात

रत्नागिरी : रत्नागिरी शहरात गांजाविक्रीसाठी बाळगलेल्या १ किलो २०१ ग्रॅम गांजासह एका २४ वर्षीय तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. सूरज परशुराम नंदिवले असे या तरुणाचे नाव असून, तो रत्नागिरीतील नाचणकर चाळ, एमआयडीसी परिसरात राहत असल्याची माहिती पोलिसांनी दिली. बुधवारी (दि.२८) प्रभारी पोलीस अधीक्षक बी.बी. महामुनी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विवेक पाटील यांच्या नेतृत्वाखाली रत्नागिरी शहर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथक शहर परिसरात गस्त घालत होते. यावेळी नाचणकर चाळ परिसरात सूरज नंदिवलकडे गांजा आढळून आला.

पदोन्नतीसाठी लेखणी बंद आंदोलन

५२ पदांचा प्रश्न ऐरणीवर; संघटनेने सुधागड तहसीलदारांना दिले निवेदन

| सुधागड-पाली | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यातील महसूल विभागातील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित पदोन्नतीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी रायगड जिल्हा महसूल कर्मचारी संघटनेने आक्रमक भूमिका घेतली आहे. २०२१ पासून आजपर्यंत महसूल सहाय्यक संवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आलेली नसल्याचा मुद्दा संघटनेने उपस्थित केला आहे. पात्र कर्मचाऱ्यांना सहायक महसूल अधिकारी संवर्गात पदोन्नतीचे आदेश तातडीने देण्यात यावेत, या मागणीसाठी संघटनेच्या वतीने सुधागड-पाली तहसीलदारांना निवेदन सादर करण्यात आले.

मागण्या मान्य न झाल्यास ३० ऑक्टोबर २०२६ रोजी एक दिवसाचे लेखणी बंद आंदोलन करण्याचा इशाराही संघटनेने दिला आहे.



रायगड जिल्ह्यातील महसूल विभागात अव्वल कारकून संवर्गातील सध्या १४ पदे रिक्त आहेत. याशिवाय २२ नवीन पदांची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच नायब तहसीलदार पदावर पदस्थापना झाल्यानंतर रिक्त होणारी ११ पदे आणि सप्टेंबर २०२७ पर्यंत रिक्त होणारी आणखी ५ पदे विचारात घेता, एकूण ५२ पदांवर पदोन्नतीचे आदेश देण्यात यावेत, अशी मागणी संघटनेने केली आहे.

महसूल सहाय्यक संवर्गातील कर्मचाऱ्यांना २०२१ पासून अद्याप पदोन्नती मिळाली नसल्याने पात्र कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक प्रगतीचा प्रश्न निर्माण झाला आहे. अनेक वर्षांपासून पदोन्नतीच्या प्रतीक्षेत असलेल्या कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा आणि उपलब्ध रिक्त पदांवर नियमानुसार पदोन्नतीची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

महसूल विभागातील पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यास विलंब होत असल्यामुळे त्यांच्या सेवाविषयक प्रगतीवर परिणाम होत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. इतर विभागांमध्ये पदोन्नतीचे आदेश वेळोवेळी निर्गमित होत असताना रायगड जिल्ह्यातील महसूल कर्मचाऱ्यांना मात्र प्रतीक्षा करावी लागत असल्याची खंतही निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे.

नवीन पदांची निर्मिती होऊनही संबंधित पदांवर पदोन्नतीचे आदेश निर्गमित झालेले नसल्याने कर्मचाऱ्यामध्ये नाराजी आहे. तसेच रिक्त पदांची माहिती उपलब्ध असतानाही पदोन्नतीची प्रक्रिया प्रलंबित राहणे योग्य नसल्याची भूमिका संघटनेने मांडली आहे. शासन निर्णय आणि उपलब्ध पदांच्या आकृतिबंधानुसार पात्र कर्मचाऱ्यांना तातडीने पदोन्नती देऊन न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

या मागणीसाठी रायगड जिल्हा महसूल कर्मचारी संघटनेच्या वतीने सुधागड-पाली तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. यावेळी सुधागड महसूल तालुका अध्यक्ष श्रीकांत काशिनाथ इचके यांचे सह जयराम राठोड, अमर घासे, योगेश पवार, संतोष पवार, अमित चरवट, अमोल दिवेकर, योगिता साळुंके, प्रगती पाटील, वृषाली पाटील, स्मिता घोसाळकर आणि चंद्रकांत वाघमारे सहभागी झाले होते.

संघटनेने दिलेल्या निवेदनात २९ ऑक्टोबर २०२६ अखेर रिक्त असलेल्या १४ पदांसह नव्याने निर्माण झालेल्या २२ पदांवर आणि भविष्यात रिक्त होणाऱ्या अन्य पदांवर पदोन्नती देण्याची मागणी केली आहे. मागण्या मान्य न झाल्यास ३० ऑक्टोबर रोजी एक दिवसाचे लेखणी बंद आंदोलन करण्यात येईल. त्यानंतरही पदोन्नतीचे आदेश प्राप्त न झाल्यास पुढील आंदोलनाचा निर्णय घ्यावा लागेल, असा इशारा संघटनेने दिला आहे.

रायगड जिल्हा महसूल कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस प्रवीण वरंडे आणि जिल्हाध्यक्ष भूषण विश्वास पाटील यांनी प्रशासनाने कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून पदोन्नतीचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, असे आवाहन केले आहे.

निवडक



पात्र लाभार्थ्यांना अंत्योदय शिधापत्रिकांचे वाटप

रायगड : रायगड जिल्ह्यातील गरजू व पात्र लाभार्थ्यांना अंत्योदय अन्न योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी जिल्ह्यातील १५ तालुक्यांमधील ४० पात्र लाभार्थ्यांना राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे यांच्या हस्ते अंत्योदय शिधापत्रिकांचे वितरण करण्यात आले. या शिधापत्रिकांमुळे संबंधित लाभार्थ्यांना योजनेअंतर्गत अन्नधान्याचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे हे २६ ते २९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. या दरम्यान जिल्हाधिकारी कार्यालयात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्ह्यातील १५ तालुक्यांमधून निवड करण्यात आलेल्या ४० पात्र लाभार्थ्यांना अंत्योदय शिधापत्रिकांचे वितरण करण्यात आले. अंत्योदय अन्न योजना ही आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू कुटुंबांना अन्नधान्याचा लाभ उपलब्ध करून देणारी महत्त्वपूर्ण योजना आहे. या योजनेच्या माध्यमातून पात्र लाभार्थ्यांना अन्नसुरक्षा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शिधापत्रिकांचे वितरण महत्त्वपूर्ण ठरते.



सेवापूर्ती सोहळा उत्साहात

माणगाव : दाखणे गावचे रहिवाशी व तालुक्यातील खर्डी बुद्रुक आदिवासीवाडी शाळेचे शिक्षक रमेश बाळू उभारे सेवानिवृत्त होत असून त्यांचा सेवापूर्ती सत्कार सोहळा उतेखोल केंद्रशाळा माणगाव येथे उतेखोल केंद्रातर्फे माणगाव पंचायत समितीचे नवनिर्वाचित गटशिक्षणाधिकारी प्रसाद पाटील व उतेखोल केंद्राचे केंद्रप्रमुख शंकर शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी शिक्षक रमेश उभारे यांना उपस्थित माणगाव पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी प्रसाद पाटील, केंद्रप्रमुख शंकर शिंदे, सेवानिवृत्त शिक्षक भीमराज मोरे, दत्ताराम महाडिक, निलेश उभारे, आदर्श शिक्षिका विनया जाधव यांच्यासह सहकारी शिक्षक व शिक्षिका यांनी सेवानिवृत्तीच्या भरभरून शुभेच्छा दिल्या. या सोहळ्यात सेवानिवृत्त शिक्षक रमेश उभारे यांचा सहपत्नी उतेखोल केंद्रातर्फे गौरव करण्यात आला. यावेळी सेवानिवृत्त शिक्षक रमेश उभारे यांनी आपल्या मनोगतातून आपल्या शिक्षकी पेशाच्या सेवा काळाची माहिती देत वेगवेगळे अनुभव सांगत उतेखोल गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख, मित्रपरिवार व सर्व शिक्षकांचे मनापासून आभार व ऋण व्यक्त केले.

माथेरानमध्ये निर्बंध क्षेत्रातील घोड्यांवर कारवाई करण्याची मागणी

नेरळ : माथेरान शहरातील बाजारपेठ भागात कोणत्याही घोड्याला उभे राहण्यास बंदी आहे.१९५९ चे नियमानुसार अशा निर्बंध क्षेत्रात घोडे दिसल्यास कारवाई करावी, अशी मागणी श्रमिक रिक्षा संघटनेने केली आहे. सुप्रीम कोर्टाच्या आदेशान्वये श्रमिक रिक्षा चालक संघटनेचे सदस्य ई-रिक्षा चालवीत आहेत.माथेरान नगर परिषदेकडून प्राप्त आदेशानुसार रिक्षाचालक अतिरिक्त चौथा प्रवासी बसवीत नाहीत.तसेच ई-रिक्षा मुख्य बाजारपेठेतून देखील चालवीत नाहीत संघटनेचे सदस्य कायद्याच्या चौकटीमध्ये राहून आपला व्यवसाय करीत आहेत. मात्र घोडेवाले कायद्याच्या चौकटीमध्ये आपला व्यवसाय करीत नाहीत.माथेरानच्या अश्व चालकांनी माथेरान नियमावली १९५९ तथा नागरिकांच्या सुरक्षेतेच्या दृष्टीने व्यवसाय करावा, अशी मागणी करणारे निवेदन माथेरानमधील श्रमिक रिक्षा संघटनेने माथेरान पोलीस ठाणे येथे जाऊन निवेदन दिले. यावेळी संघटनेचे अध्यक्ष शकील पटेल आणि सचिव सुनील शिंदे यांनी ही मागणी करणारे निवेदन प्रभारी पोलीस अधिकारी सरिता मुसळे यांना दिले. सनियंत्रण समितीने टपाल पेटी चौक ते लायब्ररी हा मुख्य बाजारपेठेतील रस्ता घोडे चालविण्यास मनाई केली आहे. घोडेवाल्यानी कस्तुबा रोडचा वापर करावा, असे स्पष्ट आदेश दिले आहेत. मात्र या आदेशाचे पालन घोडेवाले करीत नाहीत. त्यामुळे मुख्य बाजारपेठमध्ये घोड्यांची गर्दी होते.नियमावली नुसार जे घोडे पोलीस स्टेशन पासिंग केले जातात त्यानाच व्यवसाय करता येतो. नवीन घोडे येतात तेव्हा जुन्या घोड्यांचे काय केले जाते याची सविस्तर चौकशी करून अहवाल तयार करण्याची मागणी संघटनेने केली आहे. घोड्यांचे परवाने एक वर्षाच्या मुदतीसाठी दिले जातात, परवान्यांच्या खरेदी विक्रीला मनाई आहे. परंतु बक्षीस पत्र बनवून बेकायदेशीर विक्री होते. ती पूर्णपणे बंद करण्यात यावी. पर्यटकांना अपघात होऊ नये म्हणून घोडे चालकांची मद्यपान चाचणी सातत्याने करण्यात यावी, अशी मागणी या निवेदनात केली आहे.



दुष्काळावर मात करण्यासाठी राजिपचा पुढाकार

| रायगड | प्रतिनिधी |

सध्याच्या ओढावलेल्या दुष्काळाच्या परिस्थितीवर मात करण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेने पुढाकार घेतला आहे. जिल्ह्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २.० ची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे.

या अभियानांतर्गत रायगड जिल्हा परिषदेमार्फत ग्राम स्थांच्या श्रमदानातून २२ व २३ ऑक्टोबरला जिल्ह्यात ९७४ ठिकाणी वनराई बंधारे बांधण्यात आले. यामुळे गावांमध्ये निर्माण होणारी पाण्याची समस्या दूर होण्यास मदत होणार आहे.



तालुका निहाय वनराई बंधाऱ्यांची संख्या

१. अलिबाग १०२, २. कर्जत ८२, ३. खालापूर ३३, ४. महाड ५४
५. माणगाव ५४, ६. म्हसळा ८१, ७. मुरूड ५३, ८. पनवेल २९
९. पेण ७१, १०. पोलादपूर ६८, ११. रोहा ९२, १२. श्रीवर्धन ७५
१३. सुधागड ८४, १४. तळा ५२, १५. उरण ४४

या उपक्रमाचा मुख्य उद्देश पावसाचे पाणी अडवून भूजल पातळी वाढवणे, शेतीसाठी पाण्याची उपलब्धता सुधारणे तसेच ग्रामीण भागात जलसंधारणास चालना देणे हा आहे. या मोहिमेचे वैशिष्ट्य म्हणजे शासन, प्रशासन आणि ग्रामस्थ यांचा त्रिवेणी संगम. जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायती यांनी एकत्र येत श्रमदानातून बंधारे उभारले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २.० अंतर्गत रायगड जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींनी अशाच उत्स्फूर्तपणे व नियोजनबद्ध पद्धतीने लोकसहभागातुन विविध कामे पूर्ण करावीत. केवळ शासकीय कार्यक्रम न राहता, ग्रामस्थांनी स्वतः पुढाकार घेऊन या अभियानाला लोकचळवळीचे स्वरूप देण्यास सहकार्य करावे, असे आवाहन रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले केले.



श्रमदानातून वनराई बंधारा

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

पावसाने लवकर दडी मारली आहे. त्यामुळे नदी, तलावांमधील पाण्याची पातळी कमी होऊ लागली आहे.पाण्याची समस्या आगामी काळात भेडसावण्याची शक्यता वर्तविली जात आहे. नदीमधील भूजल पातळी वाढविण्यासाठी तालुक्यातील महाजने येथील ग्रामस्थ व महिला एकवटले. श्रमदानातून त्यांनी गुरुवारी (दि.२९)नदीमध्ये वनराई बंधारा बांधून पाणी बचतीचे महत्व पटवून दिले.

यंदा पावसाने उशीरा एंट्री केली.जिल्ह्यातील धरणे, तलाव, नदी, पाण्याने भरल्या. ओसंडून पाणी वाहू लागले होते. मात्र पाऊस जास्त काळ राहिला नाही. ऑगस्टनंतर पावसाने दडी मारली. त्यामुळे पावसाच्या हंगामात उन्हाळी वातावरण निर्माण झाले. त्याचा परिणाम जलपातळीवर झाला. जिल्ह्यातील धरणांसह नदी, तलावांमधून जलसाठा कमी होऊ लागला आहे. काही नद्या, तलाव कोरडे पडू लागले आहेत. त्यामुळे पाण्याचा दुष्काळ निर्माण होण्याची भिती निर्माण झाली आहे. पाणी संकट रोखण्यासाठी अलिबाग तालुक्यातील महाजने येथील ग्रामस्थ व महिलांनी पुढाकार घेतला आहे. गावातील ग्रामस्थ व महिलांनी हातात कुदळ, टीकाव, फावडा, घमेल आणि प्लास्टीकच्या पिशव्या घेऊन नदीमध्ये वनराई बंधारा बांधण्यास सुरुवात केली. नदीलगत असलेली माती, खडी, प्लास्टीक पिशवीमध्ये घमेलाद्वारे भरण्यात आला. माती, खडीने भरलेल्या पिशव्या बांधून श्रमदानातून वनराई बंधारा तयार करण्यात आला. सकाळपासून सुरु करण्यात आलेल्या या उपक्रमाला ग्रामस्थ व महिलांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पाण्याच्या दुष्काळापासून राबविलेल्या या उपक्रमाचे सर्वस्तरातून कौतुक करण्यात आले.

मार्गदर्शन मेळावा उत्साहात!

| माणगाव | प्रतिनिधी |

माणगाव तालुका पाटबंधारे खाते सेवानिवृत्त कर्मचारी संघ माणगाव यांच्यावतीने संघाचा बारावा वर्धापनदिन व मार्गदर्शन मेळावा पाटबंधारे खाते सेवानिवृत्त कर्मचारी संघ माणगाव अध्यक्ष नथुराम पाष्टे यांच्या अध्यक्षतेखाली व मान्यवरांच्या तसेच संघाचे पदाधिकारी व सदस्यांच्या उपस्थितीत कुणबी भवन,निजामपूर रोड,माणगाव येथे उत्साहात संपन्न झाला.

या वर्धापन दिनानिमित्त संघातर्फे मान्यवरांच्या उपस्थितीत मार्गदर्शनपर मेळावा तसेच सदस्य श्रीराम जाधव, विनायक सापळे, सखाराम बक्कम, मन्या सापळे,



परशुराम टेंबे, दत्ताराम पवार, सखाराम मालोरे, गणपत जाधव, भागोजी सकपाळ, उमाजी शिर्के, सदाशिव पवार, बबी भोस्तेकर, विठोबा कदम यांचा व नुकत्याच झालेल्या रायगड जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत तळाशेत जिल्हा परिषद गटातून निवडून आलेल्या जिल्हा परिषद सदस्या दिशा दिपक जाधव यांचा सत्कार करण्यात आला. तसेच संघातील सभासदांची मुले,नातेवाईक जे शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६ मध्ये इयत्ता दहावी,बारावी,पदवी,पदविका उत्तीर्ण झालेत अशा गुणवंतांचा गुणगौरव करण्यात आला.या कार्यक्रमात संघाचे दिवंगत सदस्यांना संघातर्फे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

मजगांवची निवडणूक बॅलेट पेपरवर घेण्याची मागणी

| कोर्लई | प्रतिनिधी |

आगामी काळात होणाऱ्या ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीत मुरुड तालुक्यातील मजगांव ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक बॅलेट पेपरवर घेण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर फलेभाई यांनी केली आहे.

केंद्रात आणि राज्यात सन २०१४ पासून ईव्हीएम मशीनद्वारे निवडणूक आयोगाने निवडणुका घेतल्या जात आहेत. इव्हीएम मशीन मधील तांत्रिक दोषाबाबत शंकाकुशंका घेतल्या जात आहेत.निवडणूकीत सदोष मतदान व्हावे.यासाठी बहुतांशी ठिकाणी बॅलेट पेपरवर मतदान घेण्यात यावे, अशी मागणी जोर धरत आहे.

आगामी काळात होणाऱ्या ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीत मुरुड तालुक्यातील मजगांव ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकीत ८० टक्क्यांहून अधिक लोकांचा कल बॅलेट पेपरवर निवडणूक व्हावी, असे माझे मत आहे.

याकरीता शासनाच्या संबंधित निवडणूक आयोगाने, विभागाने जनमताचा कौल जाणून आगामी काळात होणाऱ्या मजगांव ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूक बॅलेट पेपरवर घेण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर फलेभाई यांनी केली आहे.

वीज कंत्राटी कामगारांचे राज्यव्यापी आंदोलन

| उरण | प्रतिनिधी |

महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाच्या वतीने मंगळवारी, २७ ऑक्टोबर २०२६ रोजी राज्यव्यापी आंदोलन करण्यात आले. राज्यातील २६ जिल्ह्यांतील १० हजारांहून अधिक वीज कंत्राटी कामगार आंदोलनात सहभागी झाले. वेतन, रोजगार सुरक्षा, कंत्राटदारांकडून होणारा अन्याय आणि प्रलंबित आर्थिक लाभ या मागण्यांसाठी आंदोलन करण्यात आले.



भारतीय मजदूर संघाशी संलग्न महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ संघटनेच्या नेतृत्वाखाली सकाळी १० वाजता महावितरणच्या प्रकाशगड येथील मुख्य कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. त्यानंतर दुपारी २ वाजता कामगार आयुक्त कार्यालयासमोर आंदोलनाचा दुसरा टप्पा पार पडला.

महावितरणचे मानव संसाधन संचालक राजेंद्र पवार यांच्या सूचनेनुसार मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी संजय ढोके यांनी संघटनेच्या शिष्टमंडळाला चर्चेसाठी आमंत्रित केले. दुपारी झालेल्या बैठकीत संघटनेने मांडलेल्या मागण्यांवर चर्चा झाली.

पगारातून रिफंडच्या नावाखाली पैशांची मागणी करणे किंवा कामावरून कमी करण्याची धमकी देणे, अशा तक्रारी लेखी स्वरूपात प्राप्त झाल्यास चौकशी करून दोषी कंत्राटदारांवर कारवाई करण्यात येईल. आवश्यकतेनुसार संबंधित कंत्राटदारांचा काळ्या यादीत समावेश करण्याची भूमिका प्रशासनाने मांडली.

कंत्राटी कामगारांच्या वारंवार बदल्यांमुळे कामगारांच्या सुरक्षिततेवर आणि प्रलंबित वीज देयकांच्या वसुलीवर परिणाम होत असल्याचे संघटनेने सांगितले. या विषयावर दिवाळीनंतर संचालक स्तरावर बैठक घेण्याबाबत चर्चा झाली. न्यायालयीन संरक्षित कामगारांची नावे स्थानिक पातळीवर संपर्क पोर्टलवरील नोंदी तपासाव्यात, असे आवाहन करण्यात आले.

विविध विकासकामांना मंजुरी **जाहिरात फलक निष्कासनाचा प्रस्ताव नामंजूर**

पनवेल महापालिकेच्या स्थायी समितीचा धडाका

| कळंबोली | प्रतिनिधी |

पनवेल महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा बुधवार, २८ ऑक्टोबर रोजी महापालिका मुख्यालयात स्थायी समिती सभापती बबन मुकादम यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत शहरातील विविध विकासकामे, सार्वजनिक सुविधा, आरोग्यविषयक उपाययोजना तसेच महापालिकेच्या प्रशासकीय कामकाजाशी संबंधित अनेक महत्त्वपूर्ण विषयांना मंजुरी देण्यात आली. मात्र, पुणे-मुंबई महामार्गालगत असलेले जाहिरात फलक निष्कासित करण्यासाठी निधी वर्ग करण्यासंबंधीचा



प्रस्ताव समितीने नामंजूर केला.

बैठकीस स्थायी समितीचे सर्व सदस्य, सचिव नानासाहेब कामठे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त रविकिरण घोडके, उपायुक्त स्वरूप खारगे, उपसचिव अक्षय कदम यांच्यासह महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

प्रभाग समिती ड अंतर्गत विविध ठिकाणी असलेल्या पनवेल महानगरपालिकेच्या मालकीच्या सार्वजनिक शौचालयांची आवश्यकतेनुसार दोन वर्षांच्या कालावधीत दुरुस्ती व नूतनीकरण करण्याच्या कामाच्या सुधारित प्रशासकीय खर्चास स्थायी समितीने मान्यता दिली.

प्रभाग समिती अ अंतर्गत नावडे गावातील रस्त्यांचे काँक्रिटीकरण तसेच पूर्वनिर्मित पावसाळी गटार बांधण्याच्या प्रस्तावालाही मंजुरी देण्यात आली. त्यामुळे संबंधित परिसरातील रस्ते व पावसाळी पाण्याच्या निचऱ्याची समस्या दूर करण्यास मदत होणार आहे. महापालिकेच्या विविध सभा व कार्यक्रमांचे व्हिडीओ शूटिंग, छायाचित्रण तसेच लाईव्ह व्हिडीओ शूटिंग करण्यासाठी वाढीव प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. महापालिका क्षेत्रातील आवश्यक कामांसाठी किटकनाशके व रासायनिक जंतुनाशके पुरविण्याच्या प्रस्तावासही स्थायी समितीने मंजुरी दिली.

दरम्यान, पुणे-मुंबई राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ (जुना-४) लगत पनवेल महानगरपालिका हद्दीतील जाहिरात फलक निष्कासित करण्यासाठी म रारविम, शिबीर कार्यालय, पुणे यांना ४४.५० लाख रुपयांची रक्कम वर्ग करण्यासंदर्भातील प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्याचा प्रस्ताव स्थायी समितीने नामंजूर केला.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- नागाव येथील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी खालील पदांसाठी स्टाफची आवश्यकता आहे : रिसेप्शनिस्ट २ जागा, रेस्टॉरंट कॅप्टन १ जागा, हाऊसकीपर फक्त पुरुष (२ जागा), इंडियन चायनीज कुक १ जागा, मोरी - १ जागा, वेटर - १ जागा. इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ या वेळेत संपर्क साधावा किंवा वर मेसेज करावा. संपर्क क्रमांक: ७५५९१८४६१२
- नोकरीची सुवर्णसंधी! - अलिबाग येथील ऑफिससाठी स्टाफ पाहिजे!, ऑफिसमध्ये काम करण्यासाठी कर्मचारी आवश्यक, आकर्षक पगार, नोकरीचे ठिकाण: अलिबाग, रायगड मुलाखतीसाठी आजच संपर्क साधा! ९९२३७५०५३९/९१०५७१७०३८ इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा! चांगल्या पगारासह नोकरीची उत्तम संधी!
- नोकरीची संधी - Tally Operator अलिबाग येथील कर सल्लागारांच्या कार्यालयासाठी Tally Operator आवश्यक आहे. अकाउंटिंगचे ज्ञान आवश्यक. वाणिज्य शाखेची शैक्षणिक पार्श्वभूमी असणे आवश्यक. अनुभवी उमेदवारांना प्राधान्य. महिला उमेदवारांना प्राधान्य. वय ३० वर्षांपेक्षा जास्त असावे. कार्यालयाचे ठिकाण : अलिबाग संपर्क : ९५९५०३२३२०/९८२३१३५५०१

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२९०/ २२२७६१

जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीस द्वारे सूचित करण्यात येते की, सदरहू जमिन मिळकतीचे मालक मे.वसुंधरा हौ. कॉपोरेशन भागीदार संस्था तर्फे भागीदार शैलेश सागरमल जैन व दिनेश संपतराज मेहता यांनी खालील वर्णन केलेली मिळकत कायम खरेदीखताने आमचे अशिल मुजाहिद अब्दुल रउफ खोत यांना विक्री करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे

मौजे शेलू, ता. कर्जत, जि. रायगड.

सर्व्हे नं	क्षेत्र (गुंठे)	सात बारा वरील आकार
१०७/१	०.२०.००	३.३४

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, विकसनकरार, ताबा, कब्जा, वहिवाट, गहाण, दान, लिज, वैगरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाचे आत खालील सही करणार वकील यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत हि निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशील व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दिनांक - २९/१०/२०२६ सही/-
वकील किशोर अनंता दिघे
मो.नं ८००७९७०१५१

जाहीर नोटीस

माझे आशील यांनी दिलेल्या माहिती वरून व सांगितले वरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणे:-

मौजे आंबेली, ता. तळा, जि.रायगड हद्दीतील खालील वर्णनाची मिळकत.

मौजे	गट क्रमांक व उपविभाग	क्षेत्र हे आर.	आकार रू. पैसे
आंबेली	२३०	०.४०.००	०.२७

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत व त्यात असलेला झाड झाडोरा, वहिवाटीचे हक्क, कुंपण, वगैर सह अशी मिळकत माझे आशील यांनी मिळकतीचे विद्यमान मालक श्री. दत्तात्रेय नारायण वाघरे, वगैरे २ मु. आंबेली, ता. तळा, जि.रायगड यांचे पासून खरेदी घेणेबाबत बोलणी केली आहे. मिळकतीचे विद्यमान मालक यांनी संदर्भित मिळकत त्यांचे मालकी हक्काची व निर्वेध असल्याचा भरवसा माझे आशिल यांस दिला असून मिळकतीच्या मालकी हक्काची तपासणी करण्यास संमती दिली आहे. या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, दान, कब्जा, वहीवाटीचे हक्क, लिन, कुळवहिवाट वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांजकडे नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजुन आमचे आशील व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

तळा **(अ‍ॅड. गितेश प्रदिप मेकडे)**
तारीख २८.१०.२०२६ मु.पो. ता.तळा, जि.रायगड
मोबाईल नं.८९८३४३५३८२

जाहीर नोटीस

माझे आशील यांनी दिलेल्या माहिती वरून व सांगितले वरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणे:-

मौजे आंबेत, ता.म्हसळा, जि.रायगड हद्दीतील खालील वर्णनाची मिळकत.

मौजे	भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र हे.आर.	आकार रू.पैसे
आंबेत	९००	०.१७.५०	१.९१
आंबेत	९११	०.०५.१०	१.१२

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत व त्यात असलेला झाड झाडोरा, वहिवाटीचे हक्क, कुंपण, वगैरे सह अशी मिळकत माझे आशील यांनी मिळकतीचे विद्यमान मालक श्री.उमर सो.अ.कादीर डावरे, वगैरे १ मु.आंबेत, ता.म्हसळा, जि.रायगड यांचेपासून खरेदी घेणेबाबत बोलणी केली आहे. मिळकतीचे विद्यमान मालक यांनी संदर्भित मिळकत त्यांचे मालकी हक्काची व निर्वेध असल्याचा भरवसा माझे आशिल यांस दिला असून मिळकतीच्या मालकी हक्काची तपासणी करण्यास संमती दिली आहे. या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, दान, कब्जा, वहीवाटीचे हक्क, लिन, कुळवहिवाट वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांजकडे नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजुन आमचे आशील व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

तळा
तारीख २८.१०.२०२६ **(अ‍ॅड. गितेश प्रदिप मेकडे)**
मु.पो. ता.तळा, जि.रायगड
मोबाईल नं.८९८३४३५३८२

जाहीर नोटीस

सर्व लोकांस जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे-गुंडगे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत आहे. सदरहू मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीचे मालक सुनील चमनलाल गुप्ता यांचेकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

-: मिळकतीचे वर्णन :-

मौजे - गुंडगे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत.

अ.क्र.	भूमापन क्र./ उपविभाग नं.	क्षेत्र अकृषिक आर.चौ.मी	आकार
१.	१/१/अ	२-२०-००	२२.००
२.	१/१/ब/२	१७-१८-००	१७१.८०
३.	१/१/ब/३	१६-१४-००	१६१.४०
४.	१/१/ब/६	१०-१२-००	०.००
	एकुण	४५-६४-००	

तरी सदर मिळकती संबंधी कोणाही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण दान, बक्षीस, खरेदीखत, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मुत्युपत्र बोजा अथवा अन्य कोणत्याहि प्रकारचा कायदेशीर हक्क-हितसंबंध असल्यास त्यांच्या लेखी हरकती अशा हरकती मध्ये नमुद केलेल्या हक्कांबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १५ दिवसांचे मुदतीत प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात या प्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील व वरील मुदती नंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

कर्जत
तारीख : ३०/१०/२०२६ **ADV. KONDE-DESHMUKH**
B.A, LL.B. GDCA
A/4, Jai Nagar Society, Opp. Kinara Society,
52 Bunglow, Court Road, Old Panvel,
Dist Raigad - 410206 Phone: 9920334933
Email: prasadkondedeshmukh@gmail.com

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे मार्केवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक अशोक सदाशिव बागडे यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्रफळ हे. आर. पॉ	आकार रु. पै.
५	१७	०-१९-००	०-२०

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार अ‍ॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २९/१०/२०२६ **अ‍ॅड. समीर आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं.०९,कोर्ट व्ह्यू बिल्डींग,
तळ मजला, दिवाणी व फौजदारी
न्यायालयासमोर, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **- मुख्य संपादक**

जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे गणेगांव चिंचवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्क नोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

मिळकतीचे वर्णन
मौजे गणेगांव चिंचवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत

जमिन मालकाचे नाव	सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु. पै.
१) तानाजी पांगा थोरवे २) गुलाब रघूनाथ दाभणे ३) गंगुबाई सावळाराम ठोंबरे ४) जनाबाई बाळू भोईर उर्फ जनाबाई बाळा भाईर	५५	३	०-७८-००	१०.२८

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पूराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक : ३०/१०/२०२६

अ‍ॅड. साहिल राजेंद्र निगुडकर
पत्ताः कोर्ट व्ह्यु को.ऑप. हौ. सोसायटी, शॉप नं. १, कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत रायगड
मो.: ९५९५३२४२३४/९५६१५७५६२६

अ‍ॅड. राजेंद्र पी. निगुडकर
पत्ताः कोर्ट व्ह्यु को. ऑप. हौ. सोसायटी, शॉप नं. १, कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत रायगड
मो.: ९८२२७७४०७५/८४८४९६५६२६

तहसिलदार तथा शेतजमिन न्यायाधिकरण, कर्जत यांचे न्यायालयात
पत्ता : प्रशासकिय भवन, पहिला मजला, पोलिस मैदानाजवळ, कर्जत, ता. कर्जत जि. रायगड- ४१०२०१

जाहीर नोटीस

७० ब दावा क्रमांक : टेनन्सी/एस/आर/०८/२०२६

प्रति,
१. श्री. दशरथ नारायण खडे
२. श्री. एकनाथ नारायण खडे अर्जदार
३. श्री. नरेश नारायण खडे
रा. गुढवण ता. कर्जत जि. रायगड, पिन - ४१०१०१
विरुद्ध
१. श्री. कोंडू गंगाराम खडे सामनेवाले
रा. गुढवण, ता. कर्जत, जि. रायगड

तमाम जनतेस तसेच सामनेवाले/प्रतिवादी यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे गुढवण, ता. कर्जत, जि. रायगड या जमिन मिळकती संदर्भात ७० ब अन्वये अर्ज दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये दिनांक १७/०९/२०२६ रोजी प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र सामनेवाले हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर दाव्याची पुढील सुनावणी दिनांक ०२/११/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता तहसिल कर्जत, जि. रायगड येथे निश्चित करण्यांत आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले यांना तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींनी सुनावणीच्या दिवशी तहसिलदार तथा शेतजमिन यांचे न्यायालयात समक्ष येऊन आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही यांची नोंद घ्यावी.

जमिन मिळकतीचे वर्णन

तालुक्याचे नाव	गावाचे नाव	भूमापन क्र. (सर्व्हे नं./गट नं)	पोट हिस्सा क्रमांक	क्षेत्रफळ हे.आर.पॉ.	आकार रु. पैसे.
कर्जत	गुढवण	७	२	०-०४-००	०.०२

सदरची जाहीर नोटीस आजरोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली.

ठिकाणः कर्जत सही/-
दिनांक : २६/१०/२०२६ **तहसिलदार तथा शेतजमिन न्यायाधिकरण कर्जत**

जाहिर नोटिस

सर्व लोकांना या नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिल यांनी मोजे आडीवली, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड येथील या मिळकतीचे मालक १) पंढरीनाथ तुळशीराम गवळे, २) शोभा पुंडलीक रोकडे, ३) आशा सुरेश गवळे, ४) प्रवीण सुरेश गवळे, ५) प्रदीप सुरेश गवळे ६) प्रणाली सुरेश गवळे, ७) नीलेश रामदास गवळे, ८) निलम समाधान गायकवाड ९) निशा दीपक पवार, १०) निकिता सिद्धार्थ अडसुले, ११) दीपिका रामदास गवळे, १२) अंकिता रामदास गवळे, १३) सुनंदा रामदास गवळे, १४) रुतीकेश रामदास गवळे यांच्या कडून कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरवले असुन सदर मिळकतीचे वर्णन खालिल प्रमाणे

सर्वे क्रमांक/हिस्सा क्रमांक	क्षेत्र हे.आर.चौ.मी.	आकारणी
१. ६/२	०.०९.६० पो.ख.०.००.०० एकूण क्षेत्र - ०.०९.६०	१.६२
२. ७/४	०.१०.०० पो.ख.०.०२.०० एकूण क्षेत्र -०.१२.००	०.११
३. १५/१	०.५४.९० पो.ख. ०.१०.९० एकूण क्षेत्र -०.६५.८०	९.७५

सदर मिळकतींच्या अनुषंगे खरेदी व्यवहाराबाबत आमच्या अशिलाने जमीन मालकांशी बोलणी केलेली आहे तरी वर नमूद मिळकतीच्या अनुषंगे आमचे अशील व जमीन मालकांच्यादरम्यान होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा तक्रार असल्यास तसेच कोणत्याही वित्तीय बँक संस्था यांच्याशी तारण, बोजा, अथवा अन्य कुणाशीही गहाणखत, साठेखत, मृत्युपत्र, अधिकार, ताबा, लिज, लिन, पोटगी, चार्ज, खरेदीखत, बक्षिसपत्र, अन्न, वस्त्र इत्यादी अथवा वहिवाटीसंबंधी कोणतीही तक्रार असल्यास त्यांनी हि नोटिस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसात आवश्यक त्या कायदेशीर कागदपत्रांसहीत खालील नमूद वकीलांच्या पत्यावर लेखी हरकत नोंदवावी. विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अथवा तक्रार न आल्यास सदरहू मिळकत हि निर्वेध व बोजारहित असल्याचे मानून आमचे अशील सदरहू व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत/रायगड वकील
दि. ३०/१०/२०२६ **अ‍ॅड. क्रांती लक्ष्मण अभंगे**
पत्ताः ३०९ निंबेशवर लँडमार्क पाटील आळी कर्जत,
तालुका - कर्जत जिल्हा - रायगड ४१०२०१
मो. नं. ९१६८२७००८३

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे वंजारवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक सुकली रुपाराम चौधरी यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्रफळ हे.आर.पॉ	आकार रु. पै.
१९	१/ब	०-३३-८०	१-१५

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार अ‍ॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २९/१०/२०२६ **अ‍ॅड. समीर आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता- गाळा नं.०९,कोर्ट व्ह्यू बिल्डींग,
तळ मजला, दिवाणी व फौजदारी
न्यायालयासमोर, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

-: जाहीर नोटीस :-

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविळयात येते की, खाली नमुद केलेल्या शेत जमीन मिळकती या खाली लिहिलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसुल दप्तरी नांवे असून ती त्यांचे खुद्द, ताबा, कबजा, मालकी, वहीवाटीतील आहे, त्या शेत जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

मौजे हरनेरी, ता. सुधागड जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत

मालकाचे नाव	सर्वे क्र.	एकूण क्षेत्र हे.आर.	आकार रू.पै.	भोगवटा वर्ग
कृष्णा गोविंद मालुसरे	८/१/ब	०.३७.०० पैकी ०.१८.०० हे. आर.	०.०९	१

वरील मिळकतीसंबधात आमचे अशिल यांनी जमीन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे, यास्तव वरील मिळकतींवर अन्य कोणाचा दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, साठेकरार अखत्यार लिएन चार्ज, अ‍ॅटॅचमेंट, अन्न, वस्त्र निवारा कुळवहिवाट, ताबा, कबजा, वहीवाट वचनचिठ्ठी दावा दरखास्त, जप्ती, मॉर्टगेज, संपादन, रिझव्हेशन, रेक्वीझेशन अगर अन्य प्रकारचा बोजा, हक्क, हितसंबंध तसेच एकत्र कुटूंब मिळकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसाचे आत खालील सही करणार अ‍ॅडव्होकेट यांजकडे प्रत्यक्ष भेटून मुदतीमध्ये हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात, तशा प्रकारच्या हरकती मुदतीत दाखल न केल्या गेल्यास सदरच्या वरील मिळकती पुर्णपणे निर्वेध असल्याचे गुहीत धरून आमचे अशिल वरील जमीन मालकांशी खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणाऱ्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

हे कळावे,
दिनांकः २९/१०/२०२६ **अ‍ॅड. रुचिता संतोष भगत,**
अ‍ॅडव्होकेट
मु. पोष्ट जांभूळपाडा
ता. सुधागड, जि.रायगड
मोबा नं. : ९८६०२४७७३९

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
विशेष वसुली अधिकारी कार्यालय अलिबाग रायगड फॉर्म झेड
(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)
त्यावर मिळकतीचा कब्जा सूचना

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग शाखा पोलादपूर चे वसुली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णीत ऋणको यांना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटिस दिनांक २७/०७/२०२६ रोजी निर्गमित केली. व त्या नंतर दिनांक २१-०८-२०२६ रोजी जप्ती सूचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री. महेश रमेश केसरकर व सौ.अरुणा महेश केसरकर यांच्यासह इतर न्यायनिर्णीत ऋणको यांना सूचनेत नमूद केलेली दिनांक १५-०१-२०२६ पर्यंतची रक्कम रुपये ४,९५,७६९/- व दिनांक ३१.०५.२०२५ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची सदरहू सूचना प्राप्त झालेनंतर वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील व्याज १३.५ टक्के दराने भरण्यास संगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सूचना जारी करून येथे खालील माहिती मिळकत जप्त केली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्व सामान्य जनतेला सूचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ उपनियम ११ (डी ११-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून महसुली गाव-तुर्भे बु. तालुका-पोलादपूर, जिल्हा-रायगड हद्दीतील मिळकत क्रं. ग.नं. १२०/८, क्षेत्र ०.९७.०० येथील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि पोलादपूर च्या दिनांक १५-०१-२०२६ पर्यंतची रक्कम रुपये ४,९५,७६९/-व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काच्या आधिन राहील.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

कर्जदारः- श्री.रमेश महेश केसरकर व सहकर्जदार अरुणा महेश केसरकर महसुली गाव-तुर्भे बु.तालुका पोलादपुर, जिल्हा-रायगड येथील सौ. अरुणा महेश केसरकर यांच्या नावे असलेली मिळकत क्रं. १२०/८ क्षेत्रफळ ०.९७.०० आर

स्थळ-पोलादपूर
दिनांक-०३/१०/२०२६ सही/-
श्री एस.एस कदम
विशेष वसूली व विक्री अधिकारी पोलादपूर रायगड
इतर रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

दिनांक : ३०/१०/२०२६

जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल अंगद स्वामीनाथ शर्मा व गुड्डु कमल सिंह यांनी खालील नमुद केलेली विद्यमान मालक दिलीप लक्ष्मण पाटील यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील मिळकत आहे. सदर मिळकतीच्या विक्री संदर्भात बोलणी आमचे अशिल यांच्याबरोबर ठरलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पै.)
ढवर ता.अलिबाग	५२३	०-०३-१० पो.ख. ०-००-२० एकुण ०-०३-३०	०.३६

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

सही/-
अ‍ॅड. गणेश शां.भगत
जिल्हा न्यायालय अलिबाग रायगड
फोन नं. ९८८१५२८७७०

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील गट नंबर ४२०, क्षेत्र ०-३३-४० हे. आर, पो. ख. ०-०२-३० हे. आर., एकूण क्षेत्र ०-३५-७० हे.आर., आकार ८.५० रू. पैसे, पैकी क्षेत्र ०-२४-४० हे. आर., पो. ख. ०-०२-३० हे.आर. एकुण क्षेत्र ०-२६-७० हे. आर. आकार रू. ६.२१ पैसे ही मिळकत, (तद्नंतर सदर जाहीर नोटीशीत ''सदर मिळकत'' असा उल्लेख केलेला आहे.) या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.चिराग चैनमल जैन यांनी सदर मिळकत त्यांचे सर्व मालकी हक्क व अधिकारांसह आमच्या अशिलांना कायमखुश खरेदीखताने विक्री करण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत पुर्णतः निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा सदर मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, कुळ हक्क, लीज, लीन, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क कुलमुखत्यार इत्यादी स्वरूपात हक्क व हितसंबंध असल्यास वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. व तशी पोच घेवुन खात्री पटवुन द्यावी. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत ही पुर्णपणे निर्वेध व निजोखमी आहे, असे समजून व सदर मिळकतीमध्ये अन्य इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार नाही असे गृहित धरून व असल्यास ते त्यांनी आमचे अशिलांचे लाभात जाणीवपुर्वक सोडून दिलेले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत वा तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २९/१०/२०२६ **(अ‍ॅड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो.,ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड.

जाहीर नोटीस

या जाहिर नोटीशीद्वारे सर्व संबंधितांना कळविणेत येते की, खालील नमुद मिळकतीचे मालक श्री. नरेश काशिनाथ डायरे, श्री. नंदू काशिनाथ डायरे, यशोदा नंदकुमार तरे, वनिता विठ्ठल पेमारे आणि शेवंतीबाई काशिनाथ डायरे यांनी त्यांची खालील नमुद मिळकत आमचे अशिलांना विकत देणेचे ठरविले आहे.

मौजे अंत्राट तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत

भुमापन क्रमांक	भुमापन क्र.चा उपविभाग	क्षेत्र हे.आर.	आकार रु. पै.
७५	८	०-४२-०० पो.ख. ०-०१-००	०-४७
		एकूण ०-४३-००	

वरील नमूद मिळकत व त्यामधील तदंगभुत हक्कहितसंबंध सुद्धा.

सदर जमिन मिळकतीबाबत विक्री करण्याचा प्रस्ताव असून, सदर मिळकतीबाबत कोणत्याही व्यक्तीचा मालकी हक्क, वारसा हक्क, ताबा, गहाण, बोजा, करार, हक्कसंबंध अथवा अन्य कोणताही दावा/हरकत असल्यास त्यांनी या नोटीसच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून २१ (एकवीस) दिवसांचे आत आवश्यक कागदपत्रांसह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर लेखी स्वरुपात कळवावे. नमुद विहित मुदतीमध्ये कोणतीही हरकत अथवा दावा प्राप्त न झाल्यास, सदर मालमत्तेबाबत कोणाचाही दावा किंवा हरकत नाही असे गृहित धरुन वरील नमुद मालकांबरोबर सदर मिळकतीसंदर्भात पुढील विक्री व्यवहार करण्यात येईल. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही दाव्यास तसेच तक्रारीस विक्रेता जबाबदार राहणार नाही.

दि. २९ ऑक्टोबर २०२६ सही /-
खरेदीदारातर्फे अ‍ॅडव्होकेट
अ‍ॅड.सारिका भास्कर मुने
ऑफिस पत्ता-स्वप्ननगरी, शॉप नं. ९,
गुरुनगर रोड, मुद्रे खुर्द, ता.कर्जत,
जि. रायगड. ४१०२०१
मो.नं.७०३०५४४७८८/८७६६५०३०१९

जाहीर नोटीस

याद्वारे सर्व संबंधितांस जाहीर नोटीस देण्यात येत आहे की, मौजे कोर्लई, ता.मुरूड, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत :-

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्रफळ हे-आर-प्र	आकार रु - पै.
१०४	४	०-५१-००	००-७९

वरील मिळकतीवर ग्रामपंचायत घर क्र. ७४५ व घर क्र. ७४६ अशी दोन घरे असून सदर प्रत्येकी घराचे मोजमाप सुमारे १२२५ चौ. फुट आहे.

अशी वर उल्लेखित जमीन मिळकत व त्यावरील दोन घरे ही मिळकत श्री. रमेशकुमार सत्यनारायण कागझी व सौ. बिना रमेशकुमार कागझी यांचे मालकीची असून सदरहू मिळकतीबाबत सदर मालकांनी आमचे अशिल श्री. राजेश मधुकर पोखरकर यांचेशी दि. २५/०२/२०२६ रोजी समजौता करार करुन सदरहू, मिळकतीचा भाग मोबदला आमचे अशिलांकडून स्विकारलेला आहे, परंतु सदर मालक हे समजौता करारात ठरलेप्रमाणे सदरहू मिळकतीचे खरेदीखत आमचे अशिलांचे नावे करुन देत नसल्याने आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीबाबत श्री. रमेशकुमार सत्यनारायण कागझी व सौ.बिना रमेशकुमार कागझी यांचेविरुद्ध दि. २५/०२/२०२६ रोजीच्या समजौता कराराची पुर्तता करणेसाठी मे. दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर), अलिबाग यांचे न्यायालयात विशेष दिवाणी दावा क्र. ८७/२०२६ दाखल केलेला आहे. सदर दाव्याची नोटीस श्री. रमेशकुमार सत्यनारायण कागझी व सौ. बिना रमेशकुमार कागझी यांना मिळाली असून ते सदर दाव्यामध्ये हजर झालेले आहेत. आमचे अशिलांनी सदर दावा प्रलंबित असलेबाबत दुय्यम निबंधक, अलिबाग यांचे कार्यालयात दस्त क्र.अलज/७८३७/२०२६ अन्वये लिज पेंडन्सीची नोंद केलेली आहे.

सदरहू मिळकतीबाबत समजौता कराराची पुर्तता करणेसाठी मे. न्यायालयात दावा प्रलंबित असतांनाही श्री.रमेशकुमार सत्यनारायण कागझी व सौ. बिना रमेशकुमार कागझी हे सदरहू मिळकत विविध गिऱ्हाईकास दाखवत आहेत व सदरहू मिळकत विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत असे आमचे अशिलांना खात्रीशीर समजले आहे. तरी आमचे अशिल तमाम जनतेस सुचित करतात की, सदरहू मिळकतीबाबत श्री. रमेशकुमार सत्यनारायण कागझी व सौ. बिना रमेशकुमार कागझी यांनी आमचे अशिलांशी दि. २५/०२/२०२६ रोजी समजौता करार केलेला असून आमचे अशिलांकडून सदरहू मिळकतीचा भाग मोबदला घेतलेला आहे व सदर समजौता कराराची पुर्तता करणेसाठी मे. दिवाणी न्यायालयात वाद प्रलंबित आहे, त्यामुळे सदरहू मिळकतीबाबत श्री. रमेशकुमार सत्यनारायण कागझी व सौ. बिना रमेशकुमार कागझी यांचेशी कोणीही व्यवहार करू नये. जर असा कोणताही व्यवहार श्री. रमेशकुमार सत्यनारायण कागझी व सौ. बिना रमेशकुमार कागझी यांचेशी केल्यास सदर व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग सही/-
दिनांक ३०/१०/२०२६ **हेमंत पाटील अ‍ॅण्ड असोसिएट्स**
वकील व कायदेशीर सल्लागार
१०५, परिश्रम सोसायटी, १ ला मजला,
मामल क्लासेसच्या बाजुला, शहाड स्टेशनजवळ,
शहाड (प.), ता. कल्याण, जि. ठाणे पिन : ४२११०३.
मो. ९९६७२१९०३३/९२२३८१३०८८

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली मौजे-पेण ग्रामीण, ता. पेण, जि. रायगड येथील सामाईक मालकीच्या बिनशेती मिळकतीचे विद्यमान जमीन मालक यांच्या मालकी हक्क व ताबेकब्जातील बिनशेती मिळकत ही रजि. खरेदीखताने खरेदी करण्याबाबत आमचे अशिल अनुक्रमे १) श्री.दिलीप बाळाजी पाटील, २) श्री.जितेंद्र तुलसीदास म्हात्रे, ३) श्री.विजय जयराम म्हात्रे, सर्व रा.पेण, ता.पेण, जि. रायगड यांच्यासोबत सदरहू शेत जमीन मिळकतीचा खरेदी व्यवहार ठरविण्यात आलेला आहे. सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यास सदरहू सामाईक बिनशेती मिळकतीचे विद्यमान मालक यांनी अनुमती दिलेली आहे. सदरच्या सामाईक बिनशेती मिळकतीचे ७/१२ उताऱ्याप्रमाणे असलेले वर्णन खालीलप्रमाणे-

बिनशेती मिळकतीचे वर्णन-

मौजे	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (आर.चौ.मी.)	आकारणी (रु.पै.)
पेण ग्रामीण	१७८ /ब/२५	५.३६.००	३४३.०४

वरील सामाईक मालकी असलेल्या बिनशेती मिळकतीचे संपूर्ण क्षेत्र म्हणजेच ५.३६.०० आर.चौ.मी. क्षेत्र या जाहीर नोटीसचा विषय आहे.

वरील वर्णनाच्या सामाईक मालकीच्या बिनशेती मिळकतीचे विद्यमान जमीन मालक यांच्या प्रत्यक्ष मालकी हक्क व ताजेकब्जातील संपूर्ण सामाईक बिनशेती क्षेत्र म्हणजेच ५.३६.०० आर.चौ.मी. क्षेत्र हे पूर्णतःहा निर्वेध, बोजाविरहित व विनाजोखीम असल्याबाबतचा हवाला सदरच्या बिनशेती मिळकतीचे विद्यमान जमीन मालक यांनी आमचे अशिलांना दिला आहे. याउपरही सदरहू सामाईक मालकीच्या बिनशेती मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही भाडेपट्टा, गहाण, बोजा, कुळ, वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, विकसन करारनामा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह अगर लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने २१ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे पोहचतील अशा रीतीने पाठवाव्यात.


याप्रमाणे वरील मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास सदरहू सामाईक मालकीच्या बिनशेती मिळकतीमधील विद्यमान जमीन मालक यांचा असणारा मालकी हक्क हा निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजण्यात येऊन आमचे अशिल हे विद्यमान जमीन मालकांच्या मालकी हक्क व ताबेकब्जातील वरील सामाईक मालकी असलेल्या बिनशेती मिळकतीच्या खरेदी व्यवहाराबाबत सुरू असलेली बोलणी पूर्ण करून सदरहू बिनशेती मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. तसेच वरील मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही तक्रार अगर हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण - रायगड अशिलांचे वकील
दिनांक - ३०/१०/२०२६ **अ‍ॅड. श्री.जयंत घ.वैरागी**
ऑफिस :- ''वैरागी व्हिला'',
पेण नगरपरिषद कार्यालय समोर, पेण,
चिंचपाडा रोड, पेण, ता.पेण, जि.रायगड.
मो.नं. ९८८१६७१४२४

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

निवडक



'व्होट चोर, गद्दी छोड'च्या घोषणांनी पनवेल दणाणले

पनवेल : कथित मतचोरी आणि निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेच्या मुद्द्यावरून पनवेलमध्ये काँग्रेसने आक्रमक भूमिका घेतली. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या निर्देशानुसार पनवेल शहर ब्लॉक काँग्रेस कमिटीच्या वतीने मंगळवारी (दि.२७) ऑक्टोबर छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याजवळील चौकात 'व्होट बचाओ, देश बचाओ' आंदोलन करण्यात आले. 'वोट चोर, गद्दी छोड़' आणि 'ज्ञानेश कुमार हटाओ, देश बचाओ' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. लोकशाहीचे रक्षण आणि मतदानाच्या अधिकाराच्या संरक्षणासाठी काँग्रेस कार्यकर्त्यांनी आवाज उठवला. पनवेल शहर ब्लॉक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष डॉ. अमित दवे यांनी केंद्र सरकारच्या घोषणांवर टीका केली. या आंदोलनात काँग्रेसचे पदाधिकारी, नगरसेवक, ज्येष्ठ नेते, महिला पदाधिकारी आणि युवक कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. तसेच यशवंत सावळेकर, शशिकांत बांदोडकर, सुदाम पाटील, निर्मला मात्रे, हेमराज म्हात्रे, आदित्य सावळेकर, सुधीर मोरे, शाहिद मुल्ला, विकास भारतीय, राजाभाऊ दवे, सागर पगारे, अमित जगनाडे, आरती ठाकूर, नीता शेनॉय, अलका ठाकूर, चैताली ठाकूर आणि सुनंदा घरत यांच्यासह अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'अलबत्या गलबत्या नाटक मोफत दाखवा'

पनवेल : दिवाळीच्या सुट्टीत पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील शालेय विद्यार्थ्यांसाठी 'अलबत्या गलबत्या' हे बालनाट्य मोफत आयोजित करावे, अशी मागणी महाविकास आघाडीच्या नगरसेविका आर्या जाधव यांनी महापौर आणि महापालिका आयुक्तांकडे केली आहे. मुलांमधील मोबाईलचा वाढता वापर लक्षात घेता त्यांना मनोरंजनासोबतच सांस्कृतिक अनुभव मिळावा, हा या उपक्रमामागील उद्देश आहे. यासंदर्भात २८ ऑक्टोबर रोजी दिलेल्या निवेदनात जाधव यांनी पुणे महानगरपालिकेच्या उपक्रमाचा संदर्भ दिला आहे. पुणे महानगरपालिकेने मुलांना मोबाईलपासून दूर ठेवून त्यांचा कल इतर उपक्रमांकडे वळविण्यासाठी 'अलबत्या गलबत्या' हे नाटक मोफत उपलब्ध करून दिले होते. त्याच धर्तीवर पनवेल महानगरपालिकेनेही दिवाळीच्या सुट्टीत बालनाट्याचे आयोजन करावे, अशी विनंती त्यांनी केली आहे.

अल्पवयीन दुचाकी चालकांचा वावर

श्रीवर्धन : शहरामध्ये सध्या अल्पवयीन दुचाकी चालकांचा खुलेआमपणे वावर सुरू आहे. शहरामध्ये केवळ एकच वाहतूक पोलीस तैनात असल्यामुळे शाळेत जाणारी मुले सुद्धा आपल्या आई-वडिलांनी दिलेली दुचाकी घेऊन बिनधास्त शाळेत जात असतात. जे विद्यार्थी शाळेत दुचाकी घेऊन येतात, त्यांच्यावर शाळा प्रशासनाने देखील वचक ठेवणे गरजेचे आहे. एक मुलगा दुचाकी घेऊन शाळेत येतो, बघितल्यानंतर बाकीचे विद्यार्थी सुद्धा आपल्या पालकांकडे दुचाकी मिळावी यासाठी हट्ट करत असतात. शहरापासून जीवना बंदर हा विभाग मोठ्या अंतरावर आहे. विशेष करून या ठिकाणचे अनेक विद्यार्थी शाळेमध्ये दुचाकी घेऊन येतात. त्यांचे वय १८ पेक्षा खूप कमी असून, त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारचा चालक परवाना नाही. अशांवर कारवाई करून त्यांच्या पालकांवरती गुन्हा दाखल करावा, जेणेकरून पालक लहान मुलांच्या हातात दुचाकी देणार नाहीत, अशी मागणी होत आहे.



वनराई बंधारा काळाची गरज

पाताळगंगा : यंदा पावसाळा संपत असतानाच पाणीटंचाईचे संकट गडद होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. ऑक्टोबर महिन्यात थंडीची चाहूल लागण्याऐवजी उन्हाचा कडाका वाढत आहे. दुसरीकडे, जलस्रोतांची पातळी कमी होऊ लागल्याने पाणी जपून वापरण्याचे आवाहन सोशल मीडियाच्या माध्यमातून केले जात आहे. पावसाळ्यात डोंगरदऱ्यांतून वाहणारे पाणी अडवून यावरती वनराई बंधारे बांधणे ही भविष्यातील पाणीटंचाई रोखण्यासाठी महत्वपूर्ण भूमिका उपयोगी ठरू शकते. पावसाळ्याच्या अखेरीस ओढे-नाल्यांच्या प्रवाहात सिमेंटच्या गोण्यांमध्ये माती भरून त्या एकावर एक रचल्यास वाहणारे पाणी काही काळ अडवून ठेवता येते. यामुळे भूजल पातळी वाढण्यास मदत होण्याबरोबरच परिसरातील झाडे, शेतजमीन, पशुपक्ष्यांनाही पाण्याचा लाभ होऊ शकतो. त्याचा योग्य विनियोग केल्यास भविष्यातील पाणीटंचाईवर काही प्रमाणात मात करू शकतो. ग्रामीण भागात स्थानिक नागरिक, शेतकरी आणि युवकांनी पुढाकार घेऊन वनराई बंधारे उभारल्यास पाणीसंवर्धनाला चालना मिळेल. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या संकल्पनेची प्रभावी अंमलबजावणी करून भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी वनराई बंधारे बांधणे ही काळाची गरज बनली आहे.

बेकायदा होर्डिंगवर जाहिरातींचा धडाका

दोन वर्षांपासून कारवाई रखडली, दुर्घटनेनंतरच प्रशासन जागे होणार का?

। पनवेल । प्रतिनिधी ।

सर्वसामान्यांच्या हातगाड्या, टपऱ्या आणि फेरीवाल्यांवर धडाधड कारवाई करणाऱ्या पनवेल महापालिका प्रशासनाला महामार्गालगत उभ्या असलेल्या बेकायदा होर्डिंगवर कारवाई करण्याचा मात्र विसर पडला आहे का? महापालिकेनेच परवाने रद्द केलेली तब्बल २८ होर्डिंग दोन वर्षांहून अधिक काळ उलटूनही जागेवर कायम असून, त्यावर जाहिराती झळकत आहेत. त्यामुळे नियम सर्वसामान्यांसाठीच, तर मोठ्या होर्डिंगधारकांना अभय कशासाठी? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.



घाटकोपर येथे होर्डिंग कोसळून १७ जणांचा मृत्यू झाल्यानंतर राज्यभरात जाहिरात फलकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. त्यानंतर पनवेल महापालिका आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने संयुक्त सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणात राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ लगतची ३२ होर्डिंग बेकायदा असल्याचे आढळले. त्यापैकी २८ होर्डिंगचे परवाने १६ जून २०२४ रोजी रद्द करण्यात आले. मात्र, परवाने रद्द करण्यापलीकडे प्रत्यक्ष कारवाई किती झाली, हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे.

परवाने रद्द झाल्यानंतरही संबंधित होर्डिंगवर जाहिराती झळकत असल्याने महापालिकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. होर्डिंगच्या जागेच्या मालकीवरून महापालिका आणि एमएसआरडीसी यांच्यात जबाबदारीचा प्रश्न निर्माण झाल्याचे वृत्त आहे. कारवाईचा खर्च कोण करणार, यावर चर्चा सुरू असल्याचेही सांगितले जाते. मात्र, नागरिकांच्या सुरक्षिततेपेक्षा खर्चाची जबाबदारी महत्त्वाची ठरणार का? संबंधित यंत्रणांनी समन्वय साधून कारवाई करण्याऐवजी एकमेकांकडे बोट दाखवत राहायचे का, असा सवाल उपस्थित होत आहे.

महापालिकेचा अतिक्रमण विभाग हातगाड्या, टपऱ्या आणि फेरीवाल्यांवर कारवाई करत असताना मोठ्या होर्डिंगचा प्रश्न प्रलंबित राहणे ही बाब गंभीर आहे. महामार्गालगतच्या जाहिरात फलकांची सुरक्षितता तपासणे, आवश्यक परवानग्यांची पडताळणी करणे आणि नियमबाह्य होर्डिंगवर नियमानुसार कारवाई करणे गरजेचे आहे. महापालिका आणि एमएसआरडीसीने जबाबदारी निश्चित करून बेकायदा होर्डिंगबाबत तातडीने भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी होत आहे.

भावशेत ठाकूरवाडीत वनराई बंधाऱ्याचे लोकार्पण



। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।

भावशेत ठाकूरवाडीत पाणी टंचाईवर मात करण्यासाठी आणि भूजल पातळी वाढवण्यासाठी भावशेत ठाकूरवाडी ग्रामस्थांनी लोकसहभागातून साकारलेला वनराई बंधारा हा आजच्या काळाची गरज ओळखून घेतलेला कौतुकास्पद आहे.

ग्रामस्थांनी श्रमदानातून आणि एकजुटीने हा बंधारा तसेच या ग्रामपंचायतीमधील इतर बंधारे ही पूर्ण केले आहेत. या बंधाऱ्यामुळे परिसरातील शेतीला पाणी मिळणार असून पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही सुटण्यास मदत होणार आहे.

आजच्या बदलत्या हवामानाच्या काळात अशा छोट्या-छोट्या जलसंधारणाच्या कामांची अत्यंत आवश्यकता असून भावशेत ठाकूरवाडी गावाने इतर गावांसमोर आदर्श निर्माण केल्याचे यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी सांगितले.

बंधाऱ्याच्या पाहणी व लोकार्पण कार्यक्रमासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पवनकुमार नजन कृषी विकास अधिकारी, लता मोहिते गट विकास अधिकारी पंचायत समिती सुधागड-पाली, अशोक महामुनी कृषी अधिकारी संजय शेलवाड विस्तार अधिकारी ग्रामपंचायत, मिलिंद देवकर विस्तार अधिकारी कृषी, विकास शिंदे विस्तार अधिकारी, अस्मिता बैकर, ग्रामपंचायत अधिकारी बबन टावरी, ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी, तसेच ठाकूरवाडी ग्रामस्थ व महिला बचत गटाच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



शिवप्रतिष्ठानकडून तहसील कार्यालयाबाहेर निदर्शने

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील सह्याद्रीच्या खोऱ्यात सुरू असलेली जंगलतोड याविरुद्ध शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान आक्रमक झाले आहेत. या प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांच्या मावळे बनून कर्जत तहसील कार्यालयाबाहेर जोरदार निदर्शने केली.

भिमाशंकर जंगलतोड प्रकरणात शिवप्रतिष्ठानकडून सह्याद्री वाचवा आणि भीमाशंकर अभयारण्य वाचवा असा नारा देण्यात आला आहे. या प्रतिष्ठानकडून कर्जत शहरात भगवे ध्वज घेऊन रॅली काढून सुरू असलेल्या जंगलतोड याचा निषेध करण्यात आला. त्यानंतर कर्जत तहसील कार्यालयात जाऊन आक्रमक भूमिका घेत जंगल वाचले पाहिजे अशी एकमुखी मागणी केली. त्यावेळी जे सरकार सह्याद्री अन् शिवछत्रपतींच्या तत्वांच्या विरोधात उभं आहे त्या सरकारच्या विरोधात उतरून निदर्शने केली.

गाढी नदीपात्रात कोंबड्यांचा खच

। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।

पनवेल तालुक्यातील शिवणसई येथील गाढी नदीपात्रात बॉयलर कोंबड्यांची घाण, पिसे, गोवंशाचे अवशेष आणि अन्य कचरा टाकण्यात येत असल्याने नदी प्रदूषणाच्या विळख्यात सापडली आहे. नदीपात्रात मोठ्या प्रमाणात घाण साचल्याने परिसरात दुर्गंधी पसरली असून, नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या प्रकाराला जबाबदार असणाऱ्यांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी शिवसेनेच्या (शिंदे गट) पदाधिकाऱ्यांनी पोलीस आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे पत्राद्वारे केली आहे.

२१ ऑक्टोबर रोजी शिवणसई येथील गाढी नदीच्या पुलाखाली तसेच नदीपात्रात मोठ्या प्रमाणात कोंबड्यांची घाण, पिसे आणि गोवंशाचे अवशेष टाकल्याचे आढळून आले. या नदीच्या पाण्याचा वापर स्थानिक नागरिक कपडे धुण्यासाठी करतात.

लहान मुले येथे आंघोळीसाठी येतात. परिसरातील मच्छिमारही नदीत मासेमारी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. मात्र, नदीपात्रात टाकण्यात येणाऱ्या घाणीमुळे या सर्वांच्या अडचणी वाढल्या आहेत.

नदीच्या पाण्यात घाण मिसळल्याने पाणी दूषित झाले असून, परिसरात असह्य दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे रोगराई पसरण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. तसेच नदीतील मासे मृत होत असल्याचा आणि मासेमारीची जाळी खराब होत असल्याचा दावा स्थानिकांकडून करण्यात येत आहे. परिणामी, मच्छिमारांच्या रोजगारावरही संकट निर्माण झाले आहे.

रात्रीच्या वेळी बेकायदा कत्तलखाने आणि बॉयलर कोंबड्यांचे विक्रेते नदीपात्रात हा कचरा टाकत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी या प्रकाराची गांभीर्याने दखल घेऊन घटनास्थळी पाहणी करावी, पंचनामा करावा आणि नदीपात्राची तातडीने स्वच्छता करून निर्जंतुकीकरण करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

नदीपात्रात कचरा टाकणाऱ्यांना आळा घालण्यासाठी रात्रीच्या वेळी पोलिसांची गस्त वाढवावी आणि दोषींवर कठोर कारवाईची मागणी विश्वास पाटील, दिनेश मांडवकर, विद्याधर चोरघे यांनी केली आहे.



- नदी प्रदूषणामुळे नागरिक त्रस्त;
- प्रदूषण करणाऱ्यांवर कारवाईची मागणी

परिसरात दुर्गंधी

नदीपात्रात घाण साचली असून परिसरात दुर्गंधी पसरली आहे. नागरिक तसेच लहान मुले येथे आंघोळीसाठी येत आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

श्रीवर्धन तालुक्यातील नदीपात्रे कोरडी

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

श्रीवर्धन तालुक्यात चिखलप येथून एक बारमाही वाहणारी नदी आहे. या नदीचा उगम श्रीवर्धन म्हसळा मार्गावरील एका डोंगरावरून सुरू होतो. त्यानंतर ही नदी वडघर, गुळधे, बापवली, मामवली, मेघरे, भरडोली, चिखलप व वाळवटी या ठिकाणी जाऊन खाडीला मिळते. या बंधाऱ्यावरून एप्रिल महिन्यात देखील पाणी ओसंडून वाहताना पाहायला मिळायचे. आता ऑक्टोबर महिना संपून नोव्हेंबर महिना सुरू होणार असून या बंधाऱ्यावरून केवळ चार फूट परिसरातून पाणी खाली वाहत आहे.



एकेकाळी चिखलप गावाच्या बाजूचा परिसर पाणथळ जमिनीसाठी प्रसिद्ध होता. या ठिकाणी उन्हाळी भात शेती होतत होती. परंतु शेजारीच असलेल्या वाळवटी गावाची लोकसंख्या वाढू लागल्यानंतर त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाल्यानंतर चिखलप येथे पंपाद्वारे पाणी नेऊन चिखलप गावाची पाणथळ ही ओळख कायमची पुसून गेली आहे.

दुर्गम भागातील विद्यार्थी येणार मुख्य प्रवाहात

। कर्जत । प्रतिनिधी ।

फातिमा ८६ नोबेल ट्रस्ट, ठाणे यांच्या वतीने आणि माजी नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांच्या विशेष प्रयत्नाने जिल्हा परिषदेच्या सागाची वाडी आणि चोचीची वाडी शाळेमध्ये ई-लर्निंगसाठी ४२ इंची स्मार्ट टीव्ही सेट भेट दिला. अती दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि तांत्रिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी फातिमा ८६ नोबेल ट्रस्ट, ठाणे यांनी जिल्हा परिषद शाळा सागाची वाडी आणि चोचीची वाडी शाळेला स्मार्ट टीव्ही सेट कर्जतच्या माजी नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांच्या हस्ते शाळेतील शिक्षक आणि विध्यार्थ्यांना प्रदान करण्यात आला. तसेच पौष्टिक खाऊ वाटप करण्यात आले.



याप्रसंगी सुदेश जाधव, संजीव पाटील, प्रशांत परदेशी, शिल्पी परदेशी, राजेश सिन्हा, अर्णव परदेशी, मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका वाडीले, विनोद नारागुडे, प्रशांत कराळे, सुनील पिल्लई, नाना ढाकवळ उपस्थित होते.

योग-निसर्गोपचार राष्ट्रीय परिसंवाद

। पनवेल । प्रतिनिधी ।

व्यसनमुक्त भारत आणि निरोगी समाजाच्या निर्मितीसह युवकांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता वाढविण्याच्या उद्देशाने खारघर येथे आयोजित योग-निसर्गोपचार राष्ट्रीय परिसंवाद उत्साहात संपन्न झाला. डॉ. जी. डी. पोल फाऊंडेशन येथील परिसंवादात वैद्यकीय व्यावसायिक, संशोधक आणि योग-निसर्गोपचार क्षेत्रातील तज्ज्ञ सहभागी झाले होते. पारंपरिक ज्ञान, संवादकौशल्य आणि वेळेचे व्यवस्थापन यांवरही विचारमंथन झाले. खारघरमधील सेंट्रल पार्क येथे सामूहिक योगाभ्यास आणि संकीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी डॉ. संदीप सिंग, येरला आयुर्वेदिक महाविद्यालयाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

व्यावसायिकांकडे पॅकिंगच्या कामाची लगबग सुरू | **स्वागतापासून कंपन्यांच्या भेटवस्तूंपर्यंत मागणी**

धावपळीच्या जीवनात रेडिमेड फराळाला पसंती

। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।

दिवाळी म्हटली की, घराघरांतून दरवळणारा चकली, चिवडा, लाडू, करंजी आणि शंकरपाळ्यांचा सुगंध डोळ्यांसमोर येतो. मात्र, बदलती जीवनशैली, नोकरी-व्यवसायाची धावपळ आणि घरातील वाढत्या जबाबदाऱ्यांमुळे दिवाळीचा फराळ घरी बनवण्यासाठी महिलांना पुरेसा वेळ मिळत नाही. त्यामुळे आता अनेक कुटुंबांकडून रेडिमेड फराळाला पसंती दिली जात आहे. पनवेल आणि खांदा कॉलनी परिसरात दिवाळीच्या पार्श्वभूमीवर फराळाच्या ऑर्डर आणि पॅकिंगच्या कामाला वेग आला आहे.



पूर्वी दिवाळीच्या काही दिवस आधी घराघरांत फराळ बनवण्याची लगबग सुरू होत असे. महिलांचे एकत्र येऊन चकल्या पाडणे, करंज्या भरणे, लाडू वळणे आणि चिवडा तयार करणे, हा दिवाळीच्या तयारीतील महत्त्वाचा भाग होता. मात्र, आज अनेक महिला नोकरी, व्यवसाय आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळत असल्याने पारंपरिक पद्धतीने सर्व पदार्थ घरी बनवणे शक्य होत नाही. त्यामुळे तयार फराळ खरेदी करणे हा अनेक कुटुंबांसाठी सोयीचा पर्याय बनला आहे.

यंदा जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या खर्चामुळे सर्वसामान्य कुटुंबांचे आर्थिक नियोजन कोलमडत आहे. अशा परिस्थितीत दिवाळीचा सण आनंदात साजरा करताना खर्चाचा ताळमेळ साधण्याचे आव्हान कुटुंबांसमोर आहे. फराळासाठी लागणारे तेल, तूप, साखर, बेसन, मैदा, रवा आणि इतर साहित्य खरेदी करण्यापासून ते फराळ बनवण्यासाठी लागणाऱ्या वेळेपर्यंत अनेक गोष्टींचा विचार करावा लागतो. त्यामुळे घरगुती फराळ बनवण्याऐवजी गरजेनुसार रेडिमेड फराळ मागवण्याकडे ग्राहकांचा कल वाढत आहे.

दिवाळीत नातेवाईक, मित्रमंडळी आणि शेजाऱ्यांची घरी ये-जा सुरू असते. पाहुण्यांना चहा-पाण्यासोबत फराळ देण्याची परंपरा आजही कायम आहे. मात्र, प्रत्येक पदार्थ घरी बनवणे शक्य नसल्याने अनेक कुटुंबे चकली, चिवडा, लाडू, करंजी आणि शंकरपाळ्यांचे तयार पॅक मागवत आहेत. आपल्या बजेटनुसार फराळाचे पॅक निवडून पाहुण्यांचे स्वागत करण्यावर भर दिला जात आहे.

दिवाळीच्यानिमित्ताने कर्मचाऱ्यांना भेटवस्तू देण्याची परंपरा अनेक कंपन्यांमध्ये आहे. मिठाईसोबत किंवा मिठाईऐवजी फराळाचे आकर्षक पॅक देण्याचा पर्याय काही कंपन्यांकडून निवडला जातो. कर्मचाऱ्यांना घरगुती चवीचा फराळ भेट म्हणून देता यावा, यासाठी एकाच वेळी मोठ्या प्रमाणात ऑर्डर दिल्या जातात. त्यामुळे फराळ तयार करणाऱ्या व्यावसायिकांकडे पॅकिंगच्या कामाची लगबग सुरू झाली आहे. काही ग्राहक मर्यादित प्रमाणात फराळ खरेदी करत आहेत, तर काही जण पाहुण्यांची संख्या आणि बजेट लक्षात घेऊन मोठ्या पॅकना पसंती देत आहेत. एकीकडे महागाईचे आव्हान, तर दुसरीकडे धावपळीचे जीवन अशा परिस्थितीत रेडिमेड फराळाने अनेक कुटुंबांना दिलासा दिला आहे.

दरवाढीमुळे ग्राहकांना अतिरिक्त खर्च

यंदा रेडिमेड फराळाच्या दरात सुमारे १५ टक्क्यांनी वाढ झाल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे ग्राहकांना फराळ खरेदीसाठी अधिक पैसे मोजावे लागू शकतात. तरीही वेळेची बचत, पदार्थांची विविधता आणि तयार पॅकची सोय यामुळे रेडिमेड फराळाची मागणी कायम आहे.



राशीभविष्य

- **मेष** : अपेक्षित ध्येय गाठू शकाल. पित्तविकाराचा त्रास संभवतो.शैक्षणिक क्षेत्रात प्रगतीच्या संधी लाभतील.
- **वृषभ** : शुभ फलदायी कालावधी आहे. विवाहनिश्चिती सुकर ठरेल. गुंतवणुकीतून अपेक्षित लाभ होईल.
- **मिथुन** : नोकरीत भाग्योदयाचे योग आहेत. खर्चाचं प्रमाण वाढतं राहील. जुनी दुखणी पुन्हा उद्भवतील.
- **कर्क** : सुवार्ता कानी येईल. नोकरीविषयक मुलाखतीत यश मिळेल. रखडलेली सरकारी काम पूर्ण होतील.
- **सिंह** : महत्त्वाच्या घटनांनी समाधान लाभेल. व्यावसायिक प्राप्ती वाढत जाईल. हातून धार्मिक कार्य घडेल.
- **कन्या** : व्यावसायिक करार लाभदायक ठरतील. सहकुटुंब प्रवासाचे योग आहेत. विद्यार्थ्यांना यश लाभेल.
- **तूळ** : मोठ्या आर्थिक व्यवहारात लाभ होईल. महत्त्वाच्या भेटीगाठी समाधान देतील. बाकी चिंता नसावी.
- **वृश्चिक** : नोकरीत बदली-बढतीच्या हालचाली होतील. व्यवसायात अडचणी संभवतात. विचारानं रहावं.
- **धनु** : नोकरीत वरिष्ठांची मर्जी राहील. जोडीदाराचं उत्तम सहकार्य राहील. वाढत्या खर्चावर नियंत्रण ठेवावं.
- **मकर** : गुंतवणुकीबाबत सावध रहावं. व्यावसायिक प्राप्ती वाढेल. जुगारसदृश्य व्यवहार टाळायला हवेत.
- **कुंभ** : विवाहाचे प्रयत्न यशस्वी होतील. वास्तुविषयक गुंतवणूक फायदेशीर ठरेल. थोरांचा सहवास लाभेल.
- **मीन** : व्यवसायात तेजी राहील. आर्थिक अडचणीतून मार्ग निघेल. धार्मिक स्थळांची यात्रा समाधान देईल.

स्टाईल स्टेटमेंट

ट्राय करा इंडोवेस्टर्न लूक

सणसमारंभ, लग्नसराईदरम्यान पारंपरिक पेहराव केला जातो. मात्र आपण चारचौघींमध्ये उठून दिसावं, असं प्रत्येकीलाच वाटतं. म्हणूनच पेहरावातली पारंपरिकता जपताना तुमच्या लूकला थोडा आधुनिक टचही देता येईल.

* क्रॉप टॉप आणि पलाझो हे कॉम्बिनेशन करता येईल. सडपातळ महिला हा पेहराव कॅरी करू शकतात. ट्रॅडिशनल लूकवाला क्रॉप टॉप घ्या. या पेहरावासोबत तुम्ही छानसा श्रग कॅरी करू शकता. पूर्ण बाह्यांच्या क्रॉप टॉपवर स्लीव्हलेस श्रग घाला आणि स्लीव्हलेस क्रॉप टॉपवर पूर्ण बाह्यांचा श्रग कॅरी करा.
* इंडो वेस्टर्न लूकसाठी जंप सूट हा सर्वोत्तम पर्याय आहे. जंप सूटवर ऑक्सिडाइज ज्वेलरी कॅरी करता येईल. तसंच केस मोकळे सोडून लूक खुलवता येईल.
* धोती पँट आणि क्रॉप टॉप हे कॉम्बिनेशनही हिट ठरतं.
* मॅक्सी ड्रेस हा प्रकारही इन आहे. मॅक्सी ड्रेस विविध प्रसंगी कॅरी करता येतात. लग्नप्रसंगी पारंपरिक लूक देणारा मॅक्सी ड्रेस घालता येईल.

३० ऑक्टोबर — दिन विशेष

१९०९ : प्रसिद्ध अणुवैज्ञानिक आणि भौतिकशास्त्रज्ञ डॉ. होमी जहांगीर भाभा यांचा जन्मदिवस.
१९७४ : विख्यात गझल गायिका बेगम अख्तर यांचे निधन. त्यांना 'मलिका-ए-गझल' ही उपाधी देण्यात आली होती.
१९९५ : कै. शांताबाई हुबळीकर यांच्या नावे देण्यात येणारा पुरस्कार ज्येष्ठ कलाकार मास्टर भगवान यांना जाहीर.
२०१५ : सचिन तेंडुलकर कारकिर्दीतील शेवटचा रणजी सामना खेळला.

जाणून घ्या

आयपी ॲड्रेस म्हणजे काय?

छोट्या दोस्तांनो, तुम्ही आयपी ॲड्रेस हा शब्द ऐकला असेल. आयपी ॲड्रेस म्हणजे इंटरनेट प्रोटोकॉल ॲड्रेस. कॉम्प्युटर नेटवर्कशी जोडल्या गेलेल्या प्रत्येक उपकरणाला काही आकडे दिले जातात. हे आकडे म्हणजे त्या उपकरणाचा आयपी ॲड्रेस. प्रत्येक उपकरणाचा आयपी ॲड्रेस वेगळा असतो. त्यामुळे इंटरेटशी जोडलं गेलेल्या प्रत्येक उपकरणाची ओळख पटवणं सोपं जातं. तुमच्या घरच्या वायफायशी कॉम्प्युटर, मोबाईल फोन, लॅपटॉप जोडलेला असतो. या प्रत्येक उपकरणाचा आयपी ॲड्रेस वेगळा असतो.

आयपी ॲड्रेस दोन प्रकारचे असतात. आयपीव्ही ४ आणि आयपीव्ही ६. समजा तुम्ही फिरायला जाणार आहात. सोबत तुम्ही तुमचा लॅपटॉप घेतला आहे. अशा वेळी तुमच्या घरचा आयपी ॲड्रेस लॅपटॉपमध्ये दिसणार नाही. कारण बाहेर गेल्यावर तुम्ही दुसरं इंटरनेट किंवा वायफाय कनेक्शन वापरणार आहात. त्यामुळे तुम्हाला तात्पुरता आयपी ॲड्रेस मिळेल. ते ठिकाण सोडून दुसऱ्या ठिकाणी गेल्यावर पुन्हा नवा आयपी ॲड्रेस दिला जाईल. तर मंडळी, आयपी ॲड्रेसची ही अशी गंमत आहे.

आरोग्यमंत्र

मानसिकता म्हणजे काय ?

मानसिक आजारांबद्दल समाजामध्ये अनेक चुकीच्या आणि वाईट समजुती आहेत. जसं पोटात दुखतं, हात पाय दुखतात तसंच मनाचंही दुखणं असू शकतं. पण शारीरिक दुखणं हे दिसतं, पटकन लक्षात येतं, पण मानसिक आजार दिसतही नाहीत आणि पटकन लक्षातही येत नाहीत. मानसिक आजार म्हणजे फक्त वेड लागणं असा एक गैरसमज समाजात आहे आणि वेड लागलं म्हणजे वेड्यांच्या दवाखान्यात दाखल करण्याशिवाय दुसरा काही उपाय नाही असा भलताच समज आढळतो. पण मानसिक आरोग्य म्हणजे आयुष्यात येणाऱ्या बऱ्या-वाईट अनुभवांना खंबीरपणे सामोरं जाणं, कुटुंबातल्या आणि समाजातल्या इतर लोकांशी चांगलं नातं असणं असा अर्थ आहे.

मानसिक आरोग्य चांगलं असण्याची लक्षणं : त्या माणसाचं मन शांत असतं, इतरांबरोबर जुळवून घेता येतं, कोणी नावे ठेवली, कोणी उणीदुणी काढली तरीही दुखावलं न जाणं, आपल्या प्रश्नांना आपणच उत्तर शोधणं, आपल्याला आयुष्यात काय करायचं आहे ते ठरवणं, मनावर ताबा असणं, जीवनातले ताण-तणाव, काळजी सहन करण्याची क्षमता असणं.

मानसिक आरोग्य चांगलं राहण्यासाठी : योग्य, पुरेसा आणि वेळेत संतुलित आहार घेणं, स्वतःची आणि परिसराची स्वच्छता ठेवणं, चांगल्या सवयी लावून घेणं, धूम्रपान-मद्यपान न करणं, नियमित व्यायाम करणं, ताणताणाव व काळजी कमी करणं.

पंचांग

शुक्रवार, ३० ऑक्टोबर २०२६
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
अश्विन कृ. ५, चंद्रराशी : मिथुन,
नक्षत्र : मृगशीर्ष, योग : शिव,
सूर्योदय ६.४०, सूर्यास्त ६.०४

फॉरवर्ड्स

अपनीं ताक़त पर लोग़ इतना क्यों इतराते हैं...

दरवाज़े उनकें भीं टूटते हैं ज़ो ताले बनातें हैं...!

ग्रूमिंग

दोस्तांनो, आपली हेअरस्टाईल चांगली दिसावी असं तुम्हाला वाटत असेल. मात्र यासाठी केसांची काळजी घ्यायला हवी. केसांची चमक टिकून रहावी, यासाठी काय करता येईल याविषयी...

* बरीच मुलं रोज केस धुतात. काही मुलं केसांना साबण लावतात. पण असं केल्याने केसांमधलं नैसर्गिक तेल नष्ट होतं. केसांच्या मुळाशी असलेल्या तेलामुळे केसांमधला ओलावा टिकून रहातो. दररोज केस धुतल्याने हे तेल नष्ट होतं आणि केस कोरडे होतात. त्यामुळे आठवड्यातून तीन वेळा केस धुवा.

(क्रमशः)

करिअरवाटा

हमखास यशाचा मार्ग

स्पर्धा परीक्षांची तयारी हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातला प्रचंड तणावाचा काळ असतो. त्यामुळे या काळातील तणाव कमी करण्यासाठी प्रयत्न होण्याची गरज आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी काही पथ्यं पाळली पाहिजेत. पहिली गोष्ट म्हणजे आपल्यावर फार मोठा तणाव नाही, हे मनाला समजावलं पाहिजे. काही विद्यार्थ्यांना गरज नसताना तणाव ओढवून घेण्याची सवय असते.



मात्र, आता कारकिर्दीचे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. त्यामुळे थोडे कमी-जास्त मार्क मिळाले, म्हणून सगळं गमावलं असं होत नाही. अर्थात तयारी मनापासून करायला हवी. पण, फार तणावाखाली राहण्याची आवश्यकता नाही. बऱ्याच वेळा अशा परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांना मित्रमैत्रिणींच्या अभ्यासाशी आपल्या अभ्यासाची तुलना करण्याची सवय असते. तेव्हा अशी तुलना न करता आपण आपल्या पध्दतीने अभ्यास केला पाहिजे. आपण तणावमुक्त मनस्थितीत अभ्यास करू, तेवढा तो चांगला होतो. तेव्हा विनाकारण ओढवून घेतलेला तणाव सोडून दिला पाहिजे आणि तणावमुक्त अवस्थेत तसंच ताज्यातवान्या मनानं अभ्यास केला पाहिजे. तसं झाल्यास कोणत्याही परीक्षेत यश मिळवणं शक्य होईल.

खेचाखेची

चष्मा

डॉक्टर : चष्मा कोणासाठी बनवायचा?

बबलू : माझ्या शिक्षकांसाठी.

डॉक्टर : पण का?

.
.
.
.

बबलू : कारण ते माझ्याकडे बघून मला गाढव म्हणतात !

वेगळं काही

राजस्थानमधल्या बिकानेरमध्ये रहाणाऱ्या मेघा हर्षने जगातलं सर्वात मोठं चित्र काढलं होतं. मेघाने बिकानेर बॉईज स्कूलच्या प्रांगणात हे चित्र काढलं होतं. हे चित्र ७० फूट लांब आणि ७० फूट रुंद होतं. हे चित्र काढण्यासाठी मेघाला १७ दिवस लागले. जगातलं सर्वात मोठं चित्र काढण्याचा विक्रम सायप्रस इथल्या ॲलेक्सच्या नावे होता. हा विक्रम मोडण्यासाठी मेघाने पुढाकार घेतला आणि कामाला सुरूवात केली. त्यांनी ५९ फूट लांब आणि ५९ फूट रुंद चित्र साकारलं होतं. पण मेघाने एक पाऊल पुढे टाकलं. शाश्वत विकास या संकल्पनेवर आधारित हे चित्र आहे. हे चित्र काढून आपण आधीचा विक्रम मोडण्याचा प्रयत्न केल्याचं मेघाचं म्हणणं आहे.

स्मार्ट शॉपिंग

फर्निचर खरेदी करताना ...

आगामी उत्सवपर्वासाठी फर्निचर घ्यायचं ठरलं असेल आणि त्यातही ऑनलाईन शॉपिंग करणार असाल, तर काही गोष्टी लक्षात घ्या...

* सोफा किंवा बेड घ्यायचा असेल आणि शॉपिंग साईटवरची वस्तू आवडली असेल, तर सर्वात आधी घरातल्या जागेचं मोजमाप करा. फर्निचर वेगवेगळ्या आकारामध्ये उपलब्ध असतं. त्यामुळे आधी आकाराबद्दलची माहिती नीट वाचून घ्या. ते फर्निचर तुमच्या घरात नीट बसायला हवं. ऑनलाईन खरेदी करायचं निश्चित झाल्यावर नियम आणि अटी जाणून घ्या. * फर्निचरची निवड केल्यानंतर त्याबद्दलची माहिती नीट वाचून घ्या. संबंधित उत्पादनाचा रंग, मटेरियल, मेटेंनन्स याबद्दलची सगळी माहिती वाचून घ्यायला हवी. * वजनदार फर्निचर ग्राहकाच्या घरापर्यंत पोहोचवण्यासाठी येणारा खर्च दुकानदार ग्राहकांकडूनच वसूल करतात. हा खर्च किती आहे याची माहिती करून घ्या. दुकानदार अव्वाच्या सव्वा शुल्क आकारात असतील तर खरेदीबाबत विचार करा. * रिटर्न पॉलिसी जाणून घ्या.



सुडोकू १६७

६	३	४	५					
				६		५		
	१		९		८		७	
		६	१		२			७
५	७			९			१	८
१			३		५	४		
	५		८		३		६	
		२		५				
						७	३	५

टीप -

* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

सुडोकू १६६ चे उत्तर

८	३	७	९	५	१	२	४	६
१	६	४	७	८	२	३	९	५
९	५	२	४	६	३	१	८	७
५	१	६	८	९	७	४	२	३
४	७	३	२	१	५	९	६	८
२	८	९	६	३	४	५	७	१
७	९	५	३	४	६	८	१	२
६	४	१	५	२	८	७	३	९
३	२	८	१	७	९	६	५	४

शब्दकोडे क्रमांक १६७

१	२	३		४	५	६	■	७	८	■	९	■	१०	११
१२			■	१३				■	१४			१५		
	■	१६			■		■	१७		■	१८		■	
१९	२०		■	२१	२२		२३		■			■		
२६		■	२७	■		■		■	२८			२९		■
३०		३१		३२	■	३३				■	३४		■	३५
	■		■	३६	३७			■	३८		■	३९	४०	
४१	४२		४३	■		■	■	४४		■	४५			
४६		■	४७			■	४८		■	४९		■		■
■	५०	५१		■	५२	५३			५४	■	५५			
५६			■	५७	■	५८		■	५९	६०		■	■	६१
	■	६२	६३		६४	■	६५	६६	■		■	६७		
६८	६९	■	७०			७१	■	७२			७३		■	
७४				■	७५		७६		■	■		■	७७	
७८		■	७९		■	८०		■	८१					■

आडवे शब्द :-

१) संगीतातील एक राग
७) कावळा
१०) थोडक्यात महाराष्ट्र राज्य
१२) भविष्यकथनाचा एक प्रकार
१३) एक आदर्श राज्यपद्धती
१४) बारीकसारीक
१६) उद्याच्या नंतरचा दिवस
१७) सरहद्द
१८) अहंकार
१९) मीठ
२१) एकरूपता
२४) उत्सव
२५) स्तुती करणारा
२६) भाव
२८) आरामदायी
३०) युद्धासाठी उत्सुक झालेला
३३) काम करतोय हे दाखविण्यासाठी केलेली सततची हालचाल
३४) पुरुष
३६) जादूचे प्रयोग करणारा
३८) निर्बुद्ध
३९) विजयादशमी
४१) लाकूड कापण्याचे हत्यार
४४) पर्ण
४५) कपाळभर लावलेले कुंकू
४६) मच्छर
४७) श्रीकृष्णाचे घराणे
४८) मनाचा ओढा
४९) पुष्कळ
५०) लाकडी जिना
५२) रुक्ष, कडक उन
५५) चावट
५६) सरस्वती
५८) हवा, वैताग
५९) हात पुसण्याचे वस्त्र
६२) समशेर
६५) वल्लरी
६७) हिंमत
६८) गंध
७०) हलकी धान्ये
७२) अश्रुंनी डोळे भरणे
७४) निरुपाय
७५) पोते
७७) दात
७८) वाकलेला, नम्र
७९) पाऊस
८०) मच्छर
८१) नवाकोरा

उभे शब्द :-

१) व्याज आकारणीतील द.सा.द.शे.
२) दारूचा एक प्रकार
३) बाल्यावस्था
४) तुरुंग
५) वाकण्याची क्रिया
६) गाढ (झोप)
८) कुराणातील पवित्र वचने
९) आपले राष्ट्रगीत
१०) प्रचंड
११) मध्यम प्रतीचा
१५) सगळे १७) जानकी
२०) बिना फोडणीची आमटी
२२) नंतर
२३) बातमी
२४) सरळ लांब वासा
२५) वजन, बोजा
२७) प्रामाणिक
२८) पूजेच्या वेळी ओंजळीतील पाणी प्राशन करणे
२९) एकत्रित धमन्या
३१) पायविहीर
३२) भूपती
३३) आसाममधील एक जमात
३५) प्रचंड
३७) खूप लांब अंतरावर
४०) सूट
४२) टोळीचा प्रमुख
४३) सिद्ध
४४) मेणा
४५) माजलेला
४८) हाताचा तळवा
५१) उणीव
५३) मावा
५४) वृक्ष
५६) हिंदुंची एक वर्षगणना पद्धत
५७) बाज विणण्याची सुती पट्टी
६०) मुंबईतील एक उपनगर
६१) मध
६३) बडबड चुरुचुरू
६४) गावाखालची जमीन
६६) मारणे, चोपणे
६७) कोथिंबीरीचे बी
६९) सदा
७१) रंग बदलणारा प्राणी
७३) अंड्यातील पिवळा भाग
७६) सेवक
७७) निमग्न, रममाण

(उत्तर उद्याच्या अंकात)

मागील शब्दकोड्याचे उत्तर

व	ड्या	चे	ते	ल	वां	ग्या	व	र	का	ढ	णे	■	अ	जा
सं	■	ता	ल	■	झो	■	स्ती	■	न	ग	■	क	व	■
त	ला	व	■	पा	टी	ल	■	चा	फ	ळ	■	प	सा	रा
■	जा	णी	व	■	■	वा	स	क	ट	■	सु	■	न	खी
अ	हो	■	र	■	वा	द	ळ	■	■	म	ट	का	■	व
वा	म	ना	व	ता	र	■	स	मा	धा	न	का	र	क	■
स्त	■	व	र	■	स	का	ळ	■	म	न	■	खा	र	ट
व	ऱ्हा	ड	■	क	■	या	■	स	ण	■	रा	न	■	प
■	स	ती	चा	ला	ल	■	का	ळ	■	आ	म	दा	र	■
ख	■	चे	■	का	व	का	व	■	ना	व	■	र	म	णी
स	ला	मी	वी	र	■	म	■	क	ट	क	ट	■	त	■
■	मा	ठ	■	■	उ	ना	ड	■	■	जा	■	सा	ग	र
वा	■	अ	ने	क	दा	■	■	उ	प	व	न	■	म	त
स	र	ळ	■	वि	र	ज	ण	■	र	क	म	पा	त	■
र	म	णी	य	ता	■	थ्था	■	ना	डी	■	न	र	■	गो

निवडक

बेंचप्रेस स्पर्धा पनवेलमध्ये होणार

पनवेल : पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगड यांनी सब- ज्युनिअर, ज्युनिअर सीनियर, मास्टर्स, तसेच अंध, दिव्यांग व गतिमंद खेळाडूंची जिल्हास्तरीय बेंचप्रेस स्पर्धा ०१ नोव्हेंबर रोजी आयोजित केली आहे. स्पर्धेच्या प्रवेशिका ऑनलाईन घेण्यात आलेल्या असून सदर स्पर्धा ही व्ही. के.हायस्कूल, पनवेल शहर येथे समस्त पाटकर कुटुंबियांच्या सौजन्याने होणार आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना कै.दीपक पाटकर स्मरणार्थ पदक आणि चषक देण्यात येतील.या स्पर्धेसाठी स्पर्धकांची वजनाची वेळ- सकाळी ८.१५ते ९.१५ वाजतानाची आहे. याबाबतचे परिपत्रक संबंधितांना पाठविण्यात आलेले आहे. स्पर्धेच्या दिवशी कोणाची ही प्रवेशिका घेतली जाणार नाही. या स्पर्धेला अनेक मान्यवरांना निमंत्रित करण्यात आलेले आहे. या स्पर्धेचे स्पर्धा प्रमुख म्हणून सुभाष दगडू टेंबे आणि संदीप कृष्णा पाटकर यांच्याकडे जबाबदारी आहे. स्पर्धा व्यवस्थापन कार्याध्यक्ष यशवंत अंबाजी मोकल यांच्याकडे आहे. असे पत्रकाद्वारे सहसचिव सचिन विठ्ठल भालेराव यांनी कळविलेले आहे.

राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा प्रभादेवीत

मुंबई : यंग भारत सेवा मंडळाच्या विद्यमाने २३ ते २७ नोव्हे. या कालावधीत आपल्या हिरक महोत्सवी वर्षानिमित्त कुमार गट राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. प्रभादेवी येथील स्व.राजाभाऊ साळवी क्रीडागरीतील स्व. भिकाजी गुणाजी भारती मातीच्या एका क्रीडांगणावर त्या खेळविण्यात येतील. मुंबईत या हंगामात होणारी ही पहिली राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा आहे. या स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील १२ निमंत्रित संघाना सहभाग दिला जाईल. या निमित्ताने उदयोन्मुख खेळाडूंना आपले कौशल्य दाखविण्याची संधी उपलब्ध होणार आहे. त्याच बरोबर प्रभादेवीकराना या खेळाडूचा रंगतदार खेळ पहाण्याची संधी मिळणार आहे, अशी माहिती एका पत्रकाद्वारे मंडळाचे सचिव शंकर पाटकर यांनी दिली.

डेरवणच्या १३ खेळाडूंची राष्ट्रीय ॲथलेटिक्समध्ये निवड



डेरवण : रत्नागिरी जिल्हा राष्ट्रीय ॲथलेटिक्स असोसिएशनच्या वतीने आयोजित राष्ट्रीय निवड चाचणी स्पर्धेत जिल्ह्यातील १७२ खेळाडूंनी सहभाग नोंदविला. एसव्हीजेसीटी क्रीडा प्रबोधिनी, डेरवण येथे झालेल्या या स्पर्धेत उत्कृष्ट काम गिरी करणाऱ्या १३ खेळाडूंची हैदराबाद (तेलंगणा) येथे १४ ते १६ नोव्हेंबरदरम्यान होणाऱ्या स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे जिल्ह्यातील युवा खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावर आपले कौशल्य दाखविण्याची संधी मिळणार आहे. या स्पर्धेचे आयोजन रत्नागिरी जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनचे अध्यक्ष बाळासाहेब कदम आणि उपाध्यक्ष औकांत पराडकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. नवोदित खेळाडूंच्या सिद्धतेसाठी व्यासपीठखेलो इंडिया चे प्रशिक्षक अविनाश पवार यांनी स्पर्धे तील खेळाडूंच्या कामगिरीचे मूल्यमापन करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी १३ उत्कृष्ट खेळाडूंची निवड केली. स्पर्धेतील विविध क्रीडा प्रकारांमध्ये प्रथम तीन क्रमांक मिळविणाऱ्या खेळाडूंना पदके व प्रमाणपत्रे देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सैफन चरके, अविनाश पवार, शिवा माळी आणि संघटनेचे सचिव संदीप तावडे यांनी विशेष परिश्रम घेतले. डेरवण येथे झालेल्या या स्पर्धेमुळे जिल्ह्यातील नवोदित खेळाडूंना आपली क्षमता सिद्ध करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध झाले. राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंना हैदराबाद येथे रत्नागिरी जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे.

महिला इमर्जिंग नेशन्स ट्रॉफीला १२ नोव्हेंबरपासून प्रारंभ



मुंबई : महिला इमर्जिंग नेशन्स ट्रॉफीची दुसरी आवृत्ती १२ ते २५ नोव्हेंबरदरम्यान संयुक्त अरब अमिरातीच्या अजमान येथे खेळवली जाईल. यावेळी या स्पर्धेत ८ ऐवजी १० संघ सहभागी होतील. यामध्ये ५ पूर्ण सदस्य देशांच्या संघांचाही समावेश असेल. बांगलादेश, आयर्लंड, पाकिस्तान, श्रीलंका आणि झिम्बाब्वे हे पहिल्यांदाच या स्पर्धेत सहभागी होणारे पूर्ण सदस्य देश असतील. स्पर्धेतील सामने अजमान येथील कारवान स्पोर्ट्स आणि सेवन डिस्ट्रिक्ट्स मैदानांवर खेळवले जातील. महिला क्रिकेटच्या विकासासाठी आणि उदयोन्मुख खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धेचा अधिक अनुभव देण्यासाठी या स्पर्धेचा विस्तार केला आहे. ५ पूर्ण सदस्य आणि ५ सहयोगी देशांचे संघ सहभागी होतील. स्पर्धेत १० संघांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये ५ पूर्ण सदस्य आणि ५ सहयोगी सदस्य देशांचे संघ आहेत. इव्हेंट्स आणि क्रिकेट ऑपरेशन्सचे सरव्यवस्थापक गौरव सक्सेना यांनी सांगितले की, स्पर्धेत संघांची संख्या वाढल्यामुळे उदयोन्मुख खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर वेगवेगळ्या संघांविरुद्ध खेळण्याच्या आणि आपली क्षमता सिद्ध करण्याच्या अधिक संधी मिळतील. सर्व १० संघांना प्रत्येकी ५ संघांच्या दोन गटांत विभागण्यात आले आहे. गट फेरीनंतर सुपर-६ फेरी होईल. त्यानंतर अंतिम सामना खेळवला जाईल.

वूमन्स प्रीमियर लीग स्पर्धा

मिनी ऑक्शनचा थरार

। केरळ । वृत्तसंस्था ।

डब्ल्यूपीएल अर्थात वूमन्स प्रीमियर लीग स्पर्धेच्या आगामी पाचव्या हंगामासाठीचं मिनी ऑक्शन अनेक तासांच्या थरारानंतर अखेर पार पडलं आहे. या मिनी ऑक्शनमध्ये एकूण १४६ खेळाडूंचा समावेश करण्यात आला होता. एकूण २७ रिक्त जागांसाठी १४६ खेळाडू मैदानात होते. मात्र ऑक्शनमधून ५ संघांनी आपल्या गरजेनुसार एकूण २५ खेळाडूंची निवड केली. त्यामुळे १२१ खेळांडूच्या पदरी निराशा पडली.

यूपी वॉरीयर्स टीमकडे ८ जागा रिकाम्या होत्या. तर मुंबई इंडियन्सला जास्तीत जास्त ६ खेळाडूंची गरज होती. दिल्ली कॅपिट्ल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुकडे प्रत्येकी ५-५ स्लॉट्स होते. तर गुजरात जायंट्सकडे एकूण ३ स्लॉट्स होते. यूपीने आठही स्लॉट्स भरले. मुंबई इंडियन्सने मिनी ऑक्शनमधून ६ खेळाडू घेतले. रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरुने ऑक्शनमधून ५ पैकी ४ खेळाडू घेतले. तर गुजरातने ३ स्लॉट्स भरले.

मुंबई इंडियन्सची टीम

हरमनप्रीत कौर, अमेलिया केर, अमनजोत कौर, हॅली मॅथ्यूज, नॅट सायव्हर ब्रँट, निकोला केरी, राहिला फिरदोस, सजीवन सजना, संस्कृती गुप्ता, शबनीम इस्माईल, वैष्णवी शर्मा, सानिका चाळके, अक्षिता भगत आणि श्वेता सहरावत.

आरसीबी टीम

स्मृती मंधाना, अरुंधती रेड्डी, एलिसा पेरी, जॉर्जिया वॉल, लॉरेन बेल, नाडीन डी क्लर्क, पूजा वस्त्राकर, प्रेमा रावत, प्रथ्योषा कुमार, राधा यादव, सायली सातघरे, तेजल हसबनीस, ऋचा घोष, श्रेयांका पाटील, जेस जोनासेन, वृंदा दिनेश आणि क्लो ट्रायॉन.



सर्वात महागड्या ४ महिला खेळाडू

ऑस्ट्रेलियाची कर्णधार सोफी मोलीन्युक्स ही सर्वात महागडी खेळाडू ठरली. सोफीला तिच्या बेस प्राईजपेक्षा ६० लाख रुपये जास्त मिळाले. यूपी वॉरियर्झने सोफीसाठी १ कोटी १० लाख रुपये मोजले. तर किरण नवगिरे ही एकूण दुसरी आणि सर्वात महागडी भारतीय खेळाडू ठरली. किरणसाठी दिल्ली कॅपिट्ल्सने ७५ लाख रुपयांची बोली लावून तिला आपल्या ताफ्यात घेतलं. किरणसाठी मुंबई इंडियन्सने जोरदार फाईट दिली. मात्र दिल्लीने बाजी मारली.सोफी, किरण व्यतिरिक्त जी कामालिनी आणि जेस जोनासन या दोघींनाही चांगला भाव मिळाला. गुजरात जायंट्सने जी कामालिनीला ४० लाख रुपये मोजून आपल्या टीममध्ये घेतलं. तर आरसीबीने जेस जोनासन हिच्यासाठी ४० लाख रुपये खर्च केले.

गुजरात जायंट्स टीम

बेथ मुनी, एश्ले गार्डनर, अनुष्का शर्मा, भारती फुलमाळी, जॉर्जिया वॉरहमन, हॅप्पी कुमारी, जिंतामणी कलिता, कनिका आहुजा, राजेश्वरी गायकवाड, काश्वी गौतम, रेणूका सिंह, सोफी डीव्हाईन, यास्तिका भाटीया, तनुजा कंवर, कामालिनी, समायरा राघव आणि ऑर्ला प्रेंडरगेस्ट.

मिनी ऑक्शननंतर खेळाडू कोणत्या संघात?

दिल्ली कॅपिट्ल्स टीम

जेमिमाह रॉड्रीग्स, अनाबेल सदरलँड, शफाली वर्मा, निकी प्रसाद, किरण नवगिरे, चिनेले हेन्री, दिया यादव, लॉरा वॉल्डवॉर्ड, लुसी हॅमिल्टन, ममता माडीवाला, मारीजान काप, मिन्नू मणी, श्री चरणी, नंदीनी शर्मा, किर्स्टी गॉर्डन, उमा काश्वी आणि नाजमा खान.

यूपी वॉरियर्स टीम

दीप्ती शर्मा, क्रांती गौड, हर्लीन देओल, फोबी लिचफील्ड, प्रतिका रावल, शिखा पांडे, सिमरन शेख, शिप्रा गिरी, सोफी एक्लेस्टोन, तारा नॉरीस, सोफी मोलीन्युक्स, स्नेह राणा, सुष्मा वर्मा, ग्रेस हॅरीस, कॅथरीन ब्राईस, मनाली दक्षिणी, आशा शोभना आणि सहाना पवार.

क्रिकेट ऑस्ट्रेलियाकडून परिपत्रक जाहीर



- जॉश इंग्लीशचे संघातील मार्ग खुले
- मॅथ्यू रेनशॉकडून इंग्लीशचे कौतुक

। सिडनी । वृत्तसंस्था ।

स्टीव्ह स्मिथच्या पुनरागम नासाठी डिसेंबरमध्ये न्यूझीलंडविरुद्ध घरच्या मैदानात होणाऱ्या कसोटी मालिकेपर्यंत वाट पहावी लागण्याची शक्यता आहे. त्याच्या दुखापतीचे स्कॅन करण्यात आले, त्यातून असे समोर आले की, सर्व्हाइकल फॅसेट जॉइंटला दुखापत झाली आहे. या दुखापतीमुळे अनुभवी फलंदाजाला केपटाउनमध्ये साऊथ आफ्रिकेविरुद्ध सुरू असलेल्या कसोटीतून बाहेर व्हावे लागले.

मागील आठवड्यात गेबेरहामध्ये साऊथ आफ्रिकेविरुद्ध दुसऱ्या कसोटी सामन्याच्या चौथ्या दिवशी स्टीव्ह स्मिथला मानेत दुखू लागले होते. त्याचा तो त्रास कायम राहिला. त्याची मान जास्त हालचाल केल्यास दुखत होती, त्यामुळे त्याला तिसऱ्या कसोटी सामन्यातून बाहेर व्हावे लागले, जो मंगळवारपासून सुरू झाला आहे. त्यानंतर वैद्यकीय तपासात दुखापतीचे कारण स्पष्ट झाले. तसेच ही दुखापत केव्हापर्यंत बरी होईल, तेही आता समोर आले आहे. त्यावर एमआरआय स्कॅन करण्यात आले असून ती दुखापत ङ्गसर्व्हाइकल फॅसेट जॉइंटफ संदर्भात असल्याचे समोर आले आहे. ही दुखापत आणि मानेच्या हालचालींवर आलेल्या मर्यादेमुळे तो खेळण्यासाठी फिट नाही आहे. स्टीव्हवरील उपचार व रिहॅबिलिटेशन कायम राहतील. अपेक्षा आहे की, तो न्यूझीलंडविरुद्ध आगामी स्थानिक कसोटी मालिकेसाठी पूर्णपणे फिट होत मैदानात परतेल.

जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत

भारताला २ रौप्यपदके

- काजल आणि नीलम अंतिम फेरीत पराभूत

। अस्ताना । वृत्तसंस्था ।

कझाकिस्तानच्या अस्ताना येथे सुरू असलेल्या जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या काजल ढोचक आणि नीलम सिरोही यांनी रौप्यपदके जिंकली. ७६ किलो वजनी गटाच्या अंतिम सामन्यात १८ वर्षीय काजलला युक्रेनच्या अनास्तासिया अल्पियेव्हाने ८-६ असे पराभूत केले. तर, ५० किलो वजनी गटाच्या अंतिम सामन्यात २६ वर्षीय नीलमला जपानच्या युई सुसाकीने पिनफॉलच्या आधारावर पराभूत केले.

या निकालांसह भारताने वरिष्ठ जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धे त नवा विक्रम प्रस्थापित केला. पहिल्यांदाच एकाच स्पर्धेत भारताच्या दोन महिला कुस्तीपटूंनी अंतिम फेरीपर्यंत मजल मारली. यापूर्वी २०२१ मध्ये ओस्लो येथे झालेल्या अजिंक्यपद स्पर्धेत अंशू मलिकने रौप्यपदक जिंकले होते.

७६ किलो वजनी गटाच्या अंतिम सामन्यात काजलचा सामना युक्रेनच्या अनास्तासिया अल्पियेव्हाशी झाला. पहिल्या फेरीनंतर काजल १-३ अशा पिछाडीवर होती. तिने दुसऱ्या फेरीत पुनरागमन करत स्कोअर ४-४ असा बरोबरीत आणला.

कुर्डूसमध्ये स्टोरी टेलिंग स्पर्धा

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

समूह साधन केंद्र सांबरी आयोजित इंग्रजी स्टोरी टेलिंग स्पर्धा नुकतीच कुर्डूसमधील शाळेमध्ये पार पडली. मंगळवारी (दि.२७) झालेल्या स्पर्धेत पहिली ते आठवीपर्यंतच्या २७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. केंद्रप्रमुख संजय पोईलकर यांच्या नियोजनातून आणि पुढाकारातून झालेल्या स्पर्धेला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

समूह साधन केंद्र सांबरी येथे झालेल्या स्पर्धेमध्ये इयत्ता पहिलीसाठी पोएम सिंगिंग, दुसरीसाठी चित्र पाहून नाव सांगणे, तिसरीसाठी स्पेलिंग रायटिंग, चौथीसाठी स्टोरीटेलिंग,पाचवीसाठी स्टोरी टेलिंग, सहावीसाठी निबंध लेखन, सातवीसाठी निबंध लेखन अशा पद्धतीच्या स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेसाठी सांबरी केंद्रामधील रायगड जिल्हा परिषदेच्या नऊ शाळांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत २७ स्पर्धक होते. केंद्रप्रमुख संजय पोईलकर यांनी संपूर्ण स्पर्धेचे नियोजन केले होत. कुर्डूस येथील रायगड जिल्हा परिषद शाळेमध्ये स्पर्धा घेण्यात आली.या स्पर्धेच्या निमित्ताने समूह साधन केंद्रातील आनंदवाडी शाळेचे सूर्यकांत पाटील, केंद्रातील सर्व शिक्षक, परीक्षक तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. पोएम सिंगीग स्पर्धेमध्ये आनंदवाडी शाळेतील पहिलीतील विद्यार्थीनी आरोही पाटील हिने प्रथम व कोंझरवाडी शाळेतील श्रावणी नाईक हिने द्वितीय आणि कुर्डूस शाळेतील नील पिंगळे याने तृतीय क्रमांक मिळविला. चित्र पाहून नाव सांगणे स्पर्धेत आनंदवाडी शाळेतील दुसरीमधील रौद्र मिसाळ याने प्रथम, चिखलीमधील गीता पाटील हीने द्वितीय, कोंझरवाडीमधील पायल घासे हिने तृतीय क्रमांक मिळविला. स्पेलिंग लिहणे स्पर्धेत चिखली शाळेतील तिसरीमधील आराध्या पाटील हीने प्रथम, आनंदवाडी शाळेतील सौम्य पिंगळे याने द्वितीय आणि सांबरी शाळेतील मानवी म्हात्रे हीने तृतीय क्रमांक मिळविला.स्टोरी टेलिंग स्पर्धेत चौथीमधील आनंदवाडी शाळेतील सजल बेंडसेकरने प्रथम, तनिष्का कर्वेने द्वितीय आणि स्मिता नाईकने तृतीय क्रमांक मिळविला.

स्टोरी टेलिंग स्पर्धेत रुईशेत शाळेतील पाचवीमधील तेजश्री मेंगाळने प्रथम, सांबरी शाळेतील तनिष्का पाटीलने द्वितीय क्रमांक मिळविला.निबंध लेखन स्पर्धेत सांबरी शाळेतील काव्या कर्वे हीने प्रथम, रुईशेत शाळेतील विघ्नेश शिद याने द्वितीय क्रमांक पटकावला.सांबरी शाळेतील इयत्ता सातवीतील विद्यार्थी गुरुवाथ नाईक याने निबंध लेखन स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. या सर्व विद्यार्थ्यांचे शाळेकडून कौतुक करण्यात आले.

केंद्रप्रमुख संजय पोईलकर यांचा पुढाकार

नऊ शाळांतील २७ विद्यार्थ्यांचा सहभाग

मुंबई इंडियन्समध्ये उलथापालथ

। मुंबई । प्रतिनिधी ।

मुंबई इंडियन्सच्या ताफ्यात बदलाचे वारे वाहण्यास सुरुवात झाली आहे. कर्णधार हार्दिक पांड्या याच्या भवितव्याची चर्चा सुरू असताना ने आज महत्त्वाचा निर्णय घेतला. इंडियन प्रीमिअर लीग २०२७ च्या तयारीला सुरुवात होण्यापूर्वी संघाच्या कोचिंग सेटअपमध्ये महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत. लसिथ मलिंगा, पारस म्हांब्रे आणि कार्ल हॉपकिन्सन यांना त्यांच्या जबाबदारीतून मुक्त करण्यात आले आहे. त्यामुळे आता मुंबई इंडियन्सच्या सपोर्ट स्टाफमध्ये कोणते चेहरे दिसतील याची उत्सुकता आहे. माहेला जयवर्धनेला मुख्य प्रशिक्षकपदावरून हटवून किरॉन पोलार्डकडे जबाबदारी दिल्यानंतर मुंबई इंडियन्सच्या ताफ्यात झालेला हा मोठा निर्णय आहे.

बुद्ध इंटरनॅशनल सर्किटवर रेसिंगचा थरार



। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

तब्बल १३ वर्षांनंतर बुद्ध इंटरनॅशनल सर्किटवर एफआयए स्तरावरील रेसिंग स्पर्धांचे पुनरागमन होत आहे. इंडियन रेसिंग फेस्टिव्हलच्या माध्यमातून ३१ ऑक्टोबर आणि १ नोव्हेंबर रोजी ग्रेटर नोएडा येथे ४ इंडियन चॅम्पियनशिप आणि इंडियन रेसिंग लीगच्या स्पर्धा रंगणार आहेत. २०२६ च्या हंगामातील ४ चॅम्पियनशिपची चौथी, तर इंडियन रेसिंग लीगची दुसरी फेरी या ठिकाणी होणार आहे.

यापूर्वी फॉर्म्युला वन इंडियन ग्रँड प्रिक्स आणि मोटो जीपी भारत या स्पर्धांचे आयोजन झालेल्या बुद्ध इंटरनॅशनल सर्किटवर पुन्हा एकदा वेगवान शर्यतींचा थरार अनुभवता येणार आहे. ५.१२५ किलोमीटर लांबीचा हा ट्रॅक भारतीय मोटारस्पोर्ट्सच्या इतिहासात महत्त्वाचे स्थान राखतो. दिल्ली-एनसीआरमधील चाहत्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या या सर्किटवर रेसिंगचा रोमांच प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी मिळणार आहे.

मद्रास इंटरनॅशनल सर्किटवर झालेल्या तिसऱ्या फेरीनंतर ४ इंडियन चॅम्पियनशिपमधील जेतेपदाची चुरस अधिक रंगतदार झाली आहे. गोवा एसेस जेए रेसिंगच्या लुविवे संबुडला याने चेन्नईमध्ये शानदार कामगिरी केली. सहाव्या स्थानावरून शर्यतीला सुरुवात करून त्याने पहिल्या दोन शर्यती जिंकल्या, तर तिसऱ्या शर्यतीत तिसरे स्थान मिळवले.

काश्मीरमध्ये सायकलिंगचा जल्लोष

- नशामुक्ती आणि फिटनेसचा दिला संदेश

। जम्मू-काश्मीर वृत्तसंस्था ।

खेळ, फिटनेस आणि निरोगी जीवनशैलीला प्रोत्साहन देण्यासाठी जम्मू-काश्मीर पोलिसांच्या वतीने पॅडल थ्रू पॅराडाइज सायकल रेस २०२६चे आयोजन करण्यात आले. डल लेक ते हरवान मार्गावर झालेल्या या सायकल स्पर्धेत सुमारे तीन हजार सायकलस्वारांनी सहभाग घेतला. पोलीस अतिरिक्त महासंचालक (सशस्त्र) नितेश कुमार यांनी हिरवा झेंडा दाखवून स्पर्धेला सुरुवात केली.

या स्पर्धेत विविध क्षेत्रांतील नागरिकांसह लहान मुलांनीही उत्साहाने सहभाग घेतला. सायकलिंगच्या माध्यमातून शारीरिक तंदुरुस्ती वाढवणे, मानसिक ताण कमी करणे आणि तरुणांना अमली पदार्थांच्या व्यसनापासून दूर ठेवणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता.



स्पर्धेत सहभागी झालेल्या उमर हसन यांनी सांगितले की, या उपक्रमात विविध वयोगटातील आबालवृद्धांपासून लहान मुलांनीही सहभाग घेतला. आपण नियमितपणे सायकलिंग करत असून, स्टॅमिना वाढवण्यासाठी आणि भविष्यात सायकलिंगमध्ये करिअर करण्याच्या उद्देशाने या स्पर्धेत सहभागी झाल्याचे त्यांनी सांगितले.

कामाचा व्याप आणि व्यस्त दिनक्रम बाजूला ठेवून गेल्या एक-दोन दिवसांपासून स्पर्धेची तयारी करत असल्याचेही त्यांनी नमूद केले. शारीरिक हालचाल किंवा कोणताही खेळ माणसाला दैनंदिन ताणतणावापासून दूर ठेवण्यास मदत करतो, असे मत त्यांनी व्यक्त केले.

पॅडल पुशर समूहाचे सदस्य साहिद राही यांनी अशा स्पर्धांचे आयोजन जम्मू-काश्मीरमध्ये नियमितपणे व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. सायकलिंगसारख्या उपक्रमांमुळे नैराश्य, तणाव आणि अमली पदार्थांच्या व्यसनाशी झुंजणाऱ्या व्यक्तींना सकारात्मक प्रेरणा मिळू शकते, असे त्यांनी सांगितले.

मुंबई महापौर चषक बुद्धिबळ स्पर्धा | **बुद्धिबळ स्पर्धेत बालपटूंची चमक**

कार्तिकेय सावंत, साध्या जाधव गटविजेते

। मुंबई । प्रतिनिधी ।

लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया पुरस्कृत एलआयसी-मुंबई महापौर चषक शालेय बुद्धिबळ स्पर्धेत १२ वर्षांखालील गटात कार्तिकेय सावंत, तर ८ वर्षांखालील गटात साध्या जाधव यांनी गटविजेतेपद पटकावले.

कार्तिकेयने ४.५ गुण मिळवत सरस सरासरीच्या आधारे बाजी मारली, तर साध्याने ५ गुणांसह अपराजित कामगिरी करत अव्वल स्थान मिळवले.



आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी आणि आनंदराव अडसूळ चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने आरएमएमएसच्या वातानुकूलित सभागृहात या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. निर्णायक पाचव्या साखळी फेरीत कार्तिकेयने मृण्मयी डावरेच्या बरोबरीच्या आव्हानावर सरस सरासरीच्या आधारे मात केली. दोघांनीही प्रत्येकी ४.५ गुण मिळवले; मात्र सरस सरासरीमुळे कार्तिकेयला पहिले स्थान मिळाले. ८ वर्षांखालील गटात साध्या जाधवने ५ गुण मिळवत निर्विवाद वर्चस्व गाजवले. त्याने अरिंजय भट्टाचार्जी, एकम बाघला आणि इथन पिकार्डो यांच्या कडव्या आव्हानांवर मात केली. या गटात अरिंजय भट्टाचार्जीने ४ गुणांसह दुसरे, एकम बाघलाने ४ गुणांसह तिसरे, इथन पिकार्डोने ४ गुणांसह चौथे, तर स्मित लोकेने ३.५ गुणांसह पाचवे स्थान मिळवले.

१२ वर्षांखालील गटात कार्तिकेय सावंतने ४.५ गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. मृण्मयी डावरेनेही ४.५ गुण मिळवले; मात्र तिला दुसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले. आयांश पाटीलने ४ गुणांसह तिसरे, नैतिक पालकरने ४ गुणांसह चौथे, तर सार्थ लोकेने ४ गुणांसह पाचवे स्थान मिळवले. विजेत्या कार्तिकेय सावंतचा आकर्षक चषक आणि भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला. यावेळी क्रीडापटू गोविंदराव मोहिते, एलआयसी अधिकारी रमेश जोशी, क्रीडाप्रेमी निवृत्ती देसाई आणि अण्णा शिर्सेकर, प्रशिक्षक राजाबाबू गजेंगी तसेच शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण उपस्थित होते. स्पर्धेतील पहिल्या १५ खेळाडूंना आकर्षक पुरस्कार देण्यात आले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)